


# एक धक्का और दो...

**लक्ष्यवेध**
**प्रतिनिधी**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हिशोब चुकता करण्याच्या दिशेने पाऊले उचलली आहेत. आजवर कधीही हात न लावलेल्या 'सिंधू जल करारा'ला भारताने तत्काळ रद्द करत संदेश दिला. पाकिस्तानने सामान्य भारतीय नागरिकांना लक्ष्य केल्यावर, पाकिस्तानी जनतेलाही त्याचे कर्मफळ भोगावेच लागेल, हाच तो संदेश! भारताने पाकिस्तानला दिला आहे. पाकिस्तानला आता सिंधू जल करारानंतर एक धक्का और दो... च्या भावना देशवासियांच्या आहेत.**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या संतापाच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या क्रमाने, काही राजनैतिक पावले उचलण्यात आली. यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सिंधू जल कराराला दिलेली स्थगिती. याव्यतिरिक्त, राजनैतिक उपस्थिती कमी करण्याचा, पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्याचा आणि अटारी-वाघा सीमा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाकिस्तानची स्थापनाच भारताविषयीच्या द्वेषाच्या आधारावर झाली आणि स्थापनेपासूनच त्याचे, भारताशी कटू संबंध राहिले आहेत.

तणावाच्या या दीर्घ अध्यायात थेट आणि छुपे युद्ध आणि सतत प्रायोजित दहशतवाद असूनही, भारताने १९६० साली अमलात आलेला 'सिंधू जल करार' कधीही स्थगित केला नव्हता. परंतु, पहलगामनंतर तसे करण्यास मागेपुढे पाहिले नाही. या स्थगितीच्या अंमलबजावणीशी संबंधित जर-तर वाद आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर हा मुद्दा उपस्थित करताना हे निश्चित आहे की, जर हा करार अपेक्षेप्रमाणे अमलात आणला गेला नाही, तर आधीच अडचणींना तोंड देत असलेला पाकिस्तान मदतीसाठी ओरडू लागेल.

पाकिस्तानच्या शेतीचा मोठा भाग, या कराराद्वारे पुरवल्या जाणार्‍या पाण्यावर अवलंबून आहे. पाणी साचल्यामुळे कृषी उत्पादनात घट होऊन, अन्नसुरक्षेचे नवीन संकट उद्भवू शकते. अनेक पाकिस्तानी शहरेही या पाण्यावर अवलंबून आहेत. 'सिंधू जल करार' हा जगातील सर्वांत उदार आणि एकतर्फी करारांपैकी एक मानला जातो, ज्याचा संपूर्ण फायदा फक्त पाकिस्तानलाच मिळाला आहे. भूतकाळात अनेक वेळा ते पुढे ढकलण्याबाबत चर्चा झाल्या होत्या, पण त्या आल्या आणि गेल्या. कारण, पाकिस्तानच्या नागरिकांनी त्यांच्या सैन्याच्या आणि राज्यकर्त्यांच्या दुष्कृत्यांची किंमत मोजावी अशी भारताची कधीच इच्छा नव्हती.

२०१६ साली उरी हल्ल्यानंतरही भारताला काही फायदे मिळावेत, म्हणून या कराराच्या स्वरूपात थोडासा बदल करण्यात आला होता. परंतु, तरीही तो स्थगित ठेवण्यासाठी कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही. तेव्हा पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. परंतु, पहलगामनंतर असे दिसते की, भारताच्या संयमाने मर्यादा ओलांडली, त्यानंतर हे कठोर पाऊल उचलावे लागले.

राजनैतिक पावले हे दर्शवितात की, राष्ट्रीय सुरक्षेच्याबाबतीत भारत कोणतीही कसर सोडत नाही. यानंतर, लष्करी आघाडीवर काही कृती करून, पाकिस्तानला धडा शिकवण्याची शक्यता नाकारताही येत नाही. पंतप्रधान मोदी यांनी असेही म्हटले आहे की, दहशतवाद्यांना त्यांच्या कल्पनेपलीकडे शिक्षा दिली जाईल. गेल्या आठवड्यात गुरुवारी अनेक देशांच्या राजदूतांसोबत झालेल्या बैठकीत, भारताने जागतिक समुदायाला परिस्थितीची माहिती दिली. आंतरराष्ट्रीय समुदायाने पहलगाम हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे आणि भारताला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. भारताच्या प्रतिक्रियेमुळे आणि कारवायांमुळे, पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण स्पष्टपणे दिसून येते. 'सर्जिकल' किंवा 'एअर स्ट्राईक' यांसारख्या काही कारवाईबद्दल अटकळ आहे.

भारताच्या कृतींना प्रत्युत्तर म्हणून, पाकिस्तानने 'शिमला करार' रद्द करण्याची आणि 'सिंधू जल कराराला' 'युद्धाची कृती' म्हणून प्रत्युत्तर देण्याची धमकी दिली. या सगळ्यांमध्ये प्रश्न असा उद्भवतो की, जेव्हा पाकिस्तान कमकुवत अर्थव्यवस्थेपासून ते फुटीरतावादापर्यंत अनेक आव्हानांना तोंड देत आहे, तेव्हा पहलगाम हल्ल्यासारखे कृत्य करण्याचे धाडस त्यांनी का केले? पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांच्या अलीकडच्या विखारी भाषणानंतरच्या एका आठवड्यातच पहलगाममधील भयानक हल्ला झाला, हे दुर्लक्षित करता येणार नाही. जर आपण यामागील कारणे तपासली, तर आपल्याला आढळेल की, पाकिस्तान सध्या अस्तित्वाच्या संकटाचा सामना करत आहे. एकेकाळी अमेरिकन उपयुक्ततेच्या केंद्रस्थानी असलेला पाकिस्तान, आता अमेरिकेच्या धोरणांमध्ये दुर्लक्षित झाला आहे. आखाती देशांसोबत इस्लामिक ओळख आणि एकतेच्या लाटेवर स्वार झालेल्या पाकिस्तानलाही, पश्चिम आशियातील भारताच्या वाढत्या प्रभावाचा मोठा धक्का बसला आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. वान्स यांच्या अत्यंत महत्त्वाच्या भारतभेटी आणि पंतप्रधान मोदी यांच्या सौदी अरेबिया दौर्‍यादरम्यान, पाकिस्तानने भारताला खोलवर जखमा देण्याचे काम केले आहे.

भारताबाबत आपल्या देशाचे धोरण ठरवणार्‍या पाकिस्तानी लष्कराला हे सत्य पचवता येणार नाही की, एकेकाळी त्यांचे आश्रयदाते असलेले पक्ष आता भारताकडे झुकत आहेत. पाकिस्तानमधील वाढत्या फुटीरतावादामुळे लष्करासमोरील आव्हानेही वाढली आहेत. यामुळे त्यांच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या महिन्यातच, बलुचिस्तानमध्ये लष्करी कर्मचार्‍यांना घेऊन जाणार्‍या रेल्वेचे अपहरण झाल्यामुळे लष्कराला लाजिरवाण्या परिस्थितीचा सामना करावा लागला होता. त्यामुळे पाक लष्कराच्या मार्यादा स्पष्ट झाल्या आहेत.

पहलगाम हल्ला हा त्यांच्या या सैद्धांतिक दृष्टिकोनाची ठोस अभिव्यक्ती आहे. हा हल्ला या अर्थानेही वेगळा आहे की, पूर्वी पाकिस्तान समर्थित दहशतवाद्यांनी फक्त भारतीय सरकार किंवा लष्करी आस्थापनांना लक्ष्य केले होते. कारण, त्यांचा लढा भारतीय राज्यव्यवस्थेशी होता, परंतु यावेळी निष्पाप नागरिकांना लक्ष्य करण्यात आले. म्हणूनच 'सिंधू जल करार' पुढे ढकलून भारताने हाच संदेश दिला की, आता हा लढा नागरिकांच्या पातळीवर पोहोचला आहे आणि पाकिस्तानी राज्यकर्त्यांच्या दुष्कृत्यांचे फळ जनतेलाही सहन करावे लागेल.

भारताचा संदेश स्पष्ट आहे, जर पाकिस्तानी जनतेला त्यांच्या लष्करी आणि राजकीय नेतृत्वाने विषारी जिहादी युद्धात फसवले, तर त्यांना त्याची किंमत मोजावीच लागेल. पहलगाम हल्ल्यातील बळींमध्ये वेगवेगळ्या राज्यांतील नागरिकांचा समावेश असल्याने, त्यातून निर्माण झालेल्या संतापाने संपूर्ण भारताला आणखी एकत्र आणण्याचे काम केले आहे. याव्यतिरिक्त, व्यापक आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे भारतासाठी सर्व पर्याय खुले झाले आहेत.

---

**चीनने जहाज आणि कंटेनर उत्पादनात जागतिक वर्चस्व प्रस्थापित करून, पुरवठा साखळीवर मक्तेदारी मिळवली आहे. आक्रमक उत्पादक धोरण आणि विश्वासघातकी व्यापाररयाबळावर तो जगाला नेहमीच वेठीस धरत आला आहे. अमेरिकेने चिनी जहाज आणि कंटेनरवर वाढवलेले आयात शुल्क, हे त्याविरोधातील एक पाऊल आहे. या क्षेत्रातील चिनी क्षमता आणि एकाधिकारशाहीमुळे अमेरिका, भारत आणि अन्य देशांनी या क्षेत्रातील प्रगती वाढवणे काळाची गरज आहे.**




# चिनी वर्चस्वाला अमेरिकन प्रतिकार

**निमित्त**
**हेमंत महाजन**

डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने १४ ऑक्टोबर रोजीपासून चीनमध्ये तयार झालेल्या आणि चीनच्या जहाजांसाठी, अमेरिकेच्या बंदरात प्रवेश शुल्कात मोठी वाढ करण्याची घोषणा केली. त्यानुसार या जहाजांना प्रति टन ५० डॉलर्स म्हणजेच अंदाजे ४ हजार, २०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. तसेच पुढील तीन वर्षांसाठी हे शुल्क दरवर्षी ३० डॉलर्स म्हणजे सुमारे २ हजार, ५०० रुपयांनी वाढेल. हे पाऊल का उचलले जात आहे? चीनची जहाज वाहतूक, जागतिक स्तरावर अचानक छाननीच्या घेर्‍यात का आली आहे?

**जागतिक शिपिंगमध्ये चीनचा उदय**

आज चीन जागतिक व्यापारी जहाज क्षेत्रात, मालवाहतूक क्षमतेच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाटा उचलतो आणि कंटेनर उत्पादनात चीनची जागतिक स्तरावर मजबूत पकड आहे. चीनला हे वर्चस्व अचानक मिळालेले नाही, तर ते दीर्घकालीन नियोजन, आक्रमक सरकारी मदत आणि जहाजबांधणी, बंदर विकास आणि सागरी लॉजिस्टिक्समधील धोरणात्मक गुंतवणुकीचे आणि प्रभावी अंमलबजावणीचे फळ आहे.

अमेरिकेचे मुख्य उद्दिष्ट चीनच्या याच अनुचित व्यापार पद्धती आणि धोरणांना लक्ष करून, चीनच्या जहाज बांधणीतील वाढत्या वर्चस्वाला आव्हान देणे हे आहे. चीनच्या अमर्याद वर्चस्वाची ही चिंता अनेक वर्षांपासून वाढत आहे. २०२४ साली 'युएस ट्रेड रिप्रेझेन्टेटिव्ह' अर्थात 'युएसटीआर' या संस्थेने याची चौकशी केली होती. या चौकशीत चीन जगाच्या कितीतरी पुढे आहे हे स्पष्ट झाले. कारण, चीन गरज पडल्यास जागतिक व्यापार थांबवू शकतो किंवा अचानक किमती वाढवू शकतो हे समोर आले. चीनने रेड मिनरलच्या पुरवठा साखळीत अचानक बदल करून, जगाला याची प्रचिती दिली आणि आपण किती धोकादायक पुरवठादार देश आहोत हेसुद्धा दाखवून दिले.

**चिनी जहाजांवर अमेरिकेची शुल्क कारवाई**

आता अमेरिका चिनी जहाजांवर आयातकर लावणार आहे, जो त्यांना अमेरिकेच्या बंदरात व्यापारी जहाजे आणल्यास भरावा लागेल. 'युएसटीआर'नुसार, नवीन बंदर शुल्क त्याच्या घोषणेपासून १८० दिवसांच्या आत लागू केले जाईल आणि त्याची रचना खालीलप्रमाणे असेल.

**चीननिर्मित आणि मालकीची जहाजे:** सुरुवातीला प्रति टन ५० डॉलर्स, तीन वर्षांत दरवर्षी प्रति टन ३० डॉलर्सने वाढ.

**पर्यायी शुल्क रचना:** प्रति डिस्चार्ज कंटेनर १२० डॉलर्स, तीन वर्षांनंतर प्रति डिस्चार्ज कंटेनरमध्ये २५० डॉलर्सपर्यंत वाढ.

**चीननिर्मित जहाजे चालवणाऱ्या इतरदेशीय कंपन्या:** प्रति निव्वळ टन १८ डॉलस, वार्षिक पाचने वाढ. वाहने वाहून नेणारी बिगर युएसनिर्मित जहाजे : प्रति वाहन १५० डॉलर्स.

**सूट :** धान्य किंवा कोळसा यांसारख्या मोठ्या प्रमाणात वस्तू वाहून नेणारी रिकामी जहाजे, आयातकरातून वगळण्यात आली आहेत.

**शुल्क मर्यादा:** प्रत्येक जहाजासाठी वर्षातून, जास्तीत जास्त सहावेळा शुल्क लागू होईल. यापूर्वी चीनच्या जहाजांवर प्रति पोर्ट कॉल एक दशलक्ष किंवा चीननिर्मित जहाजांचे प्रमाण जास्त असलेल्या ताफ्यांसाठी, १.५ दशलक्ष शुल्क आकारण्याचे प्रस्ताव वगळण्यात आले आहेत.

**चीनने वर्चस्व कसे मिळवले**

जागतिक शिपिंगमध्ये एकेकाळी मागे असलेल्या चीनने, आता या उद्योगात मोठे स्थान मिळवले आहे. त्यामागील काही टप्पे खालीलप्रमाणे आहेत,

१९९९ साली जागतिक जहाजबांधणी बाजारपेठेत, चीनचा वाटा पाच टक्क्यांपेक्षा कमी होता. २०२३ सालापर्यंत, ५० टक्क्यांपेक्षा जास्त जहाजे चिननिर्मित आहेत.

२०२४ मध्ये, सर्व नवीन जहाज बांधणीच्या मागणीपैकी, ७४ टक्के जहाजांची निर्मिती करण्याचे कंत्राट चीनच्या शिपयार्ड्सला मिळाले होते.

चीन दरवर्षी १ हजार, ७०० हून अधिक जहाजे तयार करतो, तर अमेरिकेचे उत्पादन केवळ पाच जहाजे प्रतिवर्षी आहे.जागतिक कंटेनर उत्पादनाच्या ९५ टक्के आणि इंटरमॉडेल चेसिसच्या ८६ टक्के उत्पादन चीनमधील कंपन्या करतात.

२०२४ साली चीनच्या व्यावसायिक व्यापारी जहाजांचा ताफा, ४३० दशलक्ष डेडवेट टनपर्यंत वाढला, जो जागतिक क्षमतेच्या सुमारे १८.७ टक्के आहे. 'सीएनबीसी'च्या अहवालानुसार, जगातील व्यापारी जहाजांच्या ताफ्यातील ९८ टक्के जहाजे, चिनी बनावटीची असण्याची शक्यता आहे.

**चीनच्या प्रगतीमगाचा धोका**

चीनचे शिपिंगमधील वर्चस्व, जगातील सर्वांत मोठा निर्यातदार देश म्हणून महत्त्वाचे ठरते. २०२३ साली चीनने ३.४२ ट्रिलियन डॉलर्स किमतीच्या वस्तू निर्यात केल्या, ज्याची प्रमुख बाजारपेठ अमेरिका (४३६ अब्ज डॉलर्स), (पान ४ वर)

---


# धर्मत्यागाचे वाढते लोण

**जगाच्या सामाजिक व वैचारिक संरचनेमध्ये नव्याने बदल होत असताना, एक महत्त्वाची जागतिक प्रवृत्ती स्पष्टपणे दिसून येते, ती म्हणजे धर्मत्याग. 'प्यू रिसर्च सेंटर'ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, जगामध्ये ख्रिश्चन व बौद्ध धर्मीय समुदायांमध्ये गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. यामध्ये दर पाचपैंकी एक व्यक्ती धर्मत्याग करते. याउलट, हिंदू व मुस्लीम धर्मीयांमध्ये ही गळती अत्यल्प आहे. विशेष विचारप्रवृत्त करणारी बाब म्हणजे, 'कोणताही धर्म न मानणार्‍यांची' संख्या आज जगात चौथ्या क्रमांकाची असून हा एक 'नवधर्म' ठरत आहे. ही गळती केवळ धर्मपरिवर्तनाच्या आकडेवारीपुरती मर्यादित नाही, तर ती संपूर्ण सभ्यता, मूल्यव्यवस्था आणि सांस्कृतिक परंपरा यांच्या विसर्जनाचे सूचक आहे.**

**वेधक**
**कौस्तुभ वीरकर**

धर्म हे केवळ व्यक्तिगत नाही, तर समाजाच्या स्मृती, आचारधर्म, नैतिक मूल्य, कुटुंबसंस्था आणि ऐतिहासिक सातत्याचे अधिष्ठान असते. परंतु, धर्माच्या या संकल्पनेचाच विपर्यास करून त्यास अंधश्रद्धा, परंपरानिष्ठ दडपशाही आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा विरोधक म्हणून रंगवण्यात आले. आज जगात अनेक धर्मांच्या अनुयायांमध्ये संघटित धार्मिक आत्मीयता विरून गेली आहे. या धर्मांमध्ये धर्म आणि सामाजिक व्यवहार यांच्यातील संबंध संपल्याने धर्म ही वैयक्तिक बाब झाली. या घडामोडींच्या तुलनेत हिंदू आणि इस्लामी समाज अधिक स्थिर दिसतो.

मुस्लीम समाजामध्ये धर्म म्हणजे सामूहिक अस्मिता आणि राजकीय शक्तीचे प्रतीक. त्यामुळे त्याच्याशी वेगळेपण अंगीकारणे हे केवळ वैचारिकच नव्हे, तर सामाजिक बहिष्कृतीचे कारण ठरते. त्यातील धर्मस्वातंत्र्य हा स्वतंत्र चिंतनाचा विषय व्हावा. इस्लामप्रमाणे हिंदू धर्मातही धर्मत्याग तुलनेने कमी असला, तरी त्याची कारणे वेगळी आहेत. असे असले तरीही, हिंदू धर्मीयांनी सभोवताली घडणारे सूक्ष्म बदल याबाबत गांभीर्याने अंतर्मुख होणे आवश्यक आहे. कारण, इथे धर्माचे अस्तित्व टिकले असले, तरी स्वधर्माचा आत्माभिमान लोप पावत चालला आहे, असे जाणवते. भारतात ही स्थिती आणखी गुंतागुंतीची होते, कारण येथे डाव्या विचारसरणीचे आघात फक्त धर्मावरच नव्हे, तर संपूर्ण सांस्कृतिक संरचनेवर लक्ष्यित आहेत. हिंदू धर्माच्या पारंपरिक, सात्त्विक आणि समन्वयवादी मूल्यांची जाणीवपूर्वक हेटाळणी करण्यात येते. शिक्षणसंस्थांतून धर्मविषयक ज्ञान हद्दपार करण्यात आले असून, स्वधर्माबद्दल माहिती असणे हेच एक प्रकारचे 'वैचारिक मागासलेपण' म्हणून बिंबवले गेले आहे. परिणामी, एक पिढीच पारंपरिक ज्ञानाला अंतरली आहे. याचसोबत कुटुंबसंस्था ही धर्मशिक्षणाची पहिली आणि प्रभावी प्रयोगशाळा असल्याने, तिच्यावरही हल्ला करण्याचे काम सुरू आहे. (पान ४ वर)



# अमेरिकन क्रांती आणि काउंट व्हर्झान

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

काही दिवसांपूर्वी, म्हणजेच १९ एप्रिल रोजी अमेरिकन राज्यक्रांतीच्या प्रारंभाला २५० वर्षे पूर्ण झाली. दिनांक १९ एप्रिल १७७५ या दिवशी या क्रांतियुद्धातली पहिली लढाई लढली गेली होती. साधारणपणे क्रांती ही झटपट निकाली निघते. म्हणजे क्रांतिकारक किंवा सत्ताधारी कोणत्यातरी एका पक्षाचा झटपट पराभव होऊन युद्ध संपते. पण अमेरिकन राज्यक्रांती १७७५ ते १७८३ अशी चांगली ८ वर्षे रेंगाळत-रेंगाळत सुरू होती.

अखेर १७८३ साली ब्रिटनचा राजा तिसरा जॉर्ज याने मान्य केले की, तेरा अमेरिकन वसाहतींचा हा समुदाय यापुढे ब्रिटनच्या वसाहती नसून, ते एक स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र आहे. पण गंमत म्हणजे तेरा वसाहतींच्या या संघाला ब्रिटनने १७८३ साली अशी अधिकृत मान्यता देईपर्यंत त्या संघाचे कर्ते धर्ते थांबून राहिले नव्हते. त्यांनी ४ जुलै १७७६ रोजीच जाहीर केले होते की, आम्ही स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र आहोत म्हणून दरवर्षी ४ जुलै हा दिवस अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन असतो. या घटनाक्रमामधला राजकीय महत्त्वाचा मुद्दा लक्षात येतोय का तुमच्या? एप्रिल १७७५ ते जुलै १७७६ या काळात तेरा बंडखोर अमेरिकन वसाहतींनी आपला मालक देश ब्रिटन याच्याविरुद्ध केलेले हे बंड किंवा क्रांतियुद्ध होते.

४ जुलै १७७६ या दिवशी या तेरा वसाहतींनी आपण एक स्वतंत्र राष्ट्र आहोत, असे जाहीर केल्यामुळे आता ते अमेरिका आणि ब्रिटन या दोन राष्ट्रांमधले युद्ध बनले. म्हणजेच फ्रान्स आणि स्पेन या अमेरिकन वसाहतींच्या मित्र देशांना किंवा खरे म्हणजे ब्रिटनच्या शत्रू देशांना अधिकृतपणे युद्धात उतरायला मुभा मिळाली. फ्रेंच सेनापती मेजर जनरल मार्क्विस द लाफायेत हा सैन्य आणि भरपूर युद्धसामग्री घेऊन जनरल जॉर्ज वॉशिंग्टनच्या साहाय्याला धावून आला. ब्रिटिश सेना मार खाऊ लागल्या.

शेवटी ब्रिटनचा राजा तिसरा जॉर्ज याने १७८१ सालापासूनच राजकीय वाटाघाटींना सुरुवात केली. १७८३ साली ब्रिटनने अमेरिकेचे अस्तित्व अधिकृतपणे मान्य केले आणि युद्ध संपले. अमेरिकेचा मित्र देश म्हणून या वाटाघाटींमध्ये फ्रान्सचाही मोठा सहभाग होता. त्यामुळे हा तह पॅरिसमध्येच झाला. त्याला 'पॅरिसचा तह' असेच नाव आहे. या सगळ्या घटना घडवून आणण्यात फ्रान्सचा राजा सोळावा लुई याचा पंतप्रधान चार्ल्स ग्रॅव्हिये ऊर्फ काऊंट व्हर्झान याचा फार मोठा सहभाग होता.

पुढचा घटनाक्रम मोठाच विचित्र आहे. १७८३ साली युद्ध संपले. आता नव्या अमेरिकन राष्ट्राला आपली राज्यघटना बनवायची होती. ज्यांना अमेरिकेचे 'फाऊडिंग फादर्स' म्हटले जाते, त्या जॉर्ज वॉशिंग्टन, टॉमस जेरुर्सन, बेंजामिन फ्रँकलिन, जॉन ॲडॅम्स, जेम्स मेडिसन, अलेक्झांडर, हॅमिल्टन इत्यादी मंडळींनी 'अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा' पूर्वीच प्रसिद्ध केला होता. पण आता १३ वसाहतींच्या किंवा १३ राज्यांच्या संघासाठी राज्यघटना बनवायची होती.


राज्यघटना तयार होऊन तिला १३ ही राज्यांच्या प्रांतिक विधिमंडळांची मान्यता मिळेपर्यंत १७८७ साल उजाडले. मग सार्वत्रिक निवडणुकांची प्रक्रिया सुरू होऊन त्या पार पडायला १७८९ साल उजाडले. ३० एप्रिल १७८९ या दिवशी नवनिर्मित अमेरिकन राष्ट्राचा पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून जॉर्ज वॉशिंग्टन पदारूढ झाला. बरोबर ५ दिवसांनी म्हणजे ५ मे १७८९ या दिवशी इकडे फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. या क्रांतीच्या ज्वाला उत्तरोत्तर भडकत जाऊन तिच्यात राजा सोळावा लुई, त्याची राणी मेरी अँटोनेट (मारी आंत्वानेत) यांच्यासह हजारो लोकांचा बळी गेला.

अनेक इतिहासकारांचे म्हणणे असे आहे की, सोळावा लुई आणि त्याचा पंतप्रधान काऊंट व्हर्झान यांनी अमेरिकन क्रांतिकारकांना जी मदत केली त्यामुळे खुद्द फ्रान्सवरच अतिरिक्त आर्थिक बोजा पडला. त्यातूनच सामान्य फ्रेंच नागरिकांवर आर्थिक भार वाढला.

तो असंतोष वाढत जाऊन अखेर त्याची परिणती रक्तरंजित क्रांतीमध्ये झाली. गंमत म्हणजे हा सर्व बनाव घडवून आणणारा जो 'मास्टर माईंड' फ्रेंच पंतप्रधान काऊंट व्हर्झान, तो १७८७ साली, म्हणजे क्रांतीच्या दोन वर्षे आधीच नैसर्गिक मृत्यूने मरण पावला होता. याला काय म्हणावे? कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे? की, कथा कुणाची व्यथा कुणाला? स्वतंत्र आणि सार्वभौम लोकशाही अमेरिकन राष्ट्र उभे राहावे म्हणून ज्या काऊंट व्हर्झानने अमेरिकन क्रांतिकारकांना भरपूर मदत केली, त्याचे स्वतःचे राष्ट्र मात्र कोसळून पडावे? अगदी स्पष्ट बोलायचे तर काऊंट व्हर्झानने अमेरिकन क्रांतिकारकांना जी मदत देऊ केली, ती त्यांच्यावरील प्रेमामुळे वगैरे अजिबात नव्हती.

लोकशाही मूल्यांवरचे प्रेम वगैरेचा तर प्रश्नच नव्हता. कारण तो स्वतःच एका राजाचा पंतप्रधान होता. म्हणजेच राजेशाही किंवा सरंजामशाही व्यवस्थेतला एक महत्त्वाचा घटक होता. ती मदत करण्यामागे ब्रिटनला हलका पाडणे; त्याचे आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडातले वाढते साम्राज्य वाढते वर्चस्व कमी करणे नि त्या जागी फ्रान्सचे साम्राज्य, फ्रान्सचे वर्चस्व वाढवणे; ब्रिटनच्या शत्रू देशांना आपले मित्र बनवून आंतरराष्ट्रीय व्यापारात आपला दबदबा वाढवणे असा उघड उघड राजकीय हेतू होता, यात काही चुकीचे होते, असे म्हणता येणार नाही. कारण ब्रिटन नेमके हेच उद्योग करीत होता. १६व्या शतकात स्पेन हा देशही या साम्राज्य स्पर्धेत होताच. पण सन १५८८ साली आर्मांडा युद्धात स्पेनने ब्रिटनकडून मार खाल्ल्यावर ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यातली स्पर्धा तीव्र झाली.





उत्तर अमेरिका खंडात ब्रिटनने अटलांटिक किनाऱ्यावरचा मोठा भूभाग व्यापला. पण फ्रान्सच्या ताब्यातला मध्य अमेरिका आणि कॅनडाचा भूभाग जास्त मोठा होता. आफ्रिकेतही समुद्र किनाऱ्यावरची मोक्याची बंदरे ब्रिटनने दाबून बसला असला, तरी अंतर्भागातला फार मोठा प्रदेश फ्रान्सच्या ताब्यात होता. आशिया खंडात, त्यातही विशेषतः भारतावर वर्चस्व मिळवण्यासाठी फ्रेंच आणि इंग्रज यांच्यात जोरदार चुरस होती.

खुद्द युरोप खंडातही फ्रेंच आणि इंग्रज यांच्यात लढाया सुरूच होत्या. सन १७५६ ते १७६३ या सात वर्षांच्या काळात ही चुरस अगदी कळसाला गेली आणि अखेर प्रत्येक ठिकाणी ब्रिटनने बाजी मारली. 'सप्त वार्षिक युद्ध' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या जागतिक संघर्षात प्रत्येक ठिकाणी ब्रिटनने फ्रेंचांना मागे टाकले.

सन १७५७ साली इंग्रज सेनापती रॉबर्ट क्लाईव्ह याने बंगालचा मुघल सुभेदार सिराजउद्दौल याचा प्लासी (मूळ बंगाली नाव पलाशी) च्या लढाईत पराभव करून बंगाल जिंकला. या लढाईत फ्रेंचांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी इंग्रजांच्या या विजयामुळे भारतातली फ्रेंच सत्ता माघारली. म्हणून 'प्लासीची लढाई' ही सुद्धा 'सप्त वार्षिक युद्धा' चाच एक भाग मानली जाते. असो. तर अशा रीतीने माघारलेल्या फ्रेंच साम्राज्याला पुन्हा पुढे आणण्यासाठी काहीतरी करणे हे फ्रेंच पंतप्रधान या नात्याने काऊंट व्हर्झानचे कर्तव्यच होते. त्याचवेळी म्हणजे १७६५ साली त्याने आपले लक्ष अमेरिकेकडे वळवले.

अमेरिकन वसाहतींमधले नागरिक मूळचे ब्रिटिशच होते. पण अमेरिकेत स्थलांतरित होऊन त्यांना आता शंभराहून अधिक वर्षे उलटून गेलेली होती. त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे ब्रिटनमधले सत्ताधारी लोक या अमेरिकन वसाहतींना गुलामांप्रमाणे वागवत होते, हे त्यांना सहन होत नव्हते. अमेरिकन भूमीवरून विविध प्रकारचा कच्चा माल ब्रिटनला न्यायचा आणि पक्का माल दामदुपटीने विकायचा, वसाहतींवर विविध प्रकारे कर लादायचे, अशी ब्रिटनची धोरणे वसाहतवाल्यांना अजिबात आवडत नव्हती. यातून ब्रिटनविरुद्ध आंदोलन उभे राहू शकते का, याचा अंदाज घेण्यासाठी काऊंट व्हर्झानने आपले हेर १७६५ सालीच अमेरिकेला पाठवले. त्या हेरांनी अहवाल पाठवला की, असंतोष आहे पण तो संघटित होऊन त्याची परिणती सशस्त्र क्रांतीमध्ये होण्याला अजून काही काळ जावा लागेल. ती वेळ आणखी दहा वर्षांनी आली. वसाहतींमधला असंतोष, तो दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी केलेली दडपशाही यांचा स्फोट १७७५ साली झाला.


जनरल जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांच्या सशस्त्र सैन्याने १९ एप्रिल १७७५ या दिवशी पहिली गोळी झाडली. ब्रिटिश सेनापती आणि सैन्य चांगलेच कसलेले होते. त्यामुळे सुरुवातीला क्रांतिकारकांनी मार खाल्ला. पण ते अजिबात डगमगले नाहीत. ४ जुलै १७७६ ला त्यांनी धडाक्याने आपले स्वातंत्र्य जाहीर केले. १३ जून १७७७ या दिवशी फ्रेंच सेनापती मेजर जनरल मार्क्विस द लाफायेत हा भरपूर युद्धसामग्री घेऊन अमेरिकेत पोचला. मग युद्धाचे पारडे निर्णायकरीत्या क्रांतिकारकांच्या बाजूने झुकले आणि अखेर अमेरिका निर्माण झाली. १९ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रारंभाला अडीचशे वर्षे पूर्ण झाली.

अनेक इतिहासकार २०२४ पासूनच त्या निमित्ताने पुस्तके, विशेष लेख लिहीत आहेत. जॉन फर्लिंग हे वेस्ट जॉर्जिया विद्यापीठातले मानद प्राध्यापक अमेरिकन राज्यक्रांती या विषयाचे तज्ज्ञ आहेत. काऊंट व्हर्झान ऊर्फ चार्ल्स ग्रॅव्हिये याला त्यांनी अमेरिकेचा विस्मृत 'फाऊंडिंग फादर' म्हणून गौरविले आहे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

सुखात्म
डॉ. अविनाश मोहरील

माझ्या व अनेकांच्या अतिशय आवडीचे कवी द ग्रेट गुलजार यांच्या काव्यप्रतिभेतून बरेच वेळा उमटत असलेली एक संकल्पना वक्त की शाँख के लम्हें मला अनेक वेळा मोहवते. किती सुंदर कल्पना सुचतात कवीला! आपल्या प्रत्येकाच्या जीवनाचा विचार करता मार्गक्रमण करीत असलेल्या जीवनप्रवासाबद्दल ही संकल्पना किती चपखल बसते.

जमिनीत रुजलेल्या आणि वेगवेगळ्या प्रकारे वृद्धिंगत होत जाणाऱ्या झाडाप्रमाणेच आपले जीवन असते व त्या जीवनरूपी झाडावर येणारी फळे म्हणजे वेगवेगळे क्षण ज्यांच्या अस्तित्वाने आपले जीवन अर्थपूर्ण होत जाते. जसे कोणत्या झाडावर कोणते,




कोणत्या आकाराचे, कोणत्या चवीचे फळ यावे हे त्या झाडाच्या संगोपन प्रक्रियेवर, त्या झाडाला मिळणाऱ्या किंवा न मिळणाऱ्या पोषक तत्त्वांवर, त्या झाडाला मिळालेल्या जमिनीच्या प्रकारावर, त्या झाडाला मिळणाऱ्या खतपाण्यावर तसेच सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्याला मिळणाऱ्या वातावरणावर अवलंबून असते, तसेच काहीसे माणसाच्याही जीवनाचे आहे. म्हणूनच गुलजार या जीवनाला पुढे नेणाऱ्या काळाला वृक्षाची उपमा देतात व त्या वृक्षाच्या फांद्यांवर रोज नव्याने बहरणाऱ्या वेगवेगळ्या क्षणांना ते विविध प्रकारच्या फळांच्या स्वरूपात बघतात. हे सारे क्षण प्रत्येकाच्या जीवनाची गोळाबेरीज मांडताना हिशेबात घ्यायचे असतात म्हणूनच त्यांना तोडू नये तर त्यांना त्या काळाच्या फांद्यांवर राहू द्यावे व जसे मिळतील तसे स्वीकारावे असे सांगताना गुलजार म्हणतात, "**हाथ छुटे भी तो रीश्ते नहीं छोडा करते। वक्त की शाँख से लम्हें नहीं तोडा करते।।**" आपले आयुष्य देखील किती वेगवेगळ्या परिस्थितींवर आणि वातावरणावर अवलंबून असते याचा साधा विचार जरी केला तरी माझे आयुष्य मी बनविले आहे असा अहं बाळगणाऱ्या अनेक मंडळींना त्या अहंमान्यतेतील फोलपणा जाणवू शकतो. यासोबतच आपल्या आयुष्याची दुसऱ्याच्या आयुष्यासोबत तुलना करून स्वतःला श्रेष्ठ समजणे हा अहंगंड किंवा स्वतःला अतिशय कमनशिबी समजणे हा न्यूनगंड तयार होण्यापासून वाचता येऊ शकते. गुलजारच्या मते हे सारे काळाच्या फांद्यांवर उगविणारे क्षण मनापासून अनुभवता येणे हे खरे जीवनसार आहे. हे क्षणच आपले संचित आहे व तीच आपली मिळकत देखील आहे. असे क्षण आपल्या आयुष्यात अनेकवेळा येतात. पण कधी कधी त्या क्षणांना जगण्यासाठी आवश्यक वातावरण, मानसिकता किंवा आधुनिक शब्दावलीतील रूढ शब्द म्हणजे मूड असावा लागतो. पण मग त्यामुळे कधीकधी काही क्षण हे कळीचे फूल न होता तसेच गोठून गेलेल्या स्थितीत अडकून राहतात तर काही क्षण हे भरभरून फुलतात व त्याचा सुगंध पुढच्या अनेक क्षणांना सुगंधित करतात. क्षणांना टवटवीत फुलांमधे परावर्तित करण्यासाठी मात्र एक विशिष्ट प्रकारची मनोवृत्ती आपल्या ठायी असावी लागते. ती असेल तरच हे सारे क्षण व त्यासोबत बहरत असलेले आयुष्य सुरेख होते. अर्थात मनोवृत्ती असूनही क्षण बहरतीलच असेही नाही. ते सारे स्थळ काळ आणि व्यक्तिसापेक्षच असतात.

नेहमीसारखा एक समुद्र किनारा, त्याच लाटा, तोच आवाज, तेच सारे काही पण अचानक वक्त की शाँख पर एक लम्हां उगता है एकमेकांवर नितांत प्रेम करणारी दोघे त्याच किनाऱ्यावर सायंकाळ उलटून गेल्यावर बसलेले असतात. तो सखा नि त्याची सखी... किनाऱ्यावर पसरलेली नीरव शांतता... येत असतो तो केवळ खळखळत्या लाटांचा आवाज. तिने हळुवार त्याच्या खांद्यावर डोके टेकविलेले असते आणि त्याने तिचा हात हातात धरलेला असतो. दूरवर खाडीच्या भागाला मोठ्या उंच लाईट हाऊसमधला फिरता दिवा मधूनच चमकदार किरण दाखवितो. रात्रीच्या वेळी दूरवर समुद्रात विरत जात असलेल्या होड्या त्यांच्यावरील हळूहळू लुप्त होणाऱ्या दिव्यांसह दूर जात असतात. मधूनच एखादा सागरी पक्षी त्याच्या कर्कश आरोळीने सारा आसमंत भरून टाकतो आणि मग शांत होतो. समुद्राच्या लाटांचे खळाळते नर्तन सुरू असते. लाटांचा तो नादमय आवाज या दोघांच्याही मनात निर्माण होणाऱ्या विचारांना लय प्राप्त करून देतात. पण त्या क्षणी मनातील विचारांना कोणतेही शब्द न देता त्या केवळ निसर्गाच्या आवाजासह ती दोघे शांतपणे ते आनंदक्षण अनुभवत असतात. काहीही न बोलता दोघांनाही एकमेकांच्या मनातील सारे काही कळत असते अशी ती प्रेममयी एकरूपता ती दोघे त्या क्षणांना अनुभवत असतात. त्या शांततेची सहसंवेदना अनुभवत असताना ती त्याला हलकेच म्हणते गा ना काहीतरी माझ्यासाठी... तिच्या कोणत्याच गोष्टीला नाही म्हणायचे नाही अशी त्याची सवय असल्याने सुरेल आवाजात तो केवळ तिच्यासाठी गाऊ लागतो...अगदी हळुवार केवळ तिच्यासाठी. इतके हलके की त्याचे सूर त्या सभोवताली सुरू असलेल्या निसर्ग संगीतात इतके छान मिसळून जातात की त्यांना त्याच्यापासून वेगळे करणे शक्यच नसते. तिला मात्र ते बरोबर ऐकू येतात... तिच्या मनावर रोमांच उठविणारे त्याचे सूर खोलवर तिच्या हृदयापर्यंत पोहोचतात आणि त्यामधून देखील त्याच्या तिच्यावरील प्रेमाची प्रचीती तिला होत राहते. त्याचे ते गाणे संपताना तो सहजच तिच्या सुंदर चेहऱ्याकडे बघतो.

मनातील भाव जसे आहेत तसे पारदर्शीपणे व्यक्त करणाऱ्या तिच्या मृगनयनी डोळ्यात आनंदाश्रू तरळत असतात. त्या आनंदाश्रूंना त्याच्या कंठातून बाहेर पडणाऱ्या प्रेममयी सुरांचे आनंद ओझे सहन होत नाही व ते भावोत्कट होऊन तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून गालावर ओघळू लागतात. तिचेही त्याच्यावर असलेल्या जीवापाड प्रेमाची ओळख पटवून देणारे ते अश्रू तो हलकेच टिपून घेतो. सागराचा लयबद्ध खळखळाट आणि लाईट हाऊसमधील दिव्याच्या गिरक्या अजूनही सुरू असतात. काही वेळाने तो तिलाही हलकेच काहीतरी गाण्याची विनंती करतो. तिचाही आवाज सुंदर व प्रेमाने ओथंबलेला असतो. त्यामुळे तिचे सूर देखील त्याच्या थेट हृदयापर्यंत पोहोचतात आणि त्याचवेळी दूरवर सागरातून त्यांचा आवडता चंद्र उगवला.

एकमेकांच्या सहवासाने हर्षोल्हासित झालेल्या त्या दोघांच्या आनंदाला त्या चंद्राच्या सागरातून झालेल्या आगमनामुळे पार उरला नाही. चंद्राच्या प्रकाशाने उजळून निघालेले सागराचे पाणी, समुद्रातून जन्म घेतलेले ते चंद्रबिंब त्या सबंध वातावरणाला व त्या वातावरणात प्रेमाची एकरूपता अनुभवत बसलेल्या या दोघांच्या प्रेमातुर मनांना रोमांचित करून टाकत होते. त्या सुगंधी वातावरणात त्याचा हात हातात धरून तिने विचारले, सख्या एक सांगू? बऱ्याच वेळानंतर ती काहीतरी बोलणार होती म्हणून अत्यंत उत्सुकतेने त्याने तिला म्हटले, सांग ना सखे. त्याच्या डोळ्यात स्वतःला गवसून मोठ्या आनंदाने ती सांगू लागली. (पान ६ वर)

# मातृदेवो भव

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर


जगाच्या पाठीवर प्राचीन काळी ज्या संस्कृती अस्तित्वात होत्या त्या सर्वच मातृदेवतेची पूजा करणाऱ्या होत्या असे पुरावे जागोजागी केलेल्या उत्खननात आढळले आहेत. या कर्मकांडाची कारणमीमांसा करताना मानव्यशास्त्राचे विद्वान म्हणतात की, मातृत्व हे सर्वविदित असतं कारण आईच्या गर्भाशयात वाढणारा गर्भ आणि बाळंतपण हे सर्वांच्या समोर घडणारी घटना आहे. त्यात सगळ्यांत मातेत होणारा शारीरिक आणि मानसिक बदल, सहन करावा लागणारा त्रास आणि प्रसंगी त्यात नवजाताचा किंवा मातेचा अथवा दोघांचा होणारा मृत्यू हे दाहक सत्य देखील सर्वांनाच माहीत असलेलं सत्य आहे. त्यामुळे या प्राचीन संस्कृतींनी जन्माची प्रक्रिया आणि ती जिच्यात संपन्न होते ती जननी दोघींना नेहमीच पूजनीय मानलं.



प्रजननांग आणि स्तन मोठे असणाऱ्या सिंहासनावर बसलेल्या स्त्री प्रतिमा उत्खननात आढळलेल्या आहेत. ख्रिस्ती रिलिजनच्या उदयानंतर या निसर्गोपासक- सूर्यपूजक पेगन म्हणून हिणवल्या जाणाऱ्या लोकांनी या सगळ्या परंपरा मोडीत काढल्या आणि क्रूसावर चढवलेल्या मरणासन्न किंवा प्राणोत्क्रमण झालेल्या येशूच्या प्रतिमेची करुणा भाकायला सुरुवात केली. त्याच्यानंतर प्रसारित झालेल्या मज़हबनं तर अल्लाह आणि त्याच्या प्रेषितांव्यतिरिक्त अन्य कोणाचीही पूजा-उपासना करण्यावरच तीव्र आक्षेप घेतला. त्यामुळे या दोन्ही विचारधारेत माता ही आदरणीय असली तरी पूजनीय नक्कीच नाही. या सर्व अभ्यासकांनी मांडलेली भूमिका योग्यच आहे. पण मातृपूजनाचा गाभा असलेला भारतीय पैलू मात्र त्यात दिसून येत नाही.

आपल्या संस्कृतीत जननी, माता, अंबा, प्रसू या शब्दांनी जिला संबोधलं जातं अशी जी ती भारतीय विद्वानांना ज्या प्रकारे आकळली त्याला तोड नाही. मातृ देवो भव म्हणजे माता ही ज्याची देवता आहे अशी/ असा तू हो अशीच शिकवण लहानपणापासून आपल्याला देण्यात येते. कारण स्पष्टच आहे, स्वतःच्या आईला देवी आणि देवीला आई मानणारी आपली परंपरा. आई आणि देवीत असलेली ही अभिन्नता, ही एकरूपता, हे अद्वैत, आपल्या मेंदूत पुनः पुन्हा ठसविण्यात येतं, मनावर बिंबविण्यात येतं, स्मृतीत कोरण्यात येतं कारण तीच आपली पहिली गुरू असते. पहिला नमस्कार तिलाच करण्याची पद्धत आपल्याकडे आहे. आईची महती सांगणारे लेख, निबंध अनेकानेक लिहून झालेत, स्तोत्र कविता, कथा असंख्य रचण्यात आल्यात, अगणित वेळा चित्र रेखाटली रंगवली गेलीत, तरी प्रकाशाचा कवडसा हातून निसटावा तसं होतं. तिचं मातृत्व दिव्य आणि शब्दातीत आहे.

लहान असताना तीच आपलं विश्व असते. वय वाढत जातं आणि अनुभवांती सगळ्या विश्वाहून तीच सरस असल्याचा विश्वास पदोपदी दृढ होत जातो. म्हणूनच, तिच्याच रूपात जगन्माता अभिव्यक्त होत असते असं आपल्या महर्षींनी प्रतिपादित केलेलं आहे. या संदर्भात साधारणपणे सहाव्या शतकात लिहिलेल्या मार्कंडेय पुराणाचा भाग असलेल्या तंत्रोक्त देवी सूक्तात जे दोन श्लोक अतिशय महत्त्वाचे आहेत त्यात प्राणिमात्रांत मातेचं महत्त्व विशद करणारे आहेत. ते दोन श्लोक आहेत, "**या देवी सर्व भूतेषु शक्तिरूपेण संस्थिता। नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मै नमो नमः।। या देवी सर्व भूतेषु मातृरूपेण संस्थिता। नमस्तस्मै नमस्तस्मै नमस्तस्मै नमो नमः।।**" ज्या ज्या प्राण्यांत लैंगिक प्रजोत्पादन होतं त्या त्या प्रत्येक प्राण्याच्या जन्माची कथा एकच असते. त्या प्राणी-प्रजातीचे नर आणि मादी एकत्र येतात. मादीच्या शरीरात तयार झालेल्या बीजांडात पुरुषाच्या शरीरातल्या असंख्य शुक्राणूंपैकी एक प्रवेश करतो. त्याला फलन प्रक्रिया अर्थात फर्टिलायझेशन म्हणतात. या फलित बीजाचा गुणाकार होत जातो. म्हणजे एका पेशीच्या दोन पेशी, दोनाच्या चार, चाराच्या आठ




अशा गतीनं वाढतात. पेशींचा तो गोळा मातेच्या गर्भाशयाच्या मऊसूत भिंतीला जोडला जातो. त्यातून भ्रूण आणि पुढे अर्भक विकसित होत जातं. प्रत्येक पेशीला जिवंत राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी ऊर्जेची आवश्यकता असते. ही ऊर्जा अन्न खाऊन पचवल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या अन्नरसाच्या इंधनातून मिळते. अन्नरसाला ऊर्जेत परिवर्तित करणारी जी काही यंत्रणा प्रत्येक पेशीत कार्यरत असते तिला आजच्या आधुनिक जीवशास्त्रात मायटोकॉन्ड्रियन म्हणतात. प्रत्येक पेशीत हा घटक असतोच असतो आणि त्याला पेशीचं शक्तिकेंद्र म्हणजे पॉवर हाऊस म्हणतात. यातलं वैज्ञानिक सत्य असं की फलनप्रक्रिया होत असताना पित्याचा शुक्राणू फक्त गुणसूत्राचा अर्धा भागच देऊ करतो.


उदाहरणार्थ मनुष्य प्राण्यात गुणसूत्रांच्या एकूण २३ जोड्या म्हणजे ४६ गुणसूत्रं असतात. त्यापैकी वडिलांकडून २३ आणि आईकडून २३ घेऊन भ्रूणाच्या ४६ गुणसूत्रांच्या २३ नव्या जोड्या तयार होतात. बाळाच्या जडणघडणीत वडिलांचा वाटा इतकाच असतो. पेशीचे उरलेले सगळे घटक आईच्या बीजांडाचे असतात. अर्थातच पेशीचं शक्तिस्थान असलेलं मायटोकॉन्ड्रियन हे देखील आईच्या बीजांडाचंच असतं. ज्या वेळी त्या एका पेशीचं विभाजन होऊन त्याच्या दोन पेशी होतात त्यावेळी आईच्या बीजांडात असलेच्या मायटोकॉन्ड्रियनची एक प्रतिकृती म्हणजे कॉपी तयार होते आणि त्या नव्या पेशीच्या शक्तिस्थळाचं काम करू लागते. (पान ६ वर)

# जो जस करहि, सो तस फल चाखा ।

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. ''अहो, वैभवचा डबा नेऊन देता का जरा कंपनीत? चेअरमन येताहेत म्हणून वैभव सकाळीच गेलाय कंपनीत. त्यामुळे त्याने डबा नेला नाही.'' ''ठीक आहे. देतो मी नेऊन.'' सुहासराव तयार झाले. 'वडिलांनी आमच्यासाठी काही केलं नाही.' हा चुकीचा समज त्याच्या मनात रुजला होता. नाना घरात मोठे. त्यामुळे दोन बहिणी आणि दोन भावांची लग्नं; शिवाय त्यांच्या दोन मुलींची लग्नंही त्यांनीच केली.

भावा-बहिणींकडून कधीही अपेक्षा बाळगली नाही. वैभवच्या मते त्याच्या वडिलांनी विद्यार्थ्यांकडून जर फी घेतली असती तर आज नाना पैशात लोळले असते. पण नानांचं तत्त्व होतं, ज्ञानदानाचे पैसे घ्यायचे नाहीत म्हणून. या त्यांच्या तत्त्वामुळेच




त्यांना अनेक पुरस्कार मिळालेत. पण वैभवच्या मते त्या पुरस्कारांनी घर थोडीच बांधता येतं? सुहासरावांनी सायकलला डबा अडकवला आणि भर उन्हात ते वैभवच्या कंपनीकडे निघाले. सात किलोमीटरवरच्या कंपनीत पोहोचेपर्यंत त्यांना चांगलीच धाप लागली होती. गेटवर सिक्युरिटी गार्डने त्यांना अडवलं. ''वैभव पाटील साहेबांना डबा द्यायचा होता. जाऊ का आत?'' ''आता नाही देता येणार...'' गार्ड म्हणाला, ''चेअरमनसाहेब आलेत. मिटिंग सुरू आहे. कोणत्याही क्षणी ते बाहेर येतील. तुम्ही बाजूला थांबा.'' सुहासराव दूर अंतरावर उन्हातच उभे राहिले. कुठेही सावली नव्हती. एक तास उलटून गेला. पाय दुखायला लागले म्हणून सुहासराव तिथेच एका तापलेल्या दगडावर बसणार तोच मिटिंग संपली. चेअरमन साहेबांच्या पाठोपाठ अधिकारी आणि वैभवही बाहेर आला. उभ्या असलेल्या वडिलांकडे पाहून तो मनात चरफडला. चेअरमन साहेबांनी गाडीचं दार उघडलं आणि तेवढ्यात त्यांचं लक्ष सुहासरावांकडे गेलं. ''ते समोर कोण उभे आहेत?'' त्यांनी सिक्युरिटीला विचारलं. ''आपल्या वैभव साहेबांचे वडील आहेत. जेवणाचा डबा द्यायला आलेत.'' सिक्युरिटीने घाबरल्या आवाजात सांगितलं. ''बोलवा त्यांना.'' नको ते घडलं होतं. वैभवच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या.

संताप व भीतीने डोकं फुटेल असं त्याला वाटू लागलं. सिक्युरिटीने आवाज दिल्यावर सुहासराव जवळ आले. चेअरमन साहेब पुढे होऊन त्यांच्याजवळ गेले. ''तुम्ही पाटील सर ना? डी. एन. हायस्कूलमध्ये तुम्ही शिक्षक होता?'' ''हो. तुम्ही कसं ओळखता मला?'' काही कळायच्या आत चेअरमन साहेबांनी सुहासरावांचे पाय धरले. सगळे अधिकारी आणि वैभवही ते दृश्य पाहून अवाक्? झाले. ''सर, मी आकाश जयस्वाल. तुमचा विद्यार्थी होतो. बघा तुम्ही मला घरी शिकवायला येत होतात.'' ''हो. हो. आठवलं.

बाप रे बरेच मोठे झालात की तुम्ही...'' चेअरमन हसले. मग म्हणाले, ''सर, तुम्ही इथे उन्हात काय करताय? चला आतमध्ये बसू. खूप गप्पा मारायच्यात तुमच्याशी. सिक्युरिटी तुम्ही यांना आत का नाही बसवलंत?'' सिक्युरिटीने शरमेने मान खाली घातली. ते पाहून सुहासरावच म्हणाले, ''त्यांची काही चूक नाही. तुमची मिटिंग चालू होती. तुम्हाला त्रास नको म्हणून मीच बाहेर थांबलो.'' चेअरमन साहेबांनी सुहासरावांचा हात धरला आणि ते त्यांना आपल्या आलिशान चेंबरमध्ये घेऊन गेले. ''बसा सर.'' आपल्या खुर्चीकडे बोट दाखवत चेअरमन म्हणाले. ''नाही. नाही. ती खुर्ची तुमची आहे.'' सुहासराव गडबडून म्हणाले. ''सर, तुमच्यामुळे ती खुर्ची मला मिळालीय. तेव्हा पहिला हक्क तुमचा.'' चेअरमन साहेबांनी बळजबरीनेच त्यांना आपल्या खुर्चीत बसवलं. ''तुम्ह-ाला माहीत नसेल पवार सर..'' जनरल मॅनेजरकडे पाहत चेअरमन म्हणाले, ''पाटील, सर नसते तर आज ही कंपनी नसती आणि मी माझ्या वडिलांचं धान्याचं दुकान सांभाळत बसलो असतो. शाळेत असताना मी अतिशय 'ढ' विद्यार्थी होतो.

कसाबसा ढकलत शाळेने मला नववीपर्यंत आणलं. शहरातल्या सर्वोत्तम क्लासेसमध्ये मला टाकलं गेलं. मला शिकण्यातच गोडी नव्हती. त्यातून श्रीमंत बापाचा लाडका लेक. दिवसभर शाळेत माऱ्यामाऱ्या करायच्या आणि संध्याकाळी क्लासेस चुकवून मूव्ही पाहायच्या हे माझे उद्योग. आईला ते सहन होईना. त्यावेळी पाटील सर कडक शिस्तीचे आणि उत्कृष्ट शिकवणारे म्हणून प्रसिद्ध होते. आईने त्यांच्याकडे जाऊन मला शिकवण्याची विनंती केली. पण सरांच्या छोट्याशा घरात बसायला जागा नव्हती, म्हणून सरांनी नकार दिला.

आईने सरांच्या विनवण्या केल्या आणि आमच्या घरी येऊन शिकवायची विनंती केली. मागाल ती फी देण्याची तयारी



दाखवली. सरांनी फी घ्यायला नकार दिला, पण आढेवेढे घेत घरी येऊन शिकवायला तयार झाले. पहिल्या दिवशी सर आले. मी नेहमीप्रमाणे खोड्या करायला सुरुवात केली. सरांनी मला चांगलं बदडून काढलं. मी मुकाट्याने बसायला सुरुवात केली. तुला सांगतो वैभव, पहिल्याच आठवड्यात मला अभ्यासात गोडी वाटायला लागली. नंतर तर अभ्यास केल्याशिवाय मला करमायचं नाही. सर इतके छान शिकवायचे की इंग्रजी, गणित, सायन्स हे विषय जे मला कठीण वाटायचे ते सोपे वाटायला लागले. सर कधी आले नाहीत तर मला अस्वस्थ वाटायचं.

नववीत मी वर्गात दुसरा आलो. आई-वडिलांना खूप आनंद झाला. मी तर हवेत तरंगत होतो. दहावीत मी सगळे क्लासेस सोडले आणि फक्त पाटील सरांकडे शिकू लागलो. दहावीत मेरिटमध्ये येऊन मी सगळ्यांना आश्चर्याचा धक्काच दिला. मी आई-वडिलांसोबत सरांकडे पेढे घेऊन गेलो. वडिलांनी सरांना एक लाखाचा चेक दिला. सरांनी तो घेतला नाही. सर त्या वेळी काय म्हटले ते अजूनही माझ्या लक्षात आहे. सर म्हणाले, 'मी काहीही केलेलं नाही. तुमचा मुलगाच हुशार होता. मी फक्त त्याला मार्ग दाखवला; आणि मी ज्ञान विकत नाही, मी ते दान करतो.' नंतर मी सरांच्या मार्गदर्शनाखालीच बारावीत परत मेरिटमध्ये आलो. पुढे बी. ई. झाल्यावर अमेरिकेत जाऊन एम.एस. केलं आणि आपल्याच शहरात ही कंपनी सुरू केली.

एका दगडाला सरांनी हीरा बनवलं. मीच नाही तर सरांनी असे असंख्य हिरे घडवले आहेत. सर तुम्हाला कोटी कोटी प्रणाम...!'' चेअरमन साहेबांनी डोळ्यांत आलेलं पाणी रुमालाने पुसलं. ''पण कमालच म्हटली पाहिजे. बाहेर शिक्षणाचा आणि ज्ञानदानाचा बाजार भरलेला असताना एक रुपया न घेता हजारो विद्यार्थ्यांना शिकवणं, नुसतं शिकवणं नाही तर त्यांच्यात अभ्यासाची गोडी निर्माण करणं. व्वा सर, मानलं तुम्हाला...'' जीएम म्हणाले. ''अहो सर, ही माणसं तत्त्वनिष्ठ होती. पैशाची, मानसन्मानाची भुकेली नव्हती. विद्यार्थ्यांचं भलं व्हावं हा एकमेव उद्देश असायचा.'' चेअरमन साहेब म्हणाले. ''माझे वडीलही त्यातलेच. 'एक वेळ उपाशी राहू, पण धान्यात भेसळ करून विकणार नाही' हे त्यांचं तत्त्व होतं. आयुष्यभर त्यांनी ते पाळलं. सचोटीचा व्यापार केला. त्याचा फायदा आज माझ्या भावांना होतोय.'' मग चेअरमननी सुहासरावांना विचारलं, ''सर, तुम्ही घर बदललंय की त्याच घरात राहता?'' ''त्याच जुन्या घरात राहतोय्? सर!'' सुहासरावांऐवजी वैभवनेच उत्तर दिलं. त्या उत्तरातील वडिलांविषयीची चीड चेअरमन साहेबांच्या लगेच लक्षात आली. ''ठरलं तर मग. सर आज मी तुम्हाला गुरुदक्षिणा देणार आहे. याच शहरात मी काही फ्लॅटस्? घेऊन ठेवलेत. त्यातला एक थ्री-बीएचके फ्लॅट तुमच्या नावावर करतोय सर...!'' ''काय्य?'' सुहासराव आणि वैभव एकाच वेळी ओरडले. ''नको नको.

एवढी मोठी गुरुदक्षिणा मला नकोय.'' सुहासराव निग्रहाने म्हणाले. चेअरमन साहेबांनी सुहासरावांचे हात हातात घेतले. ''सर, प्लीज.. नाही म्हणू नका. मला माफ करा. कामाच्या व्यापात तुमची गुरुदक्षिणा देण्यात मी खूप उशीर केला.'' मग वैभवकडे पाहत त्यांनी विचारलं, ''वैभव, तुझं लग्न झालंय?'' ''नाही सर, ठरलंय. जोपर्यंत मोठं घर होत नाही तोपर्यंत लग्न होणार नाही अशी सासरच्यांची अट होती. त्यामुळे अजून तारीख नक्की केली नव्हती आणि हॉलही बुक केला नव्हता.'' चेअरमनने फोन उचलला. कोणाशी तरी बोलले. मग समाधानाने फोन खाली ठेवून म्हणाले, ''तुमच्या मंगल कार्यालयाचं काम झालं. सागर लॉन्स माहीत आहे ना?'' ''सर, ते तर खूप महाग...'' ''अरे, तुला कुठे पैसे द्यायचे आहेत? अरे, सरांचे विद्यार्थी सरांसाठी काहीही करू शकतात. सरांनी फक्त शब्द टाकायला हवा. पण सर तत्त्वनिष्ठ आहेत ते तसं करणार नाहीत. या लान्सचा मालक सरांचाच विद्यार्थी आहे. त्याला मी शब्द टाकला. नुसता हॉलच नाही, तर जेवणासकट संपूर्ण लग्नच लावून द्यायची जबाबदारी त्याने घेतलीय... तीही मोठ्या आनंदाने. तुम्ही फक्त तारीख सांगा. '' ''खूप खूप धन्यवाद सर!'' वैभव अत्यानंदाने हात जोडत म्हणाला.

''धन्यवाद मला नाही, तुझ्या वडिलांना दे वैभव! ही त्यांचीच पुण्याई आहे आणि मला एक वचन दे वैभव, सरांच्या अंतिम श्वासापर्यंत तू त्यांना अंतर देणार नाहीस आणि त्यांना दुखा-वणार नाहीस. मला फक्त कळू दे तू त्यांना त्रास देतो आहेस. या कंपनीतून तुला डच्चू तर मिळेलच; पण अख्ख्या महाराष्ट्रात तुला कुठे नोकरी मिळणार नाही, याची मी व्यवस्था करीन.'' चेअरमन कठोर आवाजात म्हणाले.

''नाही सर. मी वचन देतो तसं होणार नाही.'' वैभव हात जोडत म्हणाला. संध्याकाळी वैभव घरी आला तेव्हा सुहासराव पुस्तक वाचत होते. उषाबाई जवळच भाजी निवडत होत्या. वैभवने बॅग ठेवली आणि सुहासरावांचे पाय धरले. ''नाना, मी चुकलो. मी तुम्हाला वाटेल ते बोलत होतो. मला माहीत नव्हतं नाना, तुम्ही इतके मोठे असाल.'' सुहासरावांनी त्याला उठवून छातीशी धरलं. आपला मुलगा का रडतोय हे उषाबाईंना कळेना. पण, काहीतरी नक्कीच चांगलं घडलंय म्हणून तर बापलेकात प्रेम उमळून आलंय हे पाहून त्यांचेही डोळे अश्रूंनी भरून आले. (साभार : सोशल मीडिया, लेखक अनामिक)

**शिकायचे काय ?**

असे तत्त्वनिष्ठ लोक आता कमी होत चाललेत. **कर्म प्रधान विश्व रचि राखा। जो जस करहि सो तस फल चाखा।।** गोस्वामी तुलसीदासजींनी 'रामचरित मानस'मध्ये लिहिलंय, तुम्ही जे काही कराल त्याचेच परिणाम तुम्हाला मिळतात, हा कर्मप्रधान सिद्धांत आहे. जे आपण देऊ ते अनेक पटींनी वाढून आपल्याकडे परत येतं हा सृष्टीचा नियम आहे. तेव्हा नेहमीच यथाशक्ती इतरांसाठी चांगले करत राहावे हेच उत्तम. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## तरशील पार । भवसिंधु ।।

सात्विका अंतरी । विचार सात्विक ।।
व्यवहार नेक । सुखकारी ।।१।।

विकारी बीजात । विकारीच वृक्ष ।।
स्वार्थाचेच लक्ष । यात करी ।।२।।

लालसेच्या पोटी । वासनेचा जन्म ।।
घडतो अधर्म । यात करी ।।३।।

पापी नराधमा । दंडही अघोरी ।।
नसे क्षणभरी । मन:शांती ।।४।।

येता हरिनाम । होईल उध्दार ।।
तरशील पार । भवसिंधु ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८



## गर्मीची लाट

ओसरली थंडी, मावळली दिवाळी पहाट
बसला उन्हाचा तड़ाखा, जाणवते गर्मीची लाट
झाले सिमेंटचे रस्ते, लागले रस्त्याकाठी गट्टू
मातीची कमतरता भासते, वाटते यातून कसे सुटू
कापली झाडं, वाळली जमीन,
ओसरली हिरवळ चूक केली भारी,
आता शरीराची होते कळवळ
कूलर, पंखे, एसी, गर्मीला मात देण्याची उपकरणें
यांचाच आभार मानावा,
घरात वापरून शांतपणे संपलं निष्ठूर मनाचन प्रेम,
कमतरली झाडांवरची माया अन् मनी लावली झाड,
नाही जगली, गेल निसर्गवाया
पशु, पक्षी, जनावर, जे जगत होते
याच झाडांवर आता कोसत आहे माणसाला कारण जगाव
लागते आहे उकाड्यावर कमी पाऊस,
ओसरल्या नद्या, जल संकट भारी शहरात टँकर,
गावात पाई, अशी नियते पाण्याची वारी
जर जपलं नाही पाणी तर वाटेल
त्याची उणीव पुढच्या पिढींना काय देणार,
याची होत नाही जाणीव
माणसाने केली प्रकृतीची छेडछाड
मग नक्कीच होणार अमंगल
ही माणसाची निष्काळजी,
तर गर्मीने केला दंगल सोडला निसर्गाचा साथ,
आता कशी होणार चंगल

विजय हरदास

# भरजरी शालू आणि पदर आध्यात्मिक जाणिवेचा...

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

संस्कृतीचा उगम आणि इतिहास जाणून घ्यायचा असेल तर अगोदर 'माणूस' समजून घ्यायला हवा. अतिप्राचीन काळापासूनचा त्याचा मनुष्यत्वाचा विलक्षण प्रवास डोळे भरून बघायला हवा. माणूस या प्राण्याचे रसायनच अजब आहे. माणूस नेहमी व्यक्त होतो, पण तो अव्यक्तही आहे. त्याला जेवढी भौतिकतेची ओढ आहे तेवढीच पारलौकिकत्वाची जाण आहे. तो अनेक भाषा जाणतो, पण शब्दाविण संवादूदेखील करू शकतो. अन्न, वस्त्र, निवारा त्याची गरज होती, पण या गरजांचा पाठलाग करताना दिव्यत्वाची जाणीव त्याच्या अंतर्मनात सतत तेवत होती.

निवारा शोधताना, वस्त्र विणताना, कंदमुळे खणताना याच पारलौकिक जाणिवेचे ठसे काळाच्या पायवाटेवर उमटत गेले आणि हजारो वर्षांच्या या पायवाटेची कालांतराने संस्कृतीची वहिवाट झाली. कंदमुळे खाणाऱ्या माणसाने डोक्यावरच्या छतासाठी झाडांच्या फांद्यांना गुंफलं. पानांना एकत्र विणून फळ-फुलं वेचण्यासाठी परडी तयार केली. याच जगण्याच्या अफाट धडपडीतून हाताने वस्त्र विणण्याची प्रेरणा त्याला मिळाली. त्याची जगण्याची अखंड धडपड, थंडीपासून बचाव करण्यासाठी नखांनी कुरतडून काढलेली झाडाची साल, पांघरलेली वल्कलं आणि असंख्य ठेचकाळणाऱ्या शतकांनंतर लागलेला कापसाचा शोध या अखंड संघर्षात वस्त्र संस्कृतीचा धागा ईश्वरीय मूलतत्त्वाशी बांधला गेला. हाताने वस्त्र विणण्यापूर्वी खोलवर त्याच्या मनात हे वस्त्र विणल्या गेलं. यामुळेच भारतीय तत्त्वज्ञानाशी आपली वस्त्र संस्कृती जवळीक ठेवून आहे. सूत किंवा धागा या शब्दापासून भारतीय तत्त्वज्ञानातील 'सूत्र' या शब्दाची उत्पत्ती झाली. आपल्या वस्त्र संस्कृतीत 'यंत्र' म्हणजे धागे विणण्याचे माध्यम आणि आध्यात्मिक परिभाषेत यंत्र म्हणजे ईश्वरापर्यंत पोहोचण्याचे प्रतीकात्मक माध्यम.

झाडामध्ये आणि झाडाच्या सालीमध्येही माणसाने कायम ईश्वर शोधला. संत कबीर तर खुद्द विणकर. ते भक्तीला धाग्याच्या वीणीची उपमा देऊन म्हणतात, 'जुलाहा नाम जपत फिरे, ताना बाना बिनें कहे कबीर सो जुलाहा, जनम अकारथ किनें' देवाचं नाव भक्तिभावाशिवाय घेतलं तर आयुष्याचा काय उपयोग? मनीचा भक्तिभाव हा ईश्वरीय दिव्य वस्त्राचा तानाबाना आहे. प्राचीन काळापासूनच स्त्रिया सर्जनशीलतेचे प्रतीक मानल्या जात. त्यांना प्रतीकात्मक स्वरूपात भूमीचे रूप मानल्या जाई. स्त्रियांनी विणलेले वस्त्र म्हणजे त्यांनी जन्माला घातलेले नवजात बाळ आणि पुरुषांनी विणलेले वस्त्र म्हणजे त्यांच्या पौरुषत्वाने गाजवलेला भलामोठा पराक्रम असा समज होता. तानाबान्यांनी निरनिराळे आकृतिबंध विणताना घराघरांतून विलक्षण नादब्रह्म निर्माण व्हायचे. हरी हरी, ओम ओम, या अली असे आवाज चारी बाजूंना दुमदुमायचे आणि एका विलक्षण ध्यानावस्थेतून वस्त्राचा



जन्म व्हायचा. आता हातमागाची जागा यंत्रांनी घेतली आहे त्यामुळे घराघरात ऐकू येणारं नादब्रह्म लोप पावले आहे. आपल्या मराठी संस्कृतीत 'देवांग पुराण' आणि 'साळी माहात्म्य पुराण' अशी दोन प्राचीन पुराणे आहेत, जी वस्त्र संस्कृतीचे धागे थेट महादेवापर्यंत पोचवतात. शिवाने ब्रह्मदेवाला विश्वनिर्मिती करायला सांगितली, पण जग निर्माण झाल्यावर माणसाला पांघरायला वस्त्रच नव्हतं.

देवल ऋषींनी विष्णूकडून धागा घेतला आणि मयासुराकडून चरखा घेऊन वस्त्र निर्मिती केली. साळी माहात्म्य पुराणामध्ये शिवाने जिभेतून जिव्हेश्वर निर्माण केले आणि याच जिव्हेश्वराने कैलासात मागाची स्थापना करून ब्रह्मदेवाकडून कापूस आणून वस्त्र निर्मिती केली. या पुराणांचे वैशिष्ट्य असे की, मागावरच्या वस्त्र निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया अतिशय तपशीलवार दिलेली आहे. विणकारांमध्ये दक्षिण



भारतातील पद्मसाळी पोचमपल्ली इकत, वेंकटगिरी, मंगलगिरी, उप्पडा, धर्मावरम् साड्यांच्या विणकामांमध्ये अग्रगण्य समजले जातात. त्यांच्याबद्दलची एक अतिशय लोभस कथा आहे. देवांनी मार्कंडेय ऋषींना त्यांच्यासाठी वस्त्र विणायला सांगितलं. मार्कंडेय ऋषींना यातलं काहीच माहिती नव्हतं. त्यामुळे त्यांनी स्वतःची यज्ञाहुती दिली. त्याच पवित्र राखेतून भावना ऋषी हातात कमळाच्या देठांचे धागे घेऊन प्रकटले. हेच ते कमळ जे विष्णूच्या नाभीतून वर आले आणि त्यावर सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाने विश्रांती घेतली. याच धाग्यांमधून वस्त्राचा जन्म झाला. वस्त्र संस्कृती प्राचीन काळापासूनच देवाशी नातं जोडण्याचा प्रयत्न करते. पूर्व पंजाबमधील बायकांच्या हातात पूर्वी सतत एम्ब्रॉयडरी विणण्याची सुई दिसायची. काही संप्रदायांमध्ये तर विशिष्ट नक्षीकाम केलेला कपडा सप्त नद्यांच्या पवित्र पाण्यामध्ये भिजवतात आणि अखेरच्या प्रवासात शरीर झाकण्यासाठी त्याचा वापर होतो.

अन्सारी म्हणजे बनारसी ब्रोकेडचे अतिशय कुशल विणकर. त्यांच्या घरात बायकांमध्ये बनारसी साड्यांच्या विणकामाचे गुपित पिढ्यान्पिढ्या पाळले गेले आहे. धाग्यांच्या लडी नववधू-नेच बाहेरच्या अंगणात धुवायच्या, वाळवायच्या असतात. त्यानंतर त्या लडींना घरात स्थान दिलं जातं. घरातल्या आतल्या शयनगृहात घरातल्या प्रमुख स्त्रीकडून हातमागावर धागा गुंडाळला जातो. प्रसूती दरम्यान पारंपरिक पद्धतीने जसं उकिडवं बसवलं जातं, त्याच पद्धतीने बसून ती प्रमुख बाई मागावर धागा गुंडाळत असते. जणू घरात नवीन बाळाचा जन्म होणार असतो. विणीला म्हणजेच 'लिखी'ला दैवी घटना मानण्यात येतं.

'इकत' वस्त्र विणणे ही अतिशय प्राचीन 'टाय अ‍ॅण्ड डाय' कला आहे. संपूर्ण विणलेल्या इकत वस्त्राला अतिशय पवित्र समजले जाई. अनेक आजार बरे करण्यासाठी त्याचा उपयोग होई. धाग्यांना रंग लावण्याचं काम घरोघरी बायकाच करीत. रानोमाळी फिरून मुळे, फुले, वनस्पती, नैसर्गिक खनिजे, कीटके एकत्र करून रंग तयार केले जात. रंग तयार करण्याची गूढविद्या होती आणि काहींनाच ती अवगत होती. पाटणचा दुहेरी इकत पटोला हे अतिशय पवित्र वस्त्र डेक्कन प्रांताहून गुजरातमध्ये स्थिर झालेले साळवी शतकानुशतके विणत आहेत. इकत वस्त्र तयार करताना राहिलेले शेवटचे धागे ते मेहसाणा जिल्ह्यातल्या त्यांच्या देवीला तिच्या दारातले तोरण म्हणून अर्पण करतात.

इकत, पाटण पटोला वस्त्र कितीही जुने झाले तरी कधीच घरातून बाहेर टाकायचे नाही ही परंपरा होती. कारण त्यामध्ये दिव्यत्वाचा वास असतो. अजूनही बऱ्याच घरांमध्ये ही परंपरा पाळली जाते. त्या जीर्ण झालेल्या वस्त्राची लहान बाळांसाठी गोधडी शिवतात किंवा बाळाला नजर लागू नये म्हणून धुडकं पाळण्याला लावून ठेवतात. धुडक्याच्या चिंध्या निघाल्या की, त्या गुलाबजलात भिजवून शुद्ध तूप आणि कापराने जाळून बाळासाठी काजळ तयार होतं. केरळमध्ये भद्रकाली देवीला पुजण्यासाठी पटोलाचा म्हणजेच वेरली पट्टूचा उपयोग होतो. ओडिशामध्ये विचित्रपुरी इकत साडी वधूला लग्नामध्ये होमात नेसवतात. इकत विणायची पद्धत अतिशय प्रभावी व जादुई आणि या दिव्य वस्त्रामुळे माया, मोह मनाला स्पर्श करू शकत नाही, असा आपल्या पूर्वजांना विश्वास होता.

गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा या राज्यांमध्ये 'इकत' वस्त्र तयार होतं. महाराष्ट्र पैठणी साड्यांमुळे ओळखला जात असेलही, पण पैठणीव्यतिरिक्त महाराष्ट्राची प्राचीन वस्त्र परंपरा केवळ अद्भुत आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्राचीन मराठी वस्त्र परंपरेत इकत तंत्रही आपल्या विणकरांना माहीत होतं. अचलपूर जिल्ह्यात सापडलेली 'जोठ' साडी याची साक्ष आहे. गर्भरेशमी साडीवर रुई फुले, कळस आणि चक्क इकतची किनार आहे. इकत रंगलेपन पद्धती म्हणजे पहिल्यांदा रंग चढवला जातो आणि नंतर विणलं जातं. अतिशय कठीण अशी ही वस्त्र निर्मिती वऱ्हाडातल्या अचलपुरात विणकरांना माहीत होती. बहुतांशी दाक्षिणात्य राज्यांमध्ये आपण पाहतो की, पूजेच्या कापडावर चौकोन (ग्रीड) काढलेले असतात. याला चौक म्हणतात. मंदिराच्या उभारणीचे मापकही चौक असते. हा चौक ब्रह्मांडाचे प्रतीक म्हणून पूजेच्या वेळी देवता स्थानासाठी वापरला जातो. महाराष्ट्रातही चौकडा प्रसिद्ध आहेच. सुती कापडाचे, गव्हाळ किंवा मवाळ रंगातले गोडी लुगडे वऱ्हाडात प्रसिद्ध होतेच. ठेच कापडाचे, घट्टसर विणलेले, गडद रंगातले खानदेशी चौकड्याचे लुगडेही पूर्वी फार लोकप्रिय होते. पंढरपुरी चौकडा विठ्ठल-रखुमाईच्या भक्तीने ओतप्रोत भरलेला तर कोल्हापुरी बारीक चौकडा महालक्ष्मीच्या लाल हिरव्या चुड्याचा रंग ल्यायलेला. अथर्ववेदात एका दृष्टांतात दोन बहिणी शुक्र व कृष्ण धागा विणत आहेत. या बहिणी विवस्वान विणतात. म्हणजेच दिवस आणि रात्रीचा धागा विणणाऱ्या या दोन बहिणी काळाची चादर विणत आहेत. विश्वाच्या द्वैत्वात्मक एकतेचे दर्शन घडवणारा हा प्रसंग. कृष्ण धागा म्हणजे रात्र आणि शुक्र धागा म्हणजे दिवस. तानाबानाच्या विणीमधून विश्वरूप दर्शन घडवणारी आपली वस्त्र संस्कृती अशी ब्रह्मदेवाच्या सृष्टी निर्मितीशी जोडली गेली आहे. अशा प्रकारे

# बदललेल्या ऋतूचे संदर्भ: ग्रीष्म

उन्हाची काहीली सहन होण्यापलीकडे गेली आहे. पान गळत असताना उरलेल्या पानांना भाजून काढण्याचे काम काम सूर्याला कोणी दिले असावे? असा प्रश्न निर्माण होत आहे. काल परवापर्यंत जी हिरवळ डोळ्यात मावत नव्हती ती पिवळ्या रंगात परिवर्तित झालेली आहे. नाही म्हणायला अंगावरील हिरवे वस्त्र उतरवून लालबुंद वस्त्राचा साज घेऊन गुलमोहर उभा आहे. हा गुलमोहर पाहिला की लहानपणापासून फुलो की छावमे ही संकल्पना या झाडाच्या सावलीत उभे राहिल्यावर चित्रपट सृष्टीत रुजू झाली असावी असे वाटते.

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६





रणरणत्या उन्हात झाडावर एकही पान नसताना लालबुंद फुलांनी बहरून आलेल्या गुलमोहराची गर्द छाया आम्ही लहानपणी खेळण्यासाठी वापरत असू, त्यातही त्या झाडावर चुकून माकुन चार दोन वाळलेल्या गुलमोहराच्या शेंगा असल्या तर त्या पाडायच्या आणि त्या हातात घेऊन लुटपुट अशी लढाई करताना जो रंगाने सर्वात गोरा आणि दिसायला गोरापान असेल अश्या त्या गफ्फार किंवा रफिक नावाच्या मुलाला शिवाजी करून त्याच्या अधिपत्याखाली आपण तानाजी आणि बाजीप्रभू होण्यात आम्हाला त्या काळात कसलाही कमीपणा वाटत नसे. कालांतराने एका सांस्कृतिक कार्यक्रमात शिवाजी कोण असावा? यावर शिक्षकांचा झालेला खल आणि चर्चा पाहून माझ्याच एका कवितेत...

**जातीयतेचा पाहिला इथे मी रंग नवा,**
**नाटकातील शिवबाही त्यांना जातिवंत हवा!**

असे लिहिण्याची वेळ आली. अर्थात आमचे बालपण ग्रीष्माच्या उन्हाच्या भट्टीत तापलेले असले तरी आजच्या काळातील जातीयता आणि धर्मांधता यांनी काळवंडलेले नव्हते याचे आजही समाधान आहे. जितके निकोप आणि निर्मळ बालपण आपल्याला मिळाले तितकेच निर्मळ आणि निकोप बालपण आपल्या भावी पिढीला देणे हे आपले कर्तव्य आहे हे आजच्या पालकांनी समजून घेतले पाहिजे अन्यथा येणारा काळ फार कठीण आहे.

ग्रीष्म ऋतूत गुलमोहर पळस शाल्मली किंवा शर्वरी अशा झाडांवरची लाल गर्द फुले तिथे मनाला मोहून टाकतात तेथेच कुठेतरी एखादा दुसरा पिवळा पळस, पिवळा गुलमोहर विलक्षण अनुभूतीतून दुर्मिळतेचा साज घेऊन उभा असतो. असाच सोन्याचा पिवळा साज अंगावर घेऊन उभा असतो तो बहावा, बहाव्याच्या पिवळ्या फुलांचे घोस फुलांच्या सौंदर्य समृद्धतेचे दर्शन घडवत असतात. वसंतातील चैतन्य ग्रीष्माच्या आगमनासोबत ओसरून जायला सुरुवात झालेली असते.

वसंतातील अल्हाददायक ऊन पाहता पाहता जीवाची काहिल वाढवणारे आणि अस्वस्थ करणारे होऊ लागते. वड पिंपळ यासारखी झाडे आपली पाने गाळून नव्या पालवीसह उन्हात थकलेल्या मुसाफिरासाठी सावली घेऊन सज्ज असतात. पिंपळाच्या नव्या पालवीत मध्येच डोकावणारे लालसर पान अधिक आकर्षक होत जाते. एखाद्या पानाला लालबुंद असा रंग लाभल्यावर तर तो रंग डोळ्यात जतन करावा की मनात असा प्रश्न पडतो. वसंतात आलेल्या आंब्याच्या मोहराला आंब्यात परिवर्तित झालेले पाहून उन्हाळ्याची लज्जत कशात आहे? हे वेगळे सांगावे लागत नाही. त्या हिरव्या कैर्यांमधून एखादा पाड झाडाची साथ सोडून खाली पडला की, त्याचे नैसर्गिक रीतीने पिकणे किती मोलाचे आहे याची जाणीव ताजा पाड खाल्ल्यावरच होते. माझ्या सुदैवाने माझे आजोबा पोस्टमन असताना देऊळगाव कुंडपाळ या आमच्या मूळ गावी वतनातून आलेल एक आंब्याचं झाड आमच्यासाठी प्रसन्नपणे उभे होते. या आंब्याचे नावही महार आंबा असे होते. यावरून ग्रामीण भागात माणसं तर सोडा झाडांना सुद्धा जातीचे बिरुद लावणारी व्यवस्था या महाराष्ट्रात कार्यरत होती असे दुर्दैवाने म्हणावे लागते. आंबा प्रमाणापेक्षा जास्त गोड असल्याने या आंब्याचा झाडावरच सौदा करून २५ टक्के आंबा आजोबाच्या घरी व ७५ टक्के आंबा व्यापार्याकडून बाजारात विकला जाई. लोणारच्या बाजारात घ्या आंबा पाच रुपये सतरा असे व्यापारी आरोळी देत आणि नऊवारी लुगड्यातील बायांसह अनेक माणसाची झुंबड त्याच्या भोवती जमा होईल पाहता पाहता आंबा विकल्या जाई. अक्षय तृतीयेला खास घरातले पितर आंब्याचा रस जेवून जात. पुढे आजोबांचे हे गाव सुटले आणि काही वर्ष तो आंबा ठराविक वाट्याप्रमाणे आमच्याकडे येत राहिला. मग दोन-चार वर्ष गेल्यावर तो पिकला नाही अशा सबबीखाली त्याचा आमचा संबंध तुटला. आंबे घेताना दोन रुपये पासून दहा रुपये सतरापर्यंत मेहकरच्या बाजारात विकत मिळत असत. किलोच्या आणि डझनाच्या मापाने आंबा आम्ही लहानपणी विकत घेतला नाही. सहा-सहा पाच असे तीन वेळा सतरा आंबे मोजताना आंबे विकणाऱ्या बाया माणसांची आम्हाला दिसत असे. त्यातही अनेकदा सहा रुपयाची सतरा आणि तीन रुपयाचे नऊ असा काही भाव असल्याने दोन वेगवेगळ्या दुकानातून नऊ नऊ असे आंबे घेऊन सहा रुपयात अठरा आंबे घरी नेले की सहाव्या सातव्या वर्गात असूनही आमचे व्यवहार ज्ञान किती चांगले आहे ह्याचे कौतुक घरी आलेल्या पाहुण्याला आमरसाचा पाहुणचार वाढताना होत असे.

आज ग्रीष्मातील ऊन कायम असले तरी लहानपणचा तो आमरसाचा गोडवा हरवला आहे. पाहुण्यांची वर्दळ निश्चितच रोडावली आहे. झाडावर नैसर्गिक रीतीने विकणारा आंबा अकाली तोडून रासायनिक प्रक्रिया करून पिकवून आपल्या माथी मारला जात आहे. आग ओकणार सूर्य संपूर्ण सृष्टीला त्राही त्राही करून सोडत असताना गावाबाहेरच्या नद्या आटल्या आहेत. नदीच्या काठावर आपल्या मालकीचा दगड रोवून त्यावर घरचे कपडे धुताना एकमेकीच्या सुखदुःखाचे देवाणघेवाण करणार्या बाया दिसणे दुरापास्त झाले आहे तसेच खळखळत्या नदीत सूर मारून पोहणारी पिढी वॉटर पार्क नावाचा आनंद विकत घेत आहे.

ग्रीष्मातले ऊन स्तब्ध राहून निशब्द पणे आपले कार्य करत राहते तसेच आहे ऐन उन्हात जन्माला येऊन जीवनाचा दाह कमी करणारे तथागत गौतम बुद्ध यांचा जन्म वैशाखी पौर्णिमेचा, म्हणून तिला बुद्ध पौर्णिमा म्हणूनच साजरे केले जाते. याच पौर्णिमेच्या दिवशी इंग्रज राजवटीपासून प्राणी गणना केली जाते. जंगलातील जंगली प्राणी मोजण्याचे काम बुद्ध जयंतीच्या दिवशी केले जाते यामागे बुद्धाची अहिंसा तत्व आणि बुद्धाच्या मनातील अथांग करुणा असे कारणे अनेकदा आम्ही ऐकली. त्या कारणाशिवाय ग्रीष्मात पाण्याचे साठे मोजकेच असतात, शिवाय वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी चंद्राचा भरपूर प्रकाश असतो. त्यामुळे पाण्याच्या साठ्याजवळ येणारे प्राणी सहज मोजले जातात. त्यामुळे त्या दिवशी प्राणी गणना केले जात असावी, असेही वाटते.

काळ बदलत आहे तसे जगण्याचे संदर्भ बदलत आहेत. निसर्गाचे आणि आपले ऋणानुबंध जसे जसे दुरावत गेले तसे तसे ऋतुचक्र सुद्धा बदलत गेले आहे. ऋतू आपली मर्यादाची कालकक्षा सोडून आपल्या वर्तनातील परिवर्तन दाखवत आहेत असा अनुभव आपल्याला येत आहे. चैत्रातील कौतुकाचे ऊन संपून पाहता पाहता ग्रीष्मातला प्रखर उन्हाळा समोर उभा राहिला की, एखाद्याचा उन्हाळा होतो म्हणजे काय? ह्या वाक्यप्रचाराचा अर्थ समजायला लागतो.

पळसाचा फुललेला फुलोरा झडून जाऊन त्याला हिरव्या पिवळ्या शेंगा लगडलेल्या दिसतात. शेंगाचा भर ओसरून पळसाच्या पानांना हिरवा गर्द तजेला आलेला दिसून येतो. साधारणपणे तीस-चाळीस वर्षांपूर्वी केळीच्या पानावर किंवा पळसाच्या पात्रावर उठणार्या पंक्ती आता दिसत नसल्या तरी उन्हाळ्यामध्ये अक्षय तृतीयेच्या निमित्ताने घरी येणारे सर्व पितर अजूनही पळसाच्या पात्रावर जेवत असावेत असा काही विचार करून बाजाराच्या कोपऱ्यावर पळसाचे पात्र घेऊन बसलेला एखादा खेडूत व्यापारी दिसला की मला अजूनही जुन्या काळात फिरून आल्यासारखे वाटते. आजच्या ह्या काळामध्ये कुलरच्या कोंदट हवेत झोपल्यापेक्षा खाट टाकून घराच्या अंगणात तारे मोजत, गप्पा मारत, अंगावर शहारा येईपर्यंत एखाद्या भुताचे किस्से ऐकण्यात जी मजा होती ती आता टीव्ही आणि मोबाईलवरील कोणत्याही कार्यक्रमात येत नाही हे आपल्याला कळत असतं. ग्रीष्माच आगमन झाल म्हणजे घराघरात कुलरचे पाते भिरभिरणार, पंख्याची हवा नकोशी वाटणार, फ्रिजमध्ये पाण्याच्या बाटल्या भरून ठेवण्यासाठी घरातील लहान मुलांना कामाला लावले जाणार, कुलरमध्ये पाणी टाकावे आणि रणरणत्या उन्हाला आपल्यासमोर खुजे करावे असे वाटत असताना नवव्या दहाव्या दिवशी येणारे नळ आपल्याला पाण्याच्या बचतीचे महत्त्व समजून सांगायला लागत असतात. स्वतःच्या मालकीचे बोअरवेल असली तरी त्यातील पाण्याच्या साठ्यावर आपले मालकी नाही याची जाणीवही उन्हाळ्यातच होते. त्यातच विद्युत बिलाने बाहेरच्या उन्हाशी आपल्याला घाम फोडायला सुरुवात केलेली असते. बाजारातील भाजीपाला जितका महाग तितकाच बेचव लागत असतो.

ग्रीष्मातला ऊन जीवाची तगमग वाढवणार असतं यात शंका नाही. पण याच ग्रीष्मात जगण्याची प्रेरणा देणारी शक्ती असते. वीस रुपयाच्या प्लास्टिकच्या बॉटलमध्ये पाणी विकत घेण्याची सवय झाल्यामुळे एकेकाळी पाच-सहा रांजण भरून ठेवून साखरदंडाने बांधलेले ग्लास आणि तेथे सेवाभावी पाणी वाटणारा सदगृहस्थ असे पाणपोइचे चित्र दुर्मिळ होत असले तरी पूर्णपणे नष्ट झाले नाही याचे समाधान आहेच. उन्हाळ्याच्या दिवसात माठात खडे टाकून पाणी पिणारा कावळा आज प्रत्यक्षात कमी प्रमाणात दिसत असला तरी त्याची गोष्ट मात्र अजूनही सर्व दूर सांगितली जाते. कावळा आणि इतर पक्षांची आपण किती काळजी करतो? हा प्रश्न वेगळा असला तरी चिमणीसाठी घराघरात पाण्याची सोय करून ठेवण्याचे दिवस असतात ग्रीष्मा मधले...! **(पान ६ वर)**

पान१ वरून

## चीनी वर्चस्वाला अमेरिकन प्रतिकार

हाँगकाँग, जपान, जर्मनी आणि दक्षिण कोरिया ही होती. चीनची निर्यातीवर आधारित अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात, सागरी वाहतुकीवर अवलंबून आहे. जागतिक व्यापाराच्या ८५ टक्क्यांपेक्षा जास्त व्यापार समुद्रमार्गे होतो. इलेक्ट्रॉनिक्सपासून ते कच्च्या मालापर्यंत, चीन जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा भाग आहे. चीन या पुरवठा साखळीचा शस्त्र म्हणून वापर करू शकतो आणि पुरवठा अचानक थांबवून, कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा धोका निर्माण करू शकतो. अमेरिका या अवलंबत्वाला एक धोरणात्मक असुरक्षितता मानते, जी संघर्ष किंवा संकटाच्या वेळी आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण करू शकते. हाच धोका भारत आणि जगासाठीही आहे.

**अमेरिकेचा दृष्टिकोन आणि धोरणात्मक उद्दिष्टे-**

अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी स्पष्ट केले की, जहाजे आणि शिपिंग हे अमेरिकेच्या, जगाच्या आणि भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि व्यापाराच्या मुक्त प्रवाहासाठी महत्त्वाचे आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या या कृतीचा उद्देश चीनचे वर्चस्व कमी करणे, पुरवठा साखळी सुरक्षित करणे आणि अमेरिकेत तयार होणाऱ्या जहाजांच्या बांधणीला, प्रोत्साहन देणे आहे. अमेरिका प्रशासनाच्या व्यापक धोरणात चीनमध्ये तयार झालेल्या पोर्ट क्रेनवर, १०० टक्के कर आकारण्याचाही समावेश आहे, जो सध्या चीनचे वर्चस्व असलेल्या पायाभूत सुविधांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**जागतिक चिंता आणि पुरवठा साखळीतील अडथळे-**

अमेरिकेच्या प्रस्तावित बंदर शुल्कामुळे, चीनला मोठा फटका बसू शकतो. यामुळे जहाजांचे मार्ग बदलण्याचीही शक्यता आहे. कारण, अमेरिकेला जाणारी जहाजे आता बिटन आणि युरोपातील बंदरांकडे वळवली जाऊ शकतात. कारण, जास्त आयातशुल्क भरणे कोणालाच आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसेल.

'लॉजिस्टिक्स फर्म फ्लेक्सपोर्टचे सॅन मॅण्डर्स' यांनी इशारा दिला आहे की, मार्गात बदललेल्या जहाजांमुळे युरोपातील बंदरे लवकरच जास्त मालाने भरून जातील. युरोपियन अर्थव्यवस्थेवर याचाही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. या बदलांमुळे चीनचा शिपिंग खर्च वाढू शकतो आणि जगभरातील चिनी मालाच्या वितरणात विलंब होऊ शकतो. ज्यामुळे औद्योगिक उत्पादनांपासून ते ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंत, सर्वच गोष्टींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. ही भारतासाठी एक संधी ठरू शकते.

**चीनचा प्रतिसाद -**

चीनने अमेरिकेच्या या उपायांना संरक्षणवादी आणि जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अस्थिर करणारे धोरण म्हणून निषेध केला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान म्हणाले, अमेरिकेच्या या कृती जागतिक उत्पादन आणि पुरवठा साखळीत अडथळा निर्माण करतात. या उपायांमुळे, अमेरिकेतील जहाजबांधणी उद्योगाला पुनर्जिवित करण्यात यश मिळणार नाही.

**अमेरिकेतील देशांतर्गत प्रतिक्रिया-**

या निर्णयावर, अमेरिकेत संमिश्र प्रतिक्रिया दिसून येत आहेत.'युनायटेड स्टीलवर्कर्स आणि इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ मशिनिस्ट्स' यांसारख्या कामगार संघटनांनी, या निर्णयाचे समर्थन केले आहे. कारण, ते या धोरणाला अमेरिकेतील जहाजबांधणी उद्योगाला पुन्हा चालना देणारे, रोजगार निर्माण करणारे धोरण म्हणून पाहतात. तर, 'अमेरिकन पेरल ॲण्ड फूटवेअर असोसिएशन'सारख्या व्यापारी गटांनी असा युक्तिवाद केला आहे की, या शुल्कामुळे व्यापाराचे प्रमाण कमी होईल आणि अमेरिकन ग्राहकांसाठी खर्च वाढेल. दि. १९ मे रोजी होणाऱ्या सुनावणीत, जहाज-टू-शोअर क्रेन, चेसिस आणि संबंधित उपकरणांवरील प्रस्तावित शुल्कांवर विचार केला जाणार आहे.

**भारताची भूमिका आणि आव्हान-**

भारतालाही चीनच्या वाढत्या प्रभावामुळे, आर्थिक सुरक्षिततेबद्दल चिंता वाटू लागली आहे. भारताने आपल्या बंदरांच्या विकासावर आणि जहाज बांधणी उद्योगावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**पुढील मार्ग-**

अमेरिका आपल्या सागरी उद्योगाला पुन्हा एकदा मजबूत करण्यासाठी, शुल्क आणि आयातशुल्काचा वापर करण्याचा विचार करत आहे. मात्र, जहाज बांधणीमध्ये आणि जागतिक व्यापार पुरवठा साखळीत चीनला वगळून स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी, अमेरिकेला आणि भारताला खूप प्रयत्न करावे लागतील.

जागतिक शिपिंगमध्ये चीनचे वर्चस्व हे एक गंभीर आव्हान आहे. अमेरिकेला आणि भारताला आपल्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी आणि व्यापाराच्या मुक्त प्रवाहासाठी चीनच्या वर्चस्वाला सामोरे जावे लागेल. यासाठी अमेरिकेला आणि भारताला इतर देशांसोबत भागीदारी करणे आवश्यक आहे. तसेच, त्यांना आपल्या जहाज बांधणी उद्योगात गुंतवणूक करणेही आवश्यक आहे.

## धर्मत्यागाचे वाढते लोण

उशिरा विवाह, विवाहविरोधी वाढती प्रवृत्ती, एकल पालकत्व यांसारख्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या नावाखाली भारतीय कुटुंबव्यवस्थाच नष्ट करण्यास प्रोत्साहन दिले जाते. परिणामी, भविष्यात धर्म आणि संस्कृती यांचे हस्तांतरण करणार्या पिढ्यान्पिढ्यांच्या शृंखलेत मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातच आता मोबाईल आणि समाजमाध्यमांची सत्ताकेंद्रे उदयाला आली आहेत, जेथे डाव्यांना आपले वैचारिक राजकारण साधणे सहजसुलभ झाले आहे. 'धर्म न मानणे' हे वरवर पाहता व्यक्तिस्वातंत्र्याचे प्रतीक वाटले, तरी प्रत्यक्षात ती मूल्यशून्यता, सांस्कृतिक पोकळी आणि सामाजिक विस्थापनाची सुरुवात आहे. स्वत्व गमावलेली पिढी कोणतीही पर्यायी व्यवस्था न स्वीकारता, फक्त विरोधाच्या नावाखाली स्वतःच्या अस्तित्वाशीही संघर्ष करताना दिसत आहे. हिंदू धर्माच्या संदर्भात हे अधिक गंभीर ठरते. कारण, हा धर्म सहिष्णुतेचा, समन्वयाचा आणि विवेकनिष्ठ आत्ममंथनाचा धर्म आहे. त्यामुळेच त्यात धर्मत्यागाची गती कमी असली, तरी हे वेड अधिक वेगाने पसरत आहे. संशोधनात सांगितलेल्या दोन धर्मांप्रमाणे धर्मत्यागाचे वेड सर्वत्र पसरले नसले, तरीही डाव्यांनी पोसलेला स्वैराचाराचा राक्षस ही जगातील सर्व धर्मांसाठी ती एक चिंतेची बाब नक्कीच आहे!

## कथा

आल्हाद देशमुख

सपाटून भूक लागलेली. बायको पिठले-खिचडीशिवाय दुसरे काहीच रांधत नसणार. मुलगी त्या खाण्याला कंटाळून, मॅगी खाऊन निजलेली. त्याने गाढ झोपलेल्या निष्पाप मुलीकडे पाहिले. किती गोंडस, कोवळा रेखीव चेहरा तिचा. त्याने मायेने तिच्या कपाळावरून हात फिरवला. नेमका तेव्हाच त्याचा मोबाईल वाजला. मुलीची झोपमोड होईल म्हणून तो घाईत दूर सरकला खरा; पण उठूनच बसली मुलगी त्या तेवढ्या आवाजाने. ओह! फोनवरचे बोलणे ऐकून त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्याने मोबाईल म्यूट केला आणि आत पाहात ओरडला, ''अगं, ऐकतेस का गं, माझ्या काव्यसंग्रहाला नाशिकच्या राज्यस्तरीय संस्थेचा सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार मिळाला.''

पत्नी आनंदाने त्याच्या जवळ आली. आपले तिखटमिठाचे हात तसाच वास येणाऱ्या पदराला पुसून त्याच्या खांद्याला लगटून उभी राहिली. दुसऱ्या खांद्यावर मुलीनेही प्रेमभरे गाल घुसळला. दोघींनाही थोपटत त्याने फोनचे म्यूट काढले व फोनवर बोलू लागला. बोलता बोलता पलीकडच्या व्यक्तीचे संभाषण भलत्याच वळणावर जातंय हे लक्षात येऊन, त्यातले काही या दोन हर्षभरित जिवाच्या कानी पडू नये म्हणून तो थोडा बाजूला सरकला. त्याने फोन ठेवल्यावर गालभर हसू खेळवणारी बायको व लुकलूक डोळ्यांची मुलगी बघून त्याच्या काळजात तुटले. कसे सांगावे यांना सत्य? क्षणभरापूर्वी आलेली उत्साहाची लहर त्याच्यातून निघून तो एकदम हवा गेलेल्या फुग्यासारखा गळाला. त्याच्यातला हा बदल पत्नीच्या लक्षात आला नाही. ती आपली कल्पनेच्या मनोराज्यात मनसोक्त झोके घेऊ लागली.




''अहो ऐका ना, हा पुरस्कार स्वीकारायला मी आणि पिंकी पण येऊ सोबत, पुरस्कार सोहळा झाला की आपण सप्तशृंगीला जाऊ, गोदाकाठीही निवांत फिरू, कित्येक वर्षे झालेत पिंकीला कुठेच नेले नाही, जरा बदल होईल.'' 'तुला तरी लग्न झाल्यापासून कुठे नेले गं फिरायला?' त्याच्या मनात आलेच. बोलला नाही काही. बायकोच्या दिवास्वप्नावर मान डोलावली. ''बाबा तिकडे मॉल असणार ना? मला बार्बीचा सेट हवाय, पक्का द्याल ना घेऊन? मॅकडीचे बर्गर आणि ओरिओ आईस्क्रीम पण खायचेय. पैसे मिळतील ना बक्षिसात? '' ''हो हो, मग? रोख रक्कम असेलच ना एवढा मोठा पुरस्कार आहे तर, सगळं करू तुझ्या मनासारखं...'' मुलीला भरघोस आश्वासन देत पत्नी त्याच्याकडे वळली. त्याला फार ओझे होई तिच्या अशा आशायुक्त वळण्याचे. तो तिला टाळायला पाही.

''अहो, पन्नास एक हजार तरी असेलच ना पुरस्काराची रक्कम? जरा मनभरून जगता तरी येईल...'' बायको लाडे लाडे जवळ आली नि त्याचा उद्रेकच झाला. ''पन्नास हजार देणार आहेत ते पुरस्कारात? अक्कल नाही कवडीची.'' मग आपण उगाच त्या बिचारीवर चिडतोय असे जाणवून तो नरमाईने म्हणाला, ''इतकाल्या रकमा वाटल्यावर संस्था जिवंत तरी राहील का? पाच हजाराचा पुरस्कार आहे.''

पत्नीचा चेहरा कमालीचा पडला. ती मनातल्या मनात हिशोब करू लागली. फक्त पाच हजार? इथून नाशिकला जायचे भाडेच दोन ते तीन हजार व्हायचे. शिवाय खाणेपिणे, फिरणे, इतर खर्च...काय पुरायचे पाच हजार? तिच्या टपोऱ्या डोळ्यांत भरपूर नाराजी नि निराशा दाटली. ती थकल्या पावलांनी आत गेली. पाकिटातली एकुलती एक सिगारेट शिलगावत तो त्रस्तपणे गॅलरीत येरझाऱ्या घालू लागला. पुरस्काराच्या बातमीचा आनंद मेंदूतून कापरासारखा उडाला होता. फोनवरचे पुढचे संभाषण त्याला वारंवार आठवत होते. आयोजकांनी त्याचे अभिनंदन केल्यावर त्याच्यासमोर सरळ सरळ व्यवहार मांडला होता.

''साहेब, पण आमची एक अट आहे, तुम्हाला पुरस्कारस्वरूप मिळालेली थैली त्यातील तुमच्यासाठी पाचशे रुपये काढून तशीच्या तशीच तेव्हाच संस्थेला दान म्हणून बहाल करावी लागेल. प्रत्येकच पुरस्कृत लेखकांना आम्ही हे सांगतोय. संस्थेलाही खर्च झेपायला हवा. इतक्या लोकांना मोठे करण्यासाठी पुरस्कार देताना खर्चही खूप येतो, तुमच्यासाठी काय हो, पाच हजार मामुली रक्कम आहे, सहज देऊ शकाल, जादाही निधी द्यायचा असल्यास स्वागत आहे साहेब. बरं एक विनंती आहे, या गोष्टी आपापसात ठेवा. कुठेही वाच्यता करू नका. शेवटी आम्हाला तुम्ही नि तुम्हाला आम्हीच असणार आहोत. ठेवतो साहेब, कळवा तुमचा होकार... नकार काय ते म्हणजे तसे प्रमाणपत्र तयार करता येईल.'' फोन ठेवताना त्याने तिरप्या नजरेने बायको आणि मुलीचे स्वप्न भरलेले डोळे पाहिले होते. खूप उंचीवरून एकदम खाली पडल्यासारखेच झाले त्याला. काय सांगावे यांना? ते पाच हजारही पुरते मिळणार नाहीत म्हणून? निव्वळ पाचशे रुपये, स्मृतिचिन्ह नि एक प्रमाणपत्र घेण्यासाठी जाणे काय परवडणार आपल्याला? जायचा- यायचा खर्चही निघणार नाही. आयोजकांना वाटतं आपण सधन, सुस्थितीत आहोत. आपली परिस्थिती, परवड, फाटका खिसा आपल्यालाच माहिती. स्वतःच्या दलिंदर नशिबाचीच चीड आली त्याला. त्याच्या काव्यसंग्रहाला मिळालेला हा नववा, दहावा पुरस्कार. पण जवळजवळ असाच अनुभव त्याला सर्व पुरस्कार समारंभात आलेला.

संस्थेची नाव फार मोठी मोठी; अखिल भारतीय अबक किंवा राज्यस्तरीय फलाणा, फलाणा वगैरे पण आतले व्यवस्थानपण मात्र असेच भिकारवाडा, प्रदूषित. येनकेनप्रकारेण खाजगीत पुरस्कृतांकडूनच रक्कम उकळत त्यांना जाहीर सन्मानित करणार. तो हताश झाला, दुःखी झाला. पुरस्कार मिळाल्याचा आनंद होताच, पण घरातल्या अठराविश्व दारिद्र्यापायी त्याला सदैव हवी असलेली पुरस्काराची रक्कम यावेळीही मिळणार नसल्याच्या खात्रीने कोलमडून गेला.

''राज्यस्तरीय म्हणाले ना म्हणून मी पन्नास हजाराचा आहे का विचारले मघा, तुम्हाला चिडवायचा, डिवचायचा उद्देश नव्हता.'' पत्नी वाढता वाढता स्पष्टीकरण देऊ लागली. तो खाली मान घालून जेवू लागला. ''जाऊ द्या, नसेल परवडत तर जाऊही नका, पोस्टाने पाठवून द्या म्हणावं,'' ती नेटाने म्हणाली. ''वा, वा, असे कसे? राज्यस्तरीय पुरस्कार आहे ना, तो स्टेजवरच घेण्यात खरा मान आहे, जाऊन येईल मी.'' तो बड्या फुशारकीने बोलला.

पाच हजारही मिळणार नाही ही बाब त्याने जाणीवपूर्वक पत्नीपासून लपवली. पिठले-भाताचा घास तोंडात फिरत असताना त्याच्या डोळ्यासमोर भला मोठा मंडप, त्यावरील राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे बॅनर, फुलांनी सजवलेला स्टेज, पाहुण्यांच्या-सत्कारमूर्तींच्या खुर्च्या, माईक, पोडियम, टाळ्या वाजविणारा प्रचंड जनसमुदाय आला.

''कविवर्य, तुमचा ऑटोग्राफ हवाय...'' गर्दीतले कुणीतरी त्याला म्हणत होते. कुणी त्याच्याच गाजलेल्या कवितेच्या ओळी ऐकविण्याचा आग्रह धरीत होते. कुणी त्याच्यासोबत सेल्फी काढत होते. तो सेलिब्रेटी होता. त्याला ते सगळे दृश्य जसेच्या तसे दिसू लागले. हुरूप येऊन त्याने ताटातच एक झोकदार सही केली!

# एक तरी ओवी अनुभवावी

संत

प्रकाश एदलाबादकर

एखाद्याचे बोलणे 'ऐकणे' आणि 'श्रवण' करणे यात महदंतर आहे. श्रवण करणारा तो श्रोता. नुसते ऐकणारा नव्हे! ऐकलेले विसरले जाते परंतु श्रवण केलेले मनात उतरते. जो मन लावून श्रवण करतो तो 'श्रोता'! श्रवण केल्यानेच 'ये हृदयीचे ते हृदयी' जाते. म्हणूनच संतांनी सांगितलेल्या अनुभवावी' असे म्हटले आहे. एक तरी ओवी पाठ करावी, सांगावी, गावी, म्हणावी असे सांगितलेले नाही. कारण श्रवण हा अनुभव असतो.

इतकेच नव्हे तर, श्रवण ही अभ्यासाची पहिली पायरी आहे . श्रवण, वाचन, चिंतन आणि मनन असे पुढे जावे लागते. आपण जितके चांगले आणि उत्तम श्रवण करू व वाचू तितके आपण उत्तम लिहू व बोलू. शाळेत आणि महाविद्यालयात शिकत असतानाच ही सवय लागायला हवी.

अर्जुनाचिये पांती। परिसणेया योग्य होती। तिहीं कृपा करुनि संती। अवधान द्यावे।।' असे सांगतात. श्रोत्यांनी दुश्चित्त असू नये असाही इशारा देतात. श्रोता जर दुश्चित्त असेल तर, त्याच्या आणि वक्त्यामधला संवाद निरर्थक होईल आणि रसहीन होईल याची ते आठवण करून देतात.

**'म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे।**
**तरी हृदयाकाश सारस्वते वोळे।**
**आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे मांडला रसु।।'**



नवविधा भक्तीत पहिले स्थान श्रवण भक्तीला दिलेले आहे.

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद-सेवनं/अर्चनं वंदनं दास्यम सख्यात्म निवेदनं'! श्रवण ही परमेश्वराची भक्ती आहे. समर्थ म्हणतात-**

**''प्रथम भजन ऐसे जाण।**
**हरिकथा पुराणश्रवण।**
**नाना अध्यात्म निरूपण।**
**ऐकत जावे।।**
**सगुण देवांची चरित्रे।**
**निर्गुणाची तत्त्वे यंत्रे।।**
**हे दोन्ही परमपवित्रे।**
**ऐकत जावी।।**
**ऐसे श्रवण सगुणाचे।**
**अध्यात्म निरूपण निर्गुणाचे ।**
**विभक्ती सांडून भक्तीचे।**
**मूळ शोधावे ।।''**

व्याख्याता किंवा प्रवचनकार यांचे बोलणे मन आणि श्रवणेंद्रिय एकाग्र करूनच श्रवण करावी लागतात. यात किंचितही विक्षेप आला तर मागचे-पुढचे सर्व संदर्भ सुटतात.

व्याखान कुणाचेही असो, त्याच्या मुळाशी बीजस्वरूपातील एक विचार असतो. तो समजून घ्यायला संपूर्ण विवेचन मनापासून श्रवण करावे लागते. ऐन युद्धापूर्वी कुरुक्षेत्रावर भगवंताने अर्जुनाला अठरा अध्यायांची गीता सांगितली, कशाला? त्यामागे बीज विचार काय होता, हे समजायला अर्जुनाच्या तोंडी असलेला अठराव्या अध्यायातील एक श्लोक पुरेसा आहे. तो असा-

**''नष्टो मोहः स्मृतीर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।।''**

'माझा मोह नष्ट झाला आणि माझे खरे स्वरूप मला कळले आणि मी संशयरहित झालो' या अर्जुनाच्या उद्‌गारांनी आकलन होते की, कशासाठी गीता सांगितली.

आपल्यालाही सर्वप्रसंगी हेच आचरावे लागते. कारण प्रपंचात अनेकदा आपला 'अर्जुन' होतो. अर्जुनाने गीता नुसती ऐकली नाही, ती श्रवण केली होती. अर्जुन हा श्रेष्ठ श्रोता होता. म्हणूनच, 'जे अर्जुनाच्या पंक्तीला बसायला योग्य आहेत, अशांनी अवधान द्यावे' असे माउली म्हणते.

श्रवणात कुठलेही व्यवधान नको असते, तरच अवधान जागृत राहते. श्रोत्यांनी सतत सावधचित्त असावे यासाठी योगिराज ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत अनेकदा श्रोत्यांची, अत्यंत हळुवार शब्दात विनवणी केलेली आहे. पहिल्याच अध्यायात ते म्हणतात-

**''जैसे शारदेचिये चंद्रकळे।**
**माजीं अमृतकण कोवळें।**
**तें वेचिती मने मवाळे। चकोर तलगे।।**
**तियापरी श्रोता। अनुभवावी हे कथा।**
**अतिहळुवारपण चित्ता। आणुनिया।।''**

शरदाच्या चांदण्यात चकोराची पिले अत्यंत हळुवारपणे कोवळे अमृतकण वेचतात, ते हळुवारपण आपल्या मनात साठवून ही कथा, श्रवण करा असे न सांगता माउली, 'अनुभवावी' म्हणतात. म्हणून सभेत बसून भाषण श्रवण करणे हा अनुभव असायला हवा.

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एकतरी ओवी

पूर्वीच्या काळी सामान्य समाज बहुशः निरक्षर अशिक्षित होता. समाजधुरीणांनाही हे ठावूक होते. म्हणूनच कीर्तन, प्रवचन अशा उपक्रमांमधून त्यांनी श्रवणाचे माध्यम वापरले व समाज जागृत केला. व्याख्यान किंवा कीर्तन- प्रवचन हा वक्ता व श्रोता यामधील परस्पर संवाद असतो. या संवादातूनच मन संस्कारित होत असते.

'इकडून तिकडे गेले वारे' यानुसार 'पालथ्या घागरीवर पाणी' ही अपेक्षा श्रवणात नाही. ज्ञानदेवांनी श्रोत्यांना परमेश्वर स्वरूप समजून अतिशय लडिवाळपणाने त्यांना वारंवार विनंती केली आहे. तसे श्रोतेही त्यांना त्याकाळी मिळाले. त्यांच्यासारखा वक्ता आणि समोर श्रद्धाळू श्रोता तो अनुभवच अनुपम असेल.

**''तरी अवधान एकवेळे दीजे।**
**मग सर्वसुखासी पात्र होईजे।।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड ऐका।।**
**परी प्रौढी न बोले हो जी।**
**तुम्हा सर्वज्ञांचा समाजी।**
**देयावे अवधान हे माझी।।**
**विनवणी सलगीची।।''**

मी सांगत असताना तुम्ही पूर्णरूपेण श्रवण करा अशी ते वारंवार विनंती करतात.

'प्रभू तुम्ही महेशाचीये मूर्ती' असा सन्मान ते श्रोत्यांना देतात. आपल्या सभोवतालचा समाज हा अशिक्षित असला तरी तो श्रद्धाळू आहे हे त्यांना ठावूक होते. संभ्रमावस्थेत असलेल्या सामान्य माणसाला आध्यात्मिक आधार देऊन, समाजाला योग्य दिशा दाखवली तर समाजात परिवर्तन घडेल ही त्यांची पक्की खात्री होती.

ते करणे त्याकाळी आवश्यक होते. त्यासाठी ज्ञानदेव श्रोत्यांना मोठेपण देतात. परंतु आपण जे सांगणार आ-होत ते, श्रवण करण्यासाठी श्रोत्यांची योग्यता काय असावी हे देखील ते सांगायला विसरत नाही. 'अहो दुश्चित्त श्रोते असले म्हणजे ना बोलणाऱ्याला समाधान ना ऐकणाऱ्याला, म्हणजे मन लावून ऐकणाऱ्याला!! शब्दांपासूनची रसनिष्पत्ती शून्य. ज्यांनी ज्ञानेश्वरीचे पारायण केलेले आहे त्यांचे अनुभव श्रवणापेक्षाही वेगळे आहेत.

ज्ञानेश्वरीनामक अध्यात्मसा-गरात जसजसे खोल जावे तसतशी अनेक रत्ने सापडतात. त्यांचे सौंदर्य निरखणे वेगळे आणि त्याचा अनुभव घेणे वेगळे. ज्ञानेश्वरी म्हणजे एका सिद्धप्रज्ञ संवेदनशील कवीने गीतेच्या प्रदेशात मुक्त मनाने केलेला हा संचार आहे. ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांनी अनुभवलेला गीतार्थ आहे. ज्ञानदेवांची अनुभवसृष्टी जशी यात प्रतीत होते तशीच, त्यांची अनुभवसृष्टीही प्रतीत होते. म्हणूनच ज्ञानदेवी हा ग्रंथ हा अनुभवण्याचा विषय आहे. तयापरी ही श्रोता, अनुभवावी हे कथा असे आर्जव ज्ञानदेव करतात. त्यामागील भाव समजून घेतला पाहिजे. ज्ञानदेवांनी याला 'कथा' म्हटलेले आहे. या कथात्मक शैलीमुळे ग्रंथातील चर्चा, काव्यात्मक विवेचन,अलंकारांची पखरण हे सर्व ज्ञानात्मक पातळीवरच न राहता अनुभवात्मक पातळीपर्यंत जाऊन पोहोचते.

**''नवल बोलतीये रेखेची वाहणी ।**
**देखता डोळ्याही पुरो लगे धाणी ।**
**ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ।।''**

'बोली अरुपाचे रूप दावीन', निराकार असलेला परमात्मा माझ्या शब्दातून मी साक्षात तुमच्यापुढे उभा करीन ही माउलीची प्रतिज्ञा आहे. माउली म्हणतात, गीतेवरील माझ्या प्रवचनाचा ओघ तुम्हाला अतिशय नवलाचा वाटेल. हा ओघ बघून तुमचे डोळे संतुष्ट होतील. हे साधे बोल नसून ही प्रत्यक्ष रूपाची खाणच निर्माण झाली आहे, असे तुम्हाला जाणवेल. ज्ञानदेव हे केवळ कवी नाहीत. ते शांतिब्रह्म योगीश्वर आहेत. गीतेमधील परमार्थाचा विचार त्यांना मराठी भाषेत सोपा करून सांगायचा आहे. लोकमानसात भक्तीची बीजे त्यांना रोवायची आहेत. या देशी भक्तीचे मळे फुलवायचे आहेत. त्यासाठी ते स्वतःच अंतर्मुख होतात. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंचतत्त्वांनी त्यांची चित्तवृत्ती फुलून येते. त्यांच्या संवेदना जागृत होतात. आणि त्यातून प्रसवतात त्या

**अक्षर, अजर, अमर, अविनाशी**
**अशा लडिवाळ ओव्यांच्या लडी!!**
**'दिसे परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा'**

अशी ओढ ते आपल्या प्रमाणेच श्रवण करणाऱ्याच्या मनातही जागृत करतात. जाणिवेपलीकडचा एक तृप्त अनुभव श्रोत्यांच्या मनात निर्माण करू इच्छितात. म्हणूनच श्रवण ही अनुभव घेण्याची पायरी आहे. म्हणून म्हटले आहे एकतरी ओवी अनुभवावी! हा अनुभव आला की नादब्रह्महही ठेंगणे होते. आणि श्रवण- **अनुभवाची दिवाळी साजरी होते.**

**''सूर्ये अधिष्ठिली प्राची।**
**जागा राणीव दे प्रकाशाची।**
**तशी वाचा श्रोतया ज्ञानाची।**
**दिवाळी करी।।''**

# दिशादर्शक कप्तान : शिस्त

ललित

प्रा. विजया मगगिरे

आज संध्याकाळच्या कार्यक्रमाला नक्की ये बर का हो, हो, नक्की येते असे म्हणत निताने घाईघाईतच मैत्रिणीचा फोन, होकार देऊन खाली ठेवला. चार दिवसांपूर्वीच माधुरीचा तिच्या मुलाच्या वाढदिवसाला, अभिजीतला घेऊन येण्यासाठी फोन केला होता. माधुरीचा मुलगा प्रथमेश आणि अभिजीत हे पहिलीपासूनचे मित्र.

चला आता पटकन आवरायला हवं. असं मनातल्या मनात म्हणत नीता पटपट ऑफिसमधली कामे संपवू लागली. घरी जाऊन संध्याकाळचा सासऱ्यांसाठी आणि नवऱ्यासाठी स्वयंपाक बनवायचा आणि पटकन आवरून कार्यक्रमाला जायचे नियोजन ती करू लागली. निता ऑफिसमधून घरी पोहोचली. दररोजप्रमाणे घरामध्ये सगळीकडे पसरा पडलेला होता. ती हातपाय धुवून फ्रेश झाली. सासऱ्यासाठी व स्वतःसाठी चहा बनवला. एकीकडे भाजी फोडणी टाकली व पटकन कणिक मळली. कणिक भिजेपर्यंत घरातला पसारा आवरायला सुरुवात केली. अभिजीतला एखादी गोष्ट हातात घेतली की ती आहे तिथेच सोडून दुसऱ्या कोणत्यातरी वस्तूच्या मागे लागायचं अशी सवय होती. त्याच्या या सवयीमुळे घरात सगळीकडे वस्तू विखुरलेल्या असायच्या.



आज पसारा आवरताना मात्र तिने मनात निश्चय केला की आज काहीही झाले तरी अभिजीतला शिस्तीचे महत्व समजावून सांगितलेच पाहिजे. याच वयात त्याला शिस्त लागली तर आयुष्याला योग्य वळण लागेल, योग्य दिशा मिळेल. नाहीतर शिस्तीशिवाय आयुष्य म्हणजे कप्तानाशिवाय भरकटलेले जहाज. घरातली सर्व कामे करून झाल्यावर, निता आणि अभिजीत व्यवस्थित तयार होऊन वाढदिवसाच्या कार्यक्रमाला निघाले. ऑफिसमधून येतानाच निताने प्रथमेशसाठी गिफ्ट आणले होते. प्रथमेशला गिफ्ट दिलेला सोल्जर स्टॅच्यू खूप आवडला. येताना रस्त्यामध्ये अभिजीत निताला म्हणाला, ए आई, तू किती युनिक गिफ्ट दिलेस ग! मलाही खूप आवडला सोल्जर. तू आणखी एक आणायला पाहिजे होता. मला ना मोठ्ठ झाल्यावर सोल्जर व्हायचं आहे. निताच्या नियोजनानुसार हे सर्व घडत होते. तरीही निताने शांतपणे पण कौतुकाने विचारले, हो खरंच! मला पण सैनिकांबद्दल खूप आदर वाटतो. बर तू सांग, तुला सैनिक का व्हायचं आहे? अभिजीत म्हणाला, मला ना त्यांचा धाडसीपणा खूप आवडतो. मला तसंच एकदम स्ट्राँग बनायचय त्यांच्यासारख. पथमार्गावर जवळच एक बाकडे निताला दिसले. ती अभिजीतला म्हणाली, ये, आपण इथे थोड्यावेळ बसुया. निता म्हणाली, अरे वा! तर मग तुला सोल्जरसारखं स्ट्राँग बनायचंय? तुला माहित आहे का? की सोल्जर म्हणजे सैनिक हे दिवसरात्र, तिन्ही ऋतुंमध्ये भारताच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून कडा पहारा देत असतात, म्हणून आपण आपापल्या घरामध्ये शांतपणे झोपू शकतो. जर सैनिक तिथे नसतील तर कोणतेही शत्रूसैनिक, दहशतवादी देशात घुसतील आणि धुडगूस घालतील.

सगळीकडे भयाचे वातावरण निर्माण होईल. आपणाला घराबाहेरही पडता येणार नाही. म्हणूनच सैनिक हा प्रत्येक देशासाठी मौल्यवान असतो. आई, मग मी पण मौल्यवान बनणार. सांग ना मला, कसे बनायचे सैनिक? सैनिक होण्यासाठी मी काय करायला पाहिजे? अभिजीतने विचारले. निता सांगू लागली, सैनिक होण्यासाठी सर्वात प्रथम कडक शिस्त आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असावी लागते. सैनिकांच्या देशावरील निस्सिम प्रेमामुळे ते कोणत्याही सुखाचा त्याग करावा लागला तरी त्याची खंत न बाळगता, प्रसंगी प्राणाची आहुती देण्यासही तत्पर असतात. अभिजीत एकाग्र होऊन निताचे बोलणे ऐकत होता. निताही तेवढीच समरस होऊन सांगत होती, सैनिक होण्यासाठी असणारी परीक्षा ही लेखी आणि प्रात्यक्षिक म्हणजेच मैदानावरील कसरती या स्वरूपाची असते. परीक्षा पास झाल्यानंतर खडतर प्रशिक्षणातून त्यांना जावे लागते.

तुला पण जर सैनिक व्हायचे असेल तर सर्वात पहिल्यांदा ठाम निश्चय करून स्वतःला शिस्त लावून घ्यावी लागेल. यावर अभिजीत म्हणाला, आई शिस्त कशी लावून घ्यायची? मनातला प्रश्न समोरून आल्याने निता अधिकच उत्साहाने सांगू लागली, शिस्त म्हणजे प्रत्येक काम वेळेवर अचूकपणे करणे, स्वतःचे काम स्वतः करणे, स्वावलंबी बनणे. शिस्त ही एका दिवसात लागण्याची गोष्ट नाही. ही प्रयत्नपूर्वक दररोज थोडी थोडी शिकण्याची बाब आहे. याची तुला हळूहळू सवय लावून घ्यावी लागेल. पाहिजे असलेली माहिती मिळाल्यामुळे अभिजीतने आनंदाने बाकड्यावरून उडी मारली. आणि म्हणाला, आई मी पण आता शिस्तीत वागणार. प्रत्येक काम मी स्वतः करण्याचा प्रयत्न करणार अगदी दप्तर भरण्यापासून ते शू लेस बांधण्यापर्यंत, अगदी सगळं, दररोज शाळेतून आल्यावर युनिफॉर्म नीट ठेवणार, अभ्यास झाल्यावर वह्या पुस्तके रॅकमध्ये ठेवणार. हुर्रे! मी पण सैनिक होणार.

निता एका वेगळ्याच समाधानाने आनंदून गेली होती. कारण तिने ठरवलेली योजना पन्नास टक्के यशस्वी झाली होती म्हणजे अभिजीतला शिस्तीचे महत्व समजावून सांगण्यात ती यशस्वी झाली होती आणि बाकी पन्नास टक्के अभिजीतच्या वागण्यातल्या बदलावरून ठरणार होती ते मात्र भविष्यात दडले होते. तरीही आशाभूत होऊन ती म्हणाली, चला तर मग, यंग सोल्जरसाहेब, बाबा घरी आले असतील, आपल्यालाही घरी जायला हवं. निताने अभिजीतचा हात हातात धरला आणि दोघेही घराकडे निघाले. मरण तर सर्वांनाच येणार आहे फक्त त्याची वेळ कोणालाही माहीत नाही. पण सैनिक हे एकमेव व्यक्ती असे असतात की जे देशाच्या रक्षणासाठी कोणत्याही क्षणी प्राण पणाला लावण्यास तयार असतात, ते देशासाठी जगतात.

सैनिकाला असामान्य बनविणाऱ्या अनेक गुणांपैकी महत्वाचा गुण म्हणजे शिस्त होय. शिस्त हा गुण असा आहे की ज्याने अंगिकारला त्याचे आयुष्य कधीच वाईट वळणाला जाणार नाही. म्हणूनच प्रत्येकाच्या आयुष्याला योग्य दिशा देण्यासाठी शिस्तीसारख्या कप्तानाची गरज असते.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

## शांतिनिकेतन ते विश्वभारती

उगवतीचे रंग


विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग ४५)

शिक्षण कसे असावे याबद्दल रवींद्रनाथांच्या स्वतःच्या काही कल्पना होत्या. त्यांना लहानपणी आलेला शाळेतील आलेला कटू अनुभव त्याच्या जोडीला होताच. शाळेत दिले जाणारे साचेबद्ध औपचारिक शिक्षण त्यांना आवडत नव्हते. हे शिक्षण मुलांचा बौद्धिक आणि भावनिक विकास करण्यास असमर्थ आहे अशी त्यांची भावना होती. शिवाय त्यांचा मुलगा रथींद्रनाथ याचे देखील शाळेत नाव दाखल करण्याचे वय झाले होते. आपल्याला अपेक्षित असलेल्या पद्धतीने त्यालाही शिक्षण देता यावे असे त्यांना वाटत होते.

त्यांच्या चिंतनातून झालेला मानवता धर्माचा साक्षात्कार त्यांना समाजाची निष्काम सेवा करावी अशी प्रेरणा आतून देत होताच. या सगळ्या कारणांमुळे आपल्याला अपेक्षित असणारे उत्तम शिक्षण देणारी एखादी संस्था आपणच का निर्माण करू नये असे त्यांना वाटू लागले आणि त्यातूनच १९०१ मध्ये शांतिनिकेतनची स्थापना झाली.

प्राचीन गुरुकुल पद्धतीच्या धर्तीवर शिक्षण देणारी संस्था असे शांतिनिकेतनचे स्वरूप होते. हळूहळू या संस्थेची वाढ आणि विकास होऊ लागला. शांतिनिकेतनचा विकास होत असतानाच्या काळात रवींद्रनाथ परदेशात भारताचे सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून जात होते. जगातील विविध देशात लोकांना भारतीय संस्कृतीचा परिचय करून देत होते. विदेशातील लोकांच्या हे लक्षात आले होते की एक व्यक्ती म्हणून नव्हे तर भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी या नात्याने रवींद्रनाथ आपल्याशी बोलत आहेत. ते केवळ भारताचा संदेश बाहेरच्या जगात पोहोचवण्याचे कार्य करीत नसून भारतीयांच्या गरजा परिणामकारकपणे मांडून जागृती करण्याचा प्रयत्न करत आहेत.



रवींद्रनाथांची जी व्याख्याने परदेशात होत होती, त्यामुळे त्यांना अफाट लोकप्रियता मिळत होती. त्यांचे उत्स्फूर्त स्वागत होत होते. परंतु त्यांना या गोष्टीची जाणीव होती की आपल्यामार्फत भारताचा आवाज जगापर्यंत पोहोचतो आहे. याबाबत त्यांनी स्वतःच एका ठिकाणी असे म्हटले आहे की ज्यांनी माझा सन्मान केला तो खरं म्हणजे माझ्याकरवी भारताचा सन्मान झाला आहे आणि माझं जीवन संपल्यावरही हे बंद होऊ नये कारण मला जो आदर सन्मान मिळाला आहे तो व्यक्तिगत माझ्याशी संबंधित नाहीच. त्यांना हेही जाणवले की परदेशात भारताच्या आध्यात्मिक ज्ञानाबद्दल विलक्षण भूक आहे. ही भूक भागवण्यासाठी अशी एखादी संस्था असावी की जिच्यामार्फत हे कार्य सातत्याने करता यावे. आणि ही संस्था शांतिनिकेतनच असावी असे त्यांना प्रकर्षाने वाटू लागले आणि ती नावारूपाला येण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली.

पुढे आणखी काही वर्षानंतर जगातील विविध देशात भारताचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अग्रदूत म्हणून कार्य करीत असताना शांतिनिकेतनचे रूपांतर एका विशिष्ट प्रकारच्या विद्यापीठात करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली असावी. या विद्यापीठाची स्थापना करून उदात्त आणि व्यापक अशा भारतीय संस्कृतीचे उदाहरण जगासमोर ठेवण्याचा त्यांचा विचार होता. भारतीय पारंपारिक संस्कृतीचे रवींद्रनाथांना विलक्षण कौतुक होते. त्यांची अशी इच्छा होती की जगातील लोकांचा शिक्षणाच्या निमित्ताने अशा विद्यापीठाची संबंध यावा आणि भारतानेही जगभरातील अशी इच्छा असणाऱ्या लोकांना येथे शिकण्यासाठी आमंत्रित करावे.

भारताची संस्कृती वैदिक, पौराणिक, बौद्ध, जैन, मुस्लिम, शीख इत्यादी अनेक धर्मांवर आधारलेली आहे आणि अशा प्रकारच्या संमिश्र अशा भारतीय संस्कृतीचे ज्ञान विविध विषय आणि कलाप्रकारातून देण्याची व्यवस्था अशा प्रकारच्या विद्यापीठातून व्हावी असे त्यांना वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या मनाशी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आणि संस्थेसाठी विशिष्ट अशा प्रकारचा आराखडा तयार केला.

त्यांनी आपल्या मनाशी या विद्यापीठाचे जे नाव निश्चित केले ते अत्यंत समर्पक असे होते ते म्हणजे विश्वभारती!' यत्र विश्वं भवत्येकनिडम' या वैदिक ऋचेतून त्यांना हे नाव ठेवण्याची प्रेरणा मिळाली असे दिसते. त्याचा अर्थ असा की ही संस्था अशी असावी की जिथे संपूर्ण विश्व एखाद्या घरट्याप्रमाणे आपण एकत्र करू शकू. या संस्थेचा असा विकास झाला पाहिजे की जगातील विविध भागातील लोक आध्यात्मिक संपत्तीची देवाणघेवाण करण्यासाठी इथे आकृष्ट झाले पाहिजेत.

जगभर प्रवास करताना रवींद्रनाथांनी हे पाहिले होते की जगातील विविध विद्यापीठे शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना केवळ बौद्धिक ज्ञान किंवा खाद्य पूरवत होते. परंतु व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल तर केवळ बौद्धिक विकास होऊन चालणार नाही तर भावनिक विकासही होईल अशा प्रकारचे शिक्षण विद्यापीठातून दिले गेले पाहिजे असे त्यांना वाटत होते.

विद्यापीठांनी विज्ञान, शास्त्र इत्यादी विषय शिकवत असतानाच ललित कला आणि त्या समूहात येणाऱ्या इतर विषयांना देखील तसेच मानाचे स्थान मिळवून द्यावे त्यायोगेच विद्यार्थ्यांचा खरा विकास होईल. शिक्षणाचा हेतू केवळ ज्ञानासाठी ज्ञान असा मर्यादित न राहता मानव-ाला समजून घेऊन इतरांना त्याचा मानव म्हणून परिचय होण्यासाठी असावा. बहिणाबाईंच्या शब्दात सांगायचे तर' माणसा माणसा कधी होशील माणूस' असं माणूस बनवणारं, माणूस घडवणारं शिक्षण विद्यापीठांनी देणं त्यांना अपेक्षित होतं. आपल्या विश्वभारती या विद्यापीठात अशा प्रकारचं शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावं म्हणून त्यांनी जगभरातील नामवंत विद्वानांना भारतात आमंत्रित केलं. २२ डिसेंबर १९२१ रोजी या विद्यापीठाचे उद्घाटन झाले प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ. ब्रजेंद्रनाथ सील, प्रो. सिल्वान लेव्ही हे याप्रसंगी उपस्थित होते. प्रो. सिल्वान लेव्ही यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यापीठात चिनी भाषा आणि साहित्याचा अभ्यास करण्याची योजना आखली गेली. विद्यापीठाच्या किरकोळ खर्चाची हातमिळवणी करण्यासाठी संस्थेची काही जमीन विश्वभारतीला रवींद्रनाथांनी देणगी म्हणून दिली.

आपल्या शिक्षणविषयक कार्याच्या आयुष्यभर केलेल्या धडपडीतून रवींद्रनाथांची प्रतिमा एक थोर शिक्षणतज्ज्ञ म्हणून जगासमोर आली होती. शांतिनिकेतन ते विश्वभारती हा रवींद्रनाथांचा जो प्रवास झाला त्याचा आढावा या छोट्याशा लेखात घेण्याचा प्रयत्न केला असला तरी रवींद्रनाथांनी आपले संपूर्ण आयुष्य याच्यासाठी खर्ची घातले आहे.

# ग्रहसंकेत

**(रविवार, ४ मे ते शनिवार, १० मे २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ४ मे-** भानू सप्तमी, श्री मल्लिकार्जुन यात्रा कारकल (दक्षिण सोलापूर), भैरवनाथ रथोत्सव मासुर्णे, ज्योतिर्लिंग यात्रा बोरगाव (चिकोडी), श्री कालिका देवी प्रतिष्ठापना दिन यात्रा सांगली ✻ **सोमवार, ५ मे-** दुर्गाष्टमी, श्री शंकर महाराज पुण्यतिथी पुणे, भैरवनाथ यात्रा देऊळगाव, महादेव यात्रा खळद, हंसराज स्वामी यात्रा परांडा, सीता नवमी ✻ **मंगळवार, ६ मे-** राजश्री शाहू महाराज स्मृतिदिन, लक्ष्मी देवी यात्रा पाटण, भैरवनाथ यात्रा कामेरी, सुभाबाई देवी भंडारा रानोळी, पांडुरंग ताम्हणकर महाराज जयंती सांगली, धोंडीराज महाराज पुण्यतिथी पलूस ✻ **बुधवार, ७ मे-** गुरुदेव रवींद्रनाथ टागोर जयंती, श्री महालक्ष्मी नैवेद्य यात्रा उगार खुर्द (अथणी), श्री महालक्ष्मी देवस्थान जत्रा राणी चन्नमानगर बेळगाव ✻ **गुरुवार, ८ मे-** मोहिनी एकादशी, रेडक्रॉस दिन, सासवड यात्रा, सिद्ध श्री देवेंद्रनाथ जयंती मढी (नगर), महादू आप्पा देवर्षी महाराज पुण्यतिथी सावरगाव ✻ **शुक्रवार, ९ मे-** प्रदोष, श्री भगवंत जन्मोत्सव बार्शी, कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी, जानुबाई देवी यात्रा करंजखेड, महाराणा प्रताप जयंती ✻ **शनिवार, १० मे-** व्यास जयंती, रांगोळी महाराज पुण्यतिथी मालवण, स्वामी युक्तेश्वर जन्मदिन,

**मुहूर्त:-** ✻ **साखरपुडा-** ५ मे (१४ नंतर), ८ मे (१२ नंतर), ९, १० मे ✻ **डोहाळ जेवण-** ९ मे ✻ **बारसे-** ८ मे (१२ नंतर), ९ मे, १० मे (१० पर्यंत) ✻ **जावळ-** ९ मे ✻ **गृहप्रवेश-** ८ मे (१२ नंतर), ९, १० मे

### मेष :- जशास तशी भूमिका ठेवावी

प्रत्येक गोष्ट मनाला लावून घेतली, तर रडत बसावं लागणार. जशात तसे वागायला शिकावे. सोमवारी धनस्त गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग आर्थिक कामे मनासारखी करणार आहे. टिट फॉर टॅट भूमिका ठेवली तरचं आपला निभाव लागणार आहे. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. विनाकारण धावपळ टाळावी. शुभ ता. ४, ९, १०

### वृषभ:- वेळेचा सद्पयोग व्हावा

आपली लढाई आपल्यालाच लढावी लागते. लोक उपदेश देतील. पण, साथ देणार नाहीत. राशीतील गुरुचा बुधाशी होणारा लाभ योग आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे. नव्या विचारांना चालना देता येईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. उत्साह, धडाडी वाढेल. वेळेचा सदुपयोग व्हावा, प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. ४, ७

### मिथुन:- सरकारी कामे करावीत

पाठ नेहमी मजबूत ठेवली पाहिजे, कारण शब्बासकी व धोका दोन्ही पाठीमागूनच मिळतात. राशी स्वामी बुधाचा सोमवारी गुरुशी लाभ योग होत आहे. सध्या सतावणारी आर्थिक चिंता कमी होईल. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. यांत्रीक क्षेत्रात प्रगतीच्या घटना घडतील. सरकारी कामे या सप्ताहात करून घ्यावीत. शुभ ता. ४, ९, ११

### कर्क:- चिंता नको

सत्य बोलणारी व्यक्ती सर्वांनाच टोचत असते. लाभातील गुरु बुधाशी लाभ योग होणार आहे. आर्थिक प्रगतीच्या घटना घडतील. नोकरी मनासारखे प्रगती होईल. अडचणी वेळी सुटत जातील. चिंता नको. नव्या योजना साकार करता येतील. नव्या संधीचे स्वागत करावे. अनुकूलता वाढत जाईल. जनसंपर्क वाढेल. शिक्षण अनुभवातून प्रगती साधता येईल. शुभ ता. ४, १०

### सिंह:- सरळ मार्ग सोडू नका

बायको हाच नवऱ्याचा खरा दागिरा असतो. ज्यांना समजलं त्यांचा संसार सोन्यासारखा असतो. शनि मंडळाची प्रतिकूलता असल्याने थांबा आणि पहा अशी भूमिका ठेवावी. गुंतवणूक वाढेल अशी भूमिका घ्यावी. विचाराने राहावे, घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. दगदग टाळावी. शुभ ता. ४, ७

### कन्या:- लोभ मदापासून दूर राहावे

पिंजऱ्यात ठेवलेली पाखर आणि बंधनात ठेवलेली माणसं, कधीच आपली होत नसतात. राशीसमोर शुक्र शनि राहू समवेत आहे. त्यामुळे लोक मद या रिपूंपासून दूर रहावे. आपणास कोणीतरी गोत्यात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सावध चित्त असावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. दूरचे प्रवास नकोत. शुभ ता. ७, ९

### तुला:- शिस्तबद्ध वाटचाल

ज्यांच्या मनात ज्ञान आहे. तो कधीच दुर्बल नसतो. राशीसमोर रवी बुध राहणार आहेत. त्यामुळे शिस्तबद्ध वाटचाल करू शकाल. नोकरीत वरिष्ठांशी संघर्ष टाळावा. महापुरे झाडे जाती... हा विचार नेहमी ध्यानात ठेवावा. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. अपेक्षित घटना घडतील. आत्मविश्वास वाढेल. शुभ ता. ५, ७

### वृश्चिक:- प्रगतीचा टप्पा गाठाल

अचानक पाऊस पडतो आणि सांगून जातो गुर्मी कोणाचीही असू द्या, जास्त दिवस टिकत नाही. राशी स्वामी मंगळ भाग्यस्थानी आहे. षष्ठात रवी, बुध कार्यक्षेत्रात प्रगती करणारे आहेत. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. गृहनिर्माण, गृह सजावट अशा व्यवसायात प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधी लाभतील. शुभ ता. ४, १०

### धनु:- संघर्षातून मार्गक्रमण

तोंडावर बोलणारी माणसं इंजेक्शनसारखी असतात. थोडी कळ सोसावी लागेल, पण त्याचा दीर्घकाळ फायदा होईल. शनी, मंगळाची प्रतिकूलता आहे. त्यामुळे संघर्षातून मार्गक्रमण करावे लागेल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. प्रशासन सेवेत असणाऱ्यांना चांगल्या संधी लाभतील. अपेक्षित कामे विलंबाने पण योग्य त्या गतीने होतील विचाराने रहावे. शुभ ता. ४, ९

### मकर:- स्थावर प्रश्न मार्गी लागतील

हृदयापेक्षा सर्वात चांगली आणि सुपीक जागा कुठेही नाही. इथे काहीही पेरलं की, लगेच उगवतं. अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक स्थितीत सुधारणा होत जाईल. अपेक्षित घटना घडतील. कलागुणांचा गौरव होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. शुभ ता. ४, ७,१०

### कुंभ:- नव्या विचारांना चालना

नात्यांना पैशाच्या नजरेने पाहू नका कारण नाती टिकवणारी माणसं बहुतेकदा गरीबच असतात. धनस्थ बुधाचा सुखस्त गुरुशी होणारा लाभ योग आपणास प्रगतीच्या संधी मिळवून देणार आहे. अंगीकृत कार्यात समाधानकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना देता येईल. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. अनुकूलता वाढत जाईल. शुभ ता. ७, ९

### मीन:- मृगजळा मागे धावू नका

परके तर हवा देतात. पण, आग तर आपलेच लावतात. सावधान! राशी समोर केतू त्यामुळे सर्व बाबतीत सावध राहणेच योग्य ठरेल. काही मृगजळ दिसतील, त्यांच्या मागे धावू नका. सरकारी कामे ओळखीतून लवकर करून घ्यावीत. नव्या विचारांना विचाराने चालना द्यावी. वैद्यकीय, कृषी, संरक्षण क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. शुभ ता. ४, ९

**!! शुभ भवतु !!**

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# इतिहासाच्या पाऊलखुणा

देवगिरी साम्राज्य बुडाले, मागील भागात त्या बुलंद देवगिरी किल्ल्याची वाचकांनी शब्दसफर केली. त्यानंतर महाराष्ट्र परकीय सत्तांच्या काळोखात बुडत गेला. आता महाराष्ट्रातील प्रजेवर अनन्वित अत्याचार करत हे क्रूर राज्यकर्ते आपली सत्ता सतत विस्तारित होते. इकडे चौदाव्या शतकात दक्षिणेत विजयनगर साम्राज्याचा उदय झाला. तुंगभद्रेच्या तीरावर एकात एक सात तटबंद्या उभारून विजयनगर राजधानी निर्माण झाली. हरिहरराय व बुक्काराय या दोन कानडी तरुणांनी विजयनगर साम्राज्य बुलंद केले.



विजयनगर साम्राज्यातील सर्व राजे अच्युतराय, कृष्णदेवराय, हरिहरराय यांनी कर्नाटकचे स्वराज्य समृद्ध व बलाढ्य केले. येथे भारतीय कला, साहित्य, स्थापत्य व धर्मकार्य सुरक्षित व वृद्धिंगत झाले. विजयनगरचे सार्वभौम साम्राज्य हिंदू उठावासाठी बालेकिल्ला होते. त्यामुळे हिंदू अस्मितेची लाट अल्पावधीत दख्खन प्रदेशाच्या कानाकोपऱ्यात पसरली. या साम्राज्याच्या सीमा कोकण प्रदेशास भिडल्या होत्या. इकडे तुघलक सुभेदारांनी दिल्लीच्या सत्तेविरुद्ध बंड करून अफगाण सरदार अल्लाउद्दीन हुसेन गंगो बहामन याच्या नेतृत्वात राज्य स्थापन केले. बहमनी राजवट आली. बहमनी राजवटीची पहिली राजधानी गुलबर्गा येथे होती. विजयनगर व बहमनी या दोन राजसत्ता सतत संघर्षरत होत्या. विजयनगर साम्राज्य बहमनी सत्तेच्या डोळ्यांत खुपत होते. त्यामुळे विजयनगरवर सतत हल्ले करणे सुरूच असायचे. अशातच अल्लाउद्दीन शाह बहमनी याने विजयनगरचा दुसरा राजा देवराय याचा पराभव केला. आता विजयनगरचे अस्तित्व केवळ बहमनी सत्तेचे मांडलिक इतकेच उरले. सह्याद्रीच्या डोंगरावरील व कोकणातील अनेक किल्ल्यांवर त्यांनी शिबंदी तैनात केली. पुढे दख्खन प्रदेशात भयानक दुष्काळ पडला.

१४९० पर्यंत बहमनी सत्तेची शकले होऊन अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, बिदरची बरीदशाही, वऱ्हाड प्रांतातील इमादशाही अशी स्वतंत्र राज्ये स्थापन झाली. यातील इमादशाही अल्पकाळ टिकली व निजाम शाहीत विलीन झाली. पुढे या सत्ता आपसात संघर्ष करू लागल्या. मराठी कलमा व कट्यारी मजबूत होत्या हे यांनी ओळखले. त्यामुळे मराठ्यांना विविध नोकऱ्या देऊन स्वतःच्या सत्तेसाठी वापरणे सुरू केले. बादशाही महाराष्ट्रात आली आणि यांच्या संघर्षात मराठ्यांची पहिले माणसे मरू लागली व पुढे मनही मेले. वतनासाठी, मानपानासाठी यांनी मराठ्यांमध्ये भांडणे लावली, मराठेही आपसात भांडायला, कटकारस्थाने करायला लागले. दोनशे वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवातून बादशाहाने खेळणे सुरू केले. देशमुखी, सरदेशमुखी, पाटीलकी, देशपांडे, सरदेशपांडे, कुलकर्णी, महाजन, गुरव अशी वतने बहाल केली. बादशाही अंमल सुरळीत चालावा यासाठी या शाही युक्त्या सफल झाल्या. मराठी रयतेवर आता आपल्याच माणसांकडून देखील बादशाह शिताफीने अत्याचार करवून घेऊ लागले. इकडे वास्को-द-गामाच्या नेतृत्वात तीन पौर्तुगीज जहाजे कालिकत जवळ भारतीय किनाऱ्यास लागली. युरोपातून येणारा सागरी मार्ग डच, फ्रेंच, ब्रिटिश या युरोपीय लोकांना माहिती झाला. ते सुरुवातीस व्यापारी, जिज्ञासू, संशोधक, धर्मप्रसारक अशा भूमिकेतून आले पण नंतर प्रदेश काबीज करणे, मोक्याच्या ठिकाणी किल्ले बांधून वसाहती निर्माण करणे, असे कार्य सुरू करून त्यांनी आपले खरे रूप प्रकट केले. पोर्तुगीजांनी दमनपासून गोव्यापर्यंत पश्चिम किनारा काबीज करून वसई, तारापूर, शिरगाव, चेऊल, कोरलाई येथे दुर्गबांधणी केली. विजयनगर व मुस्लिम शाह्या यांना युद्धासाठी तोफा, बंदुका, दारुगोळा, घोडे पुरविण्याचे काम फिरंगी करीत होते. हे पौर्तुगीज फिरंगी क्रूर पशू होते. त्यांनी भारताच्या किनाऱ्यावर धर्माच्या नावाखाली भयंकर अत्याचार सुरू केले. कदंब राजांनी भक्तिभावाने बांधलेली अप्रतिम मंदिरे जमीनदोस्त करण्यात आली. धर्मपरिवर्तन कार्याची सुरुवात झाली. दक्षिणेतील किल्ल्यावर तैनात असलेल्या बहुतांश तोफा पोर्तगीज बनावटीच्या होत्या. काही काळ पोर्तुगीज विजयनगर साम्राज्याला सुद्धा युद्धसामुग्री पुरवीत. या मुस्लिम शाह्या एकमेकांशी सुद्धा सत्तेसाठी लढत असत त्यामुळे विजयनगर साम्राज्य टिकून होते. मात्र नंतर सर्व मुस्लिम शाह्या विजयनगर विरुद्ध एकत्र आल्या. त्यांनी विजयनगर साम्राज्य समूळ नष्ट केले. दुर्दैव हे की आमचे मराठे सरदारही रामरायाचे, विजयनगरचे शत्रू म्हणून सुलतानांच्या बाजूने लढले.

विजयनगरची राजधानी अद्वितीय सौंदर्याने नटलेली होती. शेकडो इमारती, अद्वितीय मंदिरे, राजवाडे, विद्यालये यांची सुलतानांनी राखरांगोळी केली. विजयनगरचे वैभवशाली राज्य नेस्तनाबूत केले. महाराष्ट्राला लाचारीचे जीवन दिले. बादशाह हाच देव आणि त्याची सेवा हा धर्म अशी दैना निर्माण झाली. महाराष्ट्राची भाषा, भूषा बदलण्यास सुरुवात झाली, मोडेल पण वाकणार नाही ही मराठी मानसिकता विसरून गुलामीतही मराठ्यांना अपमान वाटेनासा झाला. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात उत्तर भारतात मोगल आले. त्यांनी राजपूत राजांना शह देऊन बाबरच्या नेतृत्वात दिल्लीत साम्राज्य स्थापन केले. बाबर, हुमायू, अकबर, जहागीर, शहाजहान, औरंगजेब या मोगलांनी भारतावर साधारण दोनशे वर्ष राज्य केले. मोगल व राजपूत संघर्ष सतत सुरू होता. अनेक राजपूत राजे सतत संघर्ष करीत होते. वीर महाराणा प्रताप यांनी हळदीघाटाच्या लढाईत तर पराक्रमाचा उच्चांक गाठला. खान्देश काबीज करून अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला. त्यावेळी त्याला चांदबीबीमुळे जिंकता आले नाही परंतु पुढे सोळाशे साली अहमदनगर काबीज केले व निजामशाही बुडायला सुरुवात झाली. मराठी जनता मुस्लिम सुलतानांच्या अत्याचाराने ग्रस्त होती. त्यात मराठा समाजातील शूर कुटुंबांचे महत्त्व वाढले. याच वेळी मलिक अंबर यांनी मालोजीराव भोसले यांना पुणे, सुपे परगणे व शिवनेरी, चाकण किल्ले यांची जहागिरी दिली. मालोजीराव भोसले यांचे सुपुत्र शहाजीराजे यांची झुंझार लढवय्या म्हणून ख्याती होती. पुढे मलिक अंबर गेल्यावर दख्खन प्रदेश असुरक्षिततेच्या गर्तेत बुडाला. महाराष्ट्रात भोसले व जाधव घराण्यांचा चांगला दबदबा होता.

भोसल्यांचे शूर सुपुत्र शहाजी राजे व जाधवांची सकल सौभाग्य संपन्न लेक जिजाऊ यांचा विवाह झाला. पुढे लखुजीराव जाधवांनी मोगलांना सोडून निजामशाहीची चाकरी पत्करली. लखुजीराव जाधव व त्यांच्या दोन्ही पुत्रांची देवगिरीच्या दरबारात अत्यंत क्रूरतेने हत्या करण्यात आली. या घटनेने जाधव व भोसले कुटुंब हादरून गेले. वडील व दोन्ही भावांच्या हत्येची बातमी ऐकून जिजाऊंच्या मनाची अवस्था काय झाली असेल? आपल्या सासऱ्यांना व दोन्ही मेहुण्यांना निजाम शाही दरबारात झालेल्या दग्याने क्रोधित झालेले शहाजीराजे मोगलांकडे गेले. इकडे अकबराचा मृत्यू झाल्यावर सर्वत्र अनिश्चिततेचे वातावरण झाले होते. पुढे शहाजहानने दक्षिणेकडे कूच केले. महाराष्ट्राची जनता मुस्लिम अत्याचाराने ग्रस्त होती. स्त्रिया घरात देखील सुरक्षित नव्हत्या. शहाजी राजांनी कोणाचीही चाकरी पत्करली तरी त्यांनी आपले स्वत्व कधीही दुर्लक्षित केले नाही. ते अत्यंत कुशल सेनानी व युद्धनिपुण होते. संपूर्ण दख्खन प्रदेशात त्यांची कीर्ती होती. त्यांनी पुढे मोगल सोडून निजामासाठी युद्ध केलेत. मात्र माहुली गडाला दीर्घकाळ वेढा पडला व त्या तहात निजामशाही बुडाली.

आता दख्खन प्रांतात आदिलशाही व नावापुरती कुतुबशाही उरली. आदिलशहाने त्यांना बंगळूर येथे पाठवले. शहाजी राजांनी येथेही पूर्वकिनाऱ्यावरील बंदरांना जोडणारे मार्ग, पर्वतश्रेणीतील तटबंदी असलेले किल्ले आपल्या ताब्यात ठेवले. त्यांनी बादशहाची चाकरी करतानाही आपले डोळे व कान सतत उघडे ठेवले. प्रसंगी अनेकदा विरोधही केला. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक हालचालीवर बादशहाची बारीक नजर असे. शहाजी राजांचे कर्तृत्व मोठे होते. अनेक वर्षे पारतंत्र्यात असलेल्या आपल्या भारतभूमीचा इतिहास लेखन करताना अन्याय झाला आहे, आपल्याला जे दाखवले, सांगितले गेले ते सगळंच सत्य नव्हते. मात्र मातृभूमीवर अपार प्रेम व श्रद्धा असलेली काही माणसे प्रत्येक काळात आपले कार्य प्रामाणिकपणे करून गेली आहेत. आपल्याला आज तो योग्य इतिहास, संदर्भासहित अभ्यासण्याची गरज आहे. इतिहास हा केवळ अभ्यासकांसाठी नाही तर राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचा आपल्या गौरवशाली इतिहासावर अधिकार आहे. गडकिल्ले फिरताना देखील आपल्या इतिहासाच्या पाऊलखुणा तपासत मार्गक्रमण करण्याची सवय लागणे गरजेचे आहे. हिंदुस्थानातील जनतेवर अनन्वित अत्याचार करणारे क्रूर विदेशी शासनकर्ते, भारत देशातील कुणाचेही कधीच आदर्श नसावे, असे वाटत असेल तर वारंवार इतिहासाची उजळणी करावीच लागेल. म्हणून आपणही या लेखमालेत गडकिल्ले, सागरीदुर्ग फिरताना इतिहासाच्या पाऊलखुणांवर चालण्याचा प्रयत्न करूया.

पान २ वरून

## वक्त की शाँख के लम्हें

सख्या आणि अचानक कर्कश आवाजातला अलार्म वाजला आणि त्याला खाडकन् जाग आली मुंबईतल्या एका चाळीतील एका खुराड्यागत खोलीमध्ये त्याला जाग आली जेथे बाहेर नळावर पाणी भरणाऱ्यांचा कोलाहल सुरू झाला होता, चार दिवसांनंतर पाणी आले असल्याने किती भरू नि किती नाही या तयारीत भांडणे सुरू झाली होती. त्याची पत्नी देखील एव्हाना त्या गर्दीत हातात बादल्या घेऊन पोहोचली होती. याला जाग आलेली बघून एक बादली ठेवली आहे, लवकर घेऊन या असे ती खालून ओरडली. पाणी भरून त्याला लोकलच्या गर्दीत धक्के खात खात जीवनाचा मार्ग शोधायचा होता. चाळीच्या बाजूच्या केमिकल फॅक्टरीमधून रोजच्या प्रमाणे घाणेरडा दर्प सबंध चाळीत पसरला आणि त्याला त्याच्या वास्तवाची जाणीव झाली. गुलजारच्या पुस्तकातील वक्त की शाँख के लम्हें नहीं तोडा करते ही ओळ वाचता वाचता केव्हा झोप लागली ते आधल्या रात्री त्याला कळलेच नव्हते. आवरासावर करण्यासाठी त्याने गुलजारचे ते पुस्तक नीट ठेवण्यासाठी उचलले.

पाने उलटली होती त्याचे सहजच लक्ष गेले. गुलजारच्या लेखनाकडे. त्या पानावर गुलजारने लिहिले होते ''वक्त की शाँख पर कुछ लम्हें खिलते है, कुछ खिलकर मुरझा जाते है और कुछ बेचारे खिल ही नहीं पाते... वो तो बस सब्र का इम्तेहान देने के लिये ही पैदा होते है.'' आपल्या प्रत्येकाच्या जीवनरूपी वृक्षाच्या फांद्यांवर उगविणारे काळाच्या गर्भात दडलेले सर्वच लम्हे कवीला कसे काय कळतात?

पान ३ वरून

## मातृदेवो भव!


ध्ये सांगायचं झालं तर या देवी सर्वभूतेषु मातृ रूपेण संस्थिता... आणि या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता... याच शब्दांत सांगावं लागेल. आणि हाच तो भारतीय विचार आहे. प्रत्येक प्राण्याच्या प्रत्येक पेशीत आईरूपी शक्तीच्या रूपात जी संस्थित म्हणजे वसलेली असते.

संपूर्ण शरीराचा सर्वांत सूक्ष्म घटक म्हणजे पेशी. तिला स्वत:चं आयुर्मान असतं म्हणजेच ती तयार होते, काम करते आणि विशिष्ट काळानंतर मरते. पेशीच्या आयुष्यात तिला जिवंत राहण्यासाठी आणि निहित कार्य करण्यासाठी लागणारी ऊर्जा निर्माण करणारा मायटोकॉन्ड्रियन ही प्रत्येक अपत्याला त्याच्या आईनं दिलेली अमूल्य भेट आहे. ते अपत्य जिवंत असतं तोपर्यंत त्याची/तिची आई त्या मायटोकॉन्ड्रियनच्या रूपानं त्याच्या/तिच्या शरीराच्या पेशी पेशीत कार्यरत असते. संपूर्ण शरीरात सळसळणारी शक्ती आईनं दिलेल्या मायटोकॉन्ड्रियनमध्येच तयार होत असते. आपण आपल्या आईच्या ठायी असलेल्या याच देवीस्वरूपापुढे नतमस्तक होत असतो. आई होणं ही केवळ एक जैवरासायनिक प्रक्रिया नसून त्याला दिव्यत्वाचा अलौकिक स्पर्शही आहे. एवढा सगळा विचार त्या 'मातृदेवो भव' या वचनात आहे. मातेलाच देवी मानणे आणि तिच्यासह सर्वच विवाहित स्त्रियांचा सन्मान करण्याचा संस्कार हे सर्वच सभ्य लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचा अलंकार आहे. म्हणूनच या आपल्या भारतीय संस्काराचं कसोशीनं पालन करणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.

### सेवानिवृत्ती

नोकरीतूनी होईन रिटायर जेव्हा मी छंद
आवडीनिवडी जपेन माझ्या देईन उजाळा साऱ्या
आठवणींना राहीन असा की जसा मनाचा राजा
भटकेन गावच्या शेत शिवारात गाईन मोकळे
आकाशाचे गीत अवखळत्या सरिता गाय बैल सारे
मानेन तयांना मी माझे गणगोत
मी करेन गप्पा प्रेमळ पत्नीसोबत वाचेन प्रीत मी
अबोल डोळ्यामधली हातात घेऊनी हात चंदणी
अलगद फुलवेन शहारा फुलराणीच्या गाली
खेळेन कधी मी नातू पणतू संगे
सांगेन कथा मी चांदोबाच्या त्यांना
जाईन कधी पेठेच्या गावी तेव्हा म्हणतील मला
आजोबा लाडू आना!
राहीन उभा मी देवाच्या दरबारी घेऊन टाळ अन्
मृदुंग चिपळ्या हाती गाईन गोडवे श्रीरामाचे माझ्या
रुद्राक्ष माळ अन् गुलाल बुक्का माथी

देवेंद्र जोशी



पान ४ वरून

## बदललेल्या ऋतूचे संदर्भ: ग्रीष्म

जातीय त्याच्या भिंतीत काही समाजाच्या नशिबात कायमच ग्रीष्माचे ऊन आणि जन्माची तहान असताना चिमणी कावळ्यांची तहान भागवणारी संस्कृती किती महान होती? असा प्रश्न मला अनेकदा पडतो. ऋतूंचे असे संदर्भ बदलत गेले तरी ग्रीष्मातल्या ह्या तप्त उन्हामध्ये एक अद्भुत असे सौंदर्य काल लपलेले असायचे ते आजही आहेच.

अगदी काटेरी बाभळीची पिवळी फुले, लिंबाच्या कडूसार पानातून डोकवणारा लिंबाचा मोहर, पिकलेल्या निंबोळ्या यासह एक कमालीची गुढ शांतता ग्रीष्मामध्ये दडलेली असते. वसंत ऋतूमध्ये जे नैसर्गिक सौंदर्य बहरून आलेले दिसत होते. त्याला विराम देण्याचे काम ग्रीष्म करत असतो. मात्र, चैत्रामध्ये बहरलेल्या चाफ्याच सौंदर्य शिगेला पोहोचते! भर उन्हामध्ये फुलून सूर्याला वाकुल्या लावत आपल्या अस्तित्वाची ओळख निर्माण करणाऱ्या झाडामध्ये चाफा हे माझं एक आवडतं झाड.

ग्रीष्मात फुलणाऱ्या आणि भरून येणाऱ्या प्रत्येक झाडावर फुलांवर भुंगे रुंजी घालत असतात. चिमणीपेक्षा लहान आकाराचा काळा फुलचुख्या हा पक्षी फुलांमध्ये उलटा होऊन मध टाकत असतो. या सर्व फुलवेड्या पक्षांचे गायनही मैफिलीत बसलेल्या गवयाच्या चढाओढीने सुरू असते. ग्रीष्मात कावळ्याचे घर दिसले की पावसाळा जास्त होणार असा अंदाज आजही ग्रामीण भागात काढला जातो. अर्थात या अंदाजाबद्दल तो कावळा आणि अनभिज्ञ असेलच.

एकंदरीत ऋतूचे परिमाणे बदलत चालले आणि ऋतूचे संदर्भ बदलत गेले तरी ग्रीष्मातला संपूर्ण चराचराला त्राहीमान करून ठेवण्यासाठी अजूनही तितक्याच प्रखरपणे कार्य करत आहे हे निश्चित!



# मन- शरीर समन्वय

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com




सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६४

या त्रयी मधील फक्त काया दृश्य आहे, शरीराला स्पर्श करता येतो. बाकीच्या दोघांचे अस्तित्व स्वतःशिवाय कोणालाच जाणवत नाही. आधी एकेकाला समजावून घेऊ या म्हणजे त्यांच्यातील बंध जाणून घेणे सोपे होईल. मानवाची ही तीन उर्जाकेंद्रे आहेत आणि आपल्या सगळ्या दृश्यादृश्य गतिविधींसाठी जबाबदार आहेत.

**मन-**

तोरा मन दर्पण कहलाये सारख्या चित्रपटगीताच्या प्रसिद्ध ओळी मनामध्ये भले-बुरे जे असते, त्याचे प्रतिबिंब त्या आरशात दृगोच्चर करतात. अचपळ मन माझे, नावरे आवरिता अशी हत्यारे मनासमोर टाकून देत आपण पांढरे निशाण हाती घेतो. मग समर्थांना मनाला बोध करण्यासाठी मनाचे श्लोक लिहावे लागतात. माणसाच्या मनाला बागेची उपमा देता येईल. जमिनीची नांगरणी करून, तिला खतपाण्याची जोड देऊन, तिच्यातील तण, काटे काढून तुम्ही चांगल्या फळाफुलांची लागवड करीत असता, त्यांना पाणी घालून जगवत असता तसेच मनाच्या बागेचेही असते.

मनातील अशुद्ध घटक दूर सारून तेथे आस्थेचे, श्रद्धेचे बीजारोपण करून ती बाग फुलवू शकता. त्यासाठी राग, लोभ, क्रोध, भय अहंभाव, भ्रम अशा भावनांचा त्याग करून तेथे दैवी विचारांची पेरणी करायला हवी. पावसाळ्यात तण उगवतात आणि उन्हाळ्यात ते अदृश्य होतात. मात्र त्यांचे बीज भूगर्भाखाली तसेच लुप्तावस्थेत उरते. पुन्हा पाऊस आला की त्यांना नव्याने अंकुर येतात. मानवी वृत्तींचे असेच असते. सजग मनाच्या पृष्ठभागावर हे बीज डोकावते, दिसेनासे होते, सूक्ष्म बीजावस्था स्वीकारते- हे असतात संस्कार, अस्तित्वाचे ठसे. पुन्हा बाह्य अथवा अंतर्गत कारणांमुळे या संस्कारांचे रूपांतर नव्या वृत्तींमध्ये होते. जेव्हा बगीचा स्वच्छ असतो, तेथे कोठलेही तण नसतात आणि मग चांगली फळे आपोआप उगवतात. मन साफसुथरे असले, त्यामध्ये कोठलेही विषारी द्रव्य नसले, की तेव्हा खोलवर ध्यान केले तर त्याची दूरगामी फळे लाभतात. म्हणून आधी अशुद्ध घटक धुवून मन स्वच्छ करणे हे प्राथमिक कर्तव्य ठरते. त्यानंतरच ध्यानधारणेचा प्रवाह शरीरातून वाहतो.

**अतिविचार**

माणसांना विनाकारण खूप विचार करण्याची सवय लागलीय.हे विचार भूतकाळातील आघातांबद्दल जसे असतात तसेच भविष्याच्या अनिश्चिततेबद्दलही असतात. मेंदूचा प्री- फ्रँटल (मेंदूचा फ्रंटल लोब कपाळाच्या अगदी मागे असतो. ते विचार, भावना आणि व्यक्तिमत्व व्यवस्थापित करते. तसेच स्नायूंच्या हालचालींवर नियंत्रण ठेवते आणि आठवणींची साठवण करते). कॉर्टेक्स हा भाग म्हणजे मानवी मेंदूचे नियोजन क्षेत्र असते. शक्यतांचा विचार करून निर्णय घेणे त्याचबरोबर भावी जीवनाविषयी सतत चिंताग्रस्त असणे हे या क्षेत्राचे कार्य. हा कॉर्टेक्स अति क्रियाशील झाला की मेंदू विश्रांती घेणे थांबवितो.

डिफॉल्ट मोड नेटवर्क (मेंदूतील एक विशिष्ट संपर्कजाळे जे सामान्यतः आपण विश्रांतीच्या स्थितीत किंवा कामात नसताना सक्रिय असते, जसे की स्वतःबद्दल विचार करणे, भूतकाळाची आठवण काढणे किंवा फक्त डोक्यात विचार फिरवणे. हे संपर्कजाळे अनेक वेगवेगळ्या मेंदूच्या भागांचा समावेश असलेले एक मोठे जाळे आहे. हे संपर्कजाळे अनेकदा आपल्याला जैसे थे स्थितीत ठेवते, म्हणजे जेव्हा आपण एखाद्या विशिष्ट कामावर लक्ष केंद्रित करत नाही, तेव्हा हे सक्रिय होते.) ही मेंदूतील आयडल मोड सिस्टिम (निष्क्रिय यंत्रणा) असते- जेव्हा काही करत नसतो तेव्हा सुद्धा विचार चालूच असतात.

मेंदूतील अमिग्डाला ही बदाम-आकाराची ग्रंथी भावना, भीती, आणि आठवणींशी संबंधित आहे. खरेतर मेंदूची ही धोक्याचा इशारा देणारी घंटा मानता येईल. तिला सतत वाईट काय होऊ शकते, याचा विचार करणे किंवा त्या वाईट परिणामासाठी तयारी करणे एवढेच करता येते. यातूनच चिंता, वैफल्य, शंका आणि पश्चात्ताप जन्म घेतात.

**अतिविचाराचे दुष्परिणाम-**

१) झोप न लागणे
२) एकाच गोष्टीभोवती घोटाळणे
३) निर्णय घ्यायला घाबरणे
४) काहीच केलं नाही असं वाटणं
५) मनात शंका, शरीरात थकवा

ऊर्जाशोषक आणि ऊर्जादायक घटकतत्वे

ऊर्जा शोषून घेणारे- भूतकाळात अखंड निमग्न, अनिद्रा, सदा गडबड/ गोंधळ (अस्ताव्यस्त), अति काम, समाजमाध्यमांत रमणारे, नकारात्मकता, निर्जलीकरण (शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी), मद्यप्राशन, निःसत्व अन्न (जंक किंवा फास्ट फूड), ताण-तणाव, भय इत्यादी वैशिष्ट्ये

ऊर्जादायक- संगीत, निसर्ग, विश्रांती, सूर्यप्रकाश, सकारात्मकता, कृतज्ञता, ध्यानधारणा, शरीराची पुरेशी हालचाल, श्वसनावर लक्ष, मनाची झाडझूड/साफसफाई , नवीन काहीतरी ग्रहण करणे, समतोल आहार इत्यादी वैशिष्ट्ये

**शरीर-** सर्व सुखाचे आगर असलेलं मानवी शरीर सगळं भोगत असतं -सुखदुःख, वेदना, आनंद, हर्षामर्ष! मनाला सामावून घेत ते त्याच्याशी जुळवून घेण्याचा सतत प्रयत्न करीत असते. काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल या ओळींमधून शरीर आणि आत्मा कसे जोडले गेलेले आहेत याची रम्य उपमा जाणवते. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम असं शास्त्रवचन एवढेच सांगते की शरीर हे प्रभावी माध्यम आहे ज्याद्वारे मनाची, हातून घडणाऱ्या कृत्यांची मशागत करता येते.

**शरीरातील भावनांची उर्जाकेंद्रे**

मानवी शरीरातील विविध अवयव आणि त्यांचा विविध भावनांशी असलेला बंध-

**हृदय-** प्रेम, करुणा, आनंद आणि नातेबंध

मज्जारज्जूचा शेवटचा भाग- भय

**ऊर्ध्व उदर (पोटाचा वरचा हिस्सा)-** भय, अनिश्चितता, असुरक्षितता

**घसा -** संवाद, नवनिर्मिती, अभिव्यक्ती

**आत्मा-**

आत्मा अविनाशी असतो. शरीर आणि मनावर ताबा ठेवण्याचे अवघड कार्य आत्म्याकडे असते. अध्यात्माच्या मार्गाने आत्म्याचे महत्व जाणून घेता येते. माणसा- माणसांमध्ये फरक असला तरी-ही सगळ्यांना जोडणारे तत्व शेवटी एकच असते. तेच सगळ्यांना जोडून एका पातळीवर आणू शकते. जरी आपल्या भाषा वेगळ्या असल्या, आपली आराध्य दैवते निरनिराळी असली, आपले खाद्य वेगळे असले तरीही आपला आत्मा एकच असतो. माझा आणि तुमचा आत्मा एकच असतो आणि आत्म्याची भाषा एकच असते. भलेही मी भारतीय भाषा बोलत असेन आणि कोणी इंग्रजी, कोणी फ्रेंच तर कोणी जर्मन मात्र त्या साऱ्यांचा मतितार्थ शेवटी एकच असतो. पुरुष, स्त्री, बालक साऱ्यांच्या आत्म्याची भाषा एक असते. व्यक्तिमत्वाचे पैलू बदलतील पण आत्मा तोच असतो. मानवातील एकीसाठी हे सामायिक व्यासपीठ असते.

पुलं तुझं आहे तुजपाशी नाटकात म्हणतात- आत्मा अमर आहे. आपली शास्त्रे त्याची पुष्टी करतात. मनासारखाच आत्माही निराकार असतो. पण भावभावनांनी तो प्रदूषित होत नाही. मानवाच्या मृत्यूनंतर शरीराचे दहन/ दफन केले जाते कारण ते नाश पावणारे असते, त्याला वर्षांच्या भाषेतील आयुष्य असते. व्यक्ती गेल्यावर त्याचे मनही नष्ट होते. मात्र आत्मा काया बदलतो. गीतेचा दुसरा अध्याय म्हणतो- वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि। तथा शरीराणि विहाय जीर्णा- न्यन्यानि संयाति नवानि देही।। (मनुष्यप्राणी जीर्ण वस्त्रांचा त्याग करून नवे वस्त्र धारण करतो, तद्वत जीवात्मा जुने शरीर सोडून नव्या शरीरात प्रवेश करतो).

ऑल इंडिया रेडिओचे एक पदाधिकारी एकदा एका नावाजलेल्या व्यक्तीकडे येऊन म्हणाले- देशाच्या उभारणीत धर्माचे स्थान या विषयावर तुमचा संदेश द्या. त्यांना प्रश्न पडला- हे म्हणजे आत्मा आणि शरीर यांचे नाते यावर भाष्य करण्यासारखे झाले! आत्मा नसेल तर शरीराच्या अस्तित्वाला अर्थ तो काय ? तुमच्या व्यक्तिमत्वातील आत्मा वगळा, आणि बघा काय मागे उरते ते! क्षणात तुमचे तुकडे होतील. हे कसे होईल, हा प्रश्न तुम्हाला पडेल.

आत्मा काही आपल्या शरीरात एखाद्या गुरुत्वमध्यासारखा स्थिर नसतो. हे आत्मतत्व शब्दांमध्ये सामावणारे नसते. विद्युत ऊर्जेसारखे आत्मतत्व असते. विद्युतशक्ती डोळ्यांना दिसत नाही, पण म्हणून तिचे अस्तित्व नाकारता येत नाही. ती जाणवते कारण ती अदृश्य रूपात असते. ती प्रत्येक निर्मितीमध्ये समाविष्ट असते. प्रत्येक अणूत असते. तसेच आत्मा प्रत्येक प्राणीमात्रात, चराचरात असतो. शरीराच्या कोपऱ्यात एखाद्या किड्यासारखा किंवा एखाद्या पात्रात ठेवलेल्या दिव्यासारखा तो स्थानबद्ध नसतो. असं मानणं हाच बालिशपणा होईल. शरीरातील पेशींना एकत्र बांधणारा, त्यांना देहस्वरूप देणारा एक घटक म्हणजे आत्मा! मनातील विचारांना दृश्य स्वरूप देतो तो आत्मा! ज्याला तुम्ही स्वतःचं असं म्हणू शकाल त्यांच्यात समन्वयाचे काम करतो तो आत्मा! म्हणूनच आत्मा काढून घेतला तर आपण उरणार नाही.

ज्याला तुम्ही मी म्हणता तोच प्रत्यक्षात आत्मा असतो. तुमच्यापेक्षा त्याला वेगळं असं अस्तित्व नसतं. तुम्ही तुमचे जे काही आहात, तो प्रत्यक्षात आत्मा असतो. तुम्हाला वेगळा आत्मा नसतो, तुम्हीच आत्मस्वरूप आहात. माझ्या आतमध्ये आत्मा वास करतो असे म्हणू नका. तुम्ही म्हणजेच आत्मा आणि आत्मा म्हणजेच तुम्ही!

तेव्हा आत्म्याकडे दुर्लक्ष्य म्हणजेच स्वतःला नाकारणे! मग आयुष्य ते काय राहील? धर्म हे आत्म्याचं शास्त्र आहे. हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध, इस्लाम हे धर्म नाहीत. सामाजिक संदर्भांसाठी धर्माने धारण केलेले ते एक स्वरूप आहे. धर्म म्हणजे आत्म्याचे वैशिष्ट्य आहे- बाह्यवर्तनाचे आणि कर्तृत्वाचे! तुम्ही जर आत्मस्वरूप धारण केले तर धर्म तुमचे बाह्यवर्तन बनतो.

तुमच्या कर्तृत्वाची चौकट बनतो. धर्म मग तुमच्या आत्म्याचा हुंकार बनतो. तेव्हा धर्माविना जगण्याचा विचारच मुळी अविश्वसनीय आहे. धर्माविना जीवन ही संकल्पनाच अशक्य आणि अतर्क्य आहे. मात्र मनाला हे पटवून देणं अवघड आहे. अध्यात्म, देव, धर्म, समाज या साऱ्यांबाबत आपल्या मनात गोंधळ असतो.

शारीर असंतुलनाची पाच लक्षणे आणि त्यांचे होणारे नकारार्थी परिणाम- मन- काया यांच्यातील समतोल ढळला की तो अनेक प्रकारे पृष्ठभागावर येतो- मनो- दैहिक विकार, शरीराच्या अंतर्गत असलेल्या नैसर्गिक घड्याळामध्ये बिघाड (त्यामुळे नैसर्गिक झोप-जागणे या चक्रात अडथळा येणे), विघटनाची लक्षणे (स्मृतिभ्रंश, स्व-जागरूकतेत बदल, वास्तव आणि काल्पनिक यांच्यातील फरक ओळखण्यात अडचण, भावनांवरील नियंत्रण गमावणे इत्यादी) तीव्र ताण, आघात किंवा मानसिक विकार यामुळे हे संभवते. याव्यतिरिक्त भावनांची हाताळणी करण्यात गल्लत, शरीराच्या खाणाखुणा (भूक, वेदना वगैरे) न समजणे.

ताण आणि नकारात्मक विचार बहुधा मान, खांदे पाठ यांच्यात ताठरपणा आणतात असं स्चेल यांचे २००८ सालचे संशोधन आहे. म्हणून समन्वय अत्यावश्यक मानला जातो. हा समतोल आपल्या भावनिक-शारीरिक-मानसिक नातेबंधाशी जवळून जोडला गेलेला आहे. त्याच्याशी जुळवून घेतले की स्वास्थ्य सुधारते.

आपले विचार, भावना आणि आस्था शरीरात प्रतिसाद निर्माण करीत असतात आणि अंतःस्रावांचे नियमनही! ताणामुळे शारीरिक व्याधी वाढीला लागतात. शरीरातील जाणिवा आपल्या मनावर परिणाम घडवत असतात. उदा. वेदना, थकवा, शीण, आजार यामुळे आकलनावर परिणाम होत असतो. यावर उपाय म्हणजे- मनानुभूती, ध्यानधारणा, योगासने, व्यायाम! या क्रियांमधून आपला शरीरविषयक अभ्यास वाढतो आणि भावनिक समतोल साधता येतो. या त्रयीतील संतुलनाचे अनेक फायदे आहेत.

तणावांचे व्यवस्थापन, भावनिक शिस्त, शरीरस्वास्थ्य. मग सर्वंकष दृष्टिकोन विकसित करता येतो. कॉर्टिसॉल ची पातळी उतरते, प्रतिकारक्षमता सुधारते आणि जाड्य ताब्यात येते. शरीरात साठून राहिलेले तणाव ( भूतकाळातील ताण वा आघात यामुळे निर्माण झालेले) हळूहळू मुक्त होतात. दैनंदिन जीवनातील एकाग्रता वाढते, मूड प्रसन्न होतो, आणि भावनांचे नियमन साध्य होते.

थोडक्यात या त्रयीकडे लक्ष पुरविले तर सर्वंकष उपचार शक्य होतात, केवळ शारीरिक नाही. त्यासाठी वैद्यकशास्त्र जसे आहे, तसे मनासाठी मानसशास्त्र आहे आणि आत्म्याच्या विकासासाठी अध्यात्मशास्त्र आहे. या तिघांचा संयोग उत्तम आरोग्य आणि जीवनमान प्रदान करू शकतो. कोरोना नंतर शारीरिक आणि मानसिक क्षमता पूर्णपणे विकसित करण्याचे महत्व अधोरेखित झालेले आहे. उत्तम आरोग्य आणि भरभराट साधण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि मानसिक आरोग्य जपणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या जीवनशैलीत आपण सकारात्मक बदल करणे एवढेच आपल्या हाती असते.

# चंदनाची उटी। नाना लाभे।।

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

(भाग-५२)



संसारी तपाने खरोखरच हा जीव त्रासला आहे. आपण कितीही चांगले वागलो, सकारात्मकतेचा पुरस्कार कायमच करत गेलो, तरी घडतं मात्र विपरीतच. ज्याचा कधी आपण स्वप्नातही विचार केला नव्हता ते विषारी ताट समोर येतं याला काय म्हणावं? खाताही येत नाही आणि टाळताही येत नाही. इतका विचित्र डाव असतो नियतीचा?

विश्वासघाता सारखं वेदनादायी दुसरं काय असतं? माणसं ओळखायला कमी पडलो की, माया-ममतेत अडकून पडलो? नेमकं काय घडतय? अनुत्तरित प्रश्नांनी मनात काहूर घालायला सुरूवात केली. बुध्दीच्या कक्षा कमी पडल्या की, मनाचा संयम डळमळू लागतो. वाटतं आपल्याला लाभलेला हळवेपणा हा शाप तर नसेल ना? की पूर्वजन्मीचा आपल्याच रक्तातला हा काळसर्प तर नसेल हा, की जो असा हात धुवून मागे लागलाय पिसाळल्यागत? प्रश्नांचा डोंगर जसा जसा चढत जाऊ तसा तसा तो अधिकाधिक अक्राळविक्राळ होत जातो. याचं मुळ शोधता शोधता हयात गेली पण हाती काहीच लागलं नाही. यातून एक मात्र कळून चूकलं की, नेकी कर और दराया में फेंक हे जमायला हवं होतं. हाच तर निष्काम कर्मयोग!

पण... आपल्यासरखंच जगही सरळमार्गी असतं ही मनाशी असलेली खूणगाठ काही सोडवता आली नाही. आणि अपेक्षा हीच दुःखाला कारणीभूत असते हे तर फारच उशीरा कळालं असं वाटलं आणि मन पश्चतापाच्या अग्नित होरपळू लागलं. पूर्वजन्मीच्या त्या काळसर्पानच फरपटत आणलं ह्या गुढमय गुहेपाशी. तेव्हा अवघा देह पांगळा झाला होता.

एक चैतन्यमय किरण अंगावर पडला तेव्हा पांगुळलेला देह वळवळायला लागला आणि त्या किरणाच्या मागे मागे गुमान सरपटु लागला. याला काय म्हणावं? तो काळसर्प कुठे गायब झाला? हा निवृत्ती दादाचा डरकाळी फोडणारा वाघ तर नसेल? फुत्कारत फरपटत इथपर्यंत आणणारा? पांगळ्या देहात त्राण तर नाही, मग कसा वेध घेऊ या किरणाचा? तो साधा सुधा थोडाच किरण होता? इंद्रायणीच्या डोहात डुबकी मारून सोन्याच्या पिंपळाखाली विसवा घेऊन मोगऱ्याची सुगंधी कुपी घेऊन आला होता हे कळायला नाही म्हटलं तरी उशीरच झाला होता. पण चौदाशे वर्षा एवढा दीर्घही नव्हता. पांगुळलेला देह सरपटत सरपटत रक्तबंबाळ झाला तरी त्यानं किरणाचा पाठलग काही सोडला नाही. किती जनमाची पायपीट होती कुणास ठाऊक पण आता तुळस मंजिरीचा गंध चंदनासवे अंतरात दर्वळू लागला. समोर लख्ख प्रकाशाचं तेजोवलय दिसु लागलं. डोळे उघडे की मिटलेले होते याचं भान कुठे होतं जीवाला?

नमोजी आद्या...चे गंधर्वीय सूर कानावर पडले आणि उरली सुरली भ्रांतही हरवली. डोळ्यातून इंद्रायणी चंद्रभागा वाहु लागल्या. आता देह देह उरला नव्हता तो फक्त हात जोडून आणि विनम्रपणे काही तरी मागत होता. काय मागत होता. आणि काय पसायदान (प्रसाद) मिळालं ते आपण **चंदनाची उटी । नाना लाभे ।।** या अभंग रचनेत सविस्तरपणे पाहु...

**असेन जरी मी । देहाने पांगळा ।।**
**बुद्धीने चांगला । ठेव देवा ।।१।।**

देह हा नाशवंत आहे आणि आत्मा हा अमर आहे हे अनादी कालापासून आम्ही ऐकत आलो आहोत. पण ते फक्त पोपटपंचीच ठरते. तरीपण या नाशवंत, नासक्या देहाचेच लाड पुरवण्यात अख्खी हयात घालवतो. आणि आपल्यात जो प्रत्यक्ष परब्रह्म परमात्माच आत्म्याच्या रूपाता वास करतो, त्याला मात्र सोयिस्करपणे विसरतो. असे का? याचे मुळ कारण म्हणजे अज्ञान आणि आमच्या ठायी असलेली आत्मानुभूतीची उणीव ही आहे. जोपर्यंत कोणत्याही गोष्टीची अनुभूती येत नाही तोपर्यंत ती सत्य तरी कशी मानावी?

चांगला, चांगला, धष्टपुष्ट, लुळा पांगळा या सगळ्या उपाध्या देहाला चिकटलेल्या आहेत. आत्म्याला याचे काहीच देणेघेणे नाही. तो पाऱ्यासारखा अलिप्त आहे. तो कशालाच साधा स्पर्शही करत नाही म्हणूनच तो अविनाशी आहे. कपडे जीर्ण झाल्यावर जसे आपण ते बदलतो, तसा आत्मा देह किंवा शरीर बदलतो. म्हणून तो या देहात असूनही कधी त्यात चुकूनही गुंतून पडत नाही. आणि आपणही त्याला जाणून घेण्यचा कधी प्रयत्नही करत नाही. कारण बुद्धीवर इंद्रिय सुखाची आणि अहंकार, विकाराची एवढी जळमटं चढलीत की आत्मरूपाची ओळख करून घ्यावी म्हणून त्याकडे बुद्धी वळत नाही. पण देवा जन्मोजन्मीच्या पुण्याईने ज्ञानेश्वरी- गाथेचा परीस हाती आला, आणि माऊलींनी पहिल्याच ओवीत आत्मरूपाला वंदन केलं आणि बुद्धी खडबडून जागी झाली. माऊलींच्या हळुवार फुंकरीनं अनादी कालापासून बुद्धीवर साचलेली जळमटं आत्ता कुठे दूर होऊ लागलीत. हे पूर्व संचितच म्हणावं. देवा तुला हात जोडून एकच कळकळीची विनंती आहे की, मी पामर देहाने किती जरी पांगळा असलो, पिडीत असलो तरी त्याबद्दल माझं काहीच म्हणनं किंवा तुझ्याकडे त्याबद्दल काहीही मागणं नाही. वाटल्यास या देहाला आणखी त्रास दे. मी तुझ्याकडे कसलीही तक्रार करणार नाही. पण एक मागणं मात्र आहे देवा तुझ्याकडे की माझ्या बुद्धीने स्वधर्माचं आचरण करून आत्मस्वरूपाकडे प्रवास सुरू केला आहे. माहित नाही तो केव्हा पूर्ण होईल ते. पण ज्या बुद्धीनं माझ्या माऊली-तुकोबाचं बोट धरलय ती बुध्दी मात्र कधीच भ्रष्ट न होऊ देता, एका निरागस बाळासारखी चांगली ठेव कारण मला हे माहिती आहे की माऊली-तुकोबाकडे निरागस बाळ होऊन गेल्यानंतर ते सर्व गुन्हे माफ करून प्रेमाने ज्ञानरूपी पान्हा सोडतील आणि बोट धरून आत्मरूपाकडे घेऊन जातील.

**माझ्या मना लागो । सदा तुझे ध्यान ।।**
**चित्ती समाधान । नाही दुजे ।।२।।**

देवा, संत संगतीत संसार बंधनाच्या गाठी हळूहळू सुटायला सुरूवात होत आहे. तरीपण कुठे तरी शंकेची पाल चुकचुकत आहे की, हे द्वाड असं चंचल मन धोका तर देणार नाही ना? माऊलींनीच म्हटल्याप्रमाणे,

**कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा अंधळेपणाचे डोहाळे । का असते आपुले डोळे । आपण झाकी ।।७३।।** अ.०६

आत्ता कुठे जन्मोजन्मीच्या पुण्याईने व महत्प्रयासाने ह्या द्वाड मनाचा प्रवास या भवबंधनातून आत्मरूपाकडे (परमार्थाकडे) सुरू होत आहे. आणि हा अखंड प्रवास चालण्यासाठी माझ्या डोईवर तुझे कृपाछत्र असणे आवश्यक आहे. त्यासाठी मनाला सदासर्वकाळ फक्त आणि फक्त तुझच ध्यान लागावं. मन स्थिर व्हावं तेव्हा कुठे माझ्या चित्ताला समाधान मिळेल. खरोखरच चित्ताला समाधन हवं असेल तर तुझ्या ध्यानाशिवाय किंवा तुझ्या नामा शिवाय अन्य कुठे ते मिळणार नाही. मला वाटतं हाच तुझ्या नामस्मरणा इतका सोपा मार्ग अन्य कोणता नाही.




समाजभान

कर्नल अभय पटवर्धन
(निवृत्त)

# जिहादी रणनीती

२२ एप्रिल २०२५ ला दुपारी साडेतीनच्या सुमारास झालेला पहलगाम हल्ला हा जिहादी आतंकी रणनीतीतील लक्षणीय बदल उजागर करतो. द रजिस्टन्ट फ्रन्टने (टीआरएफ) हल्ल्याची कथित जबाबदारी स्वीकारणे ही निव्वळ धूळफेक आहे. त्यांनी जबाबदारी घेतल्यामुळे, लष्कर-ए-तोयबा (एलईटी) व पाकिस्तान आपले हात झटकू शकतो/झटकेल. संरक्षण तज्ज्ञांनुसार, काश्मीरमधील निःशस्त्र पर्यटकांवर केलेला हल्ला म्हणजे, पाकिस्तानने काश्मीर/श्रीनगर खोऱ्यातील कायदा, सुरक्षा व अर्थव्यवस्था अस्थिर करण्यासाठी केलेला हताश प्रयत्न आहे. टीआरएफ एक स्थानिक आतंकी संघटना असल्यामुळे, या क्षेत्रातील अर्थव्यवस्थेला धक्का पोचवणारा पर्यटक हल्ला ते कधीच करणार नाहीत. हे पाकिस्तानी आतंक्यांचंच कृत्य आहे. यापूर्वी स्थानिक आणि पाक/विदेशी आतंकवाद्यांनी अमरनाथ यात्रेकरूंवर हल्ला केला होता. पण तो धार्मिक हल्ला होता. पण; पहलगाम हल्ल्यामुळे येथील व खोऱ्यातील धंद्यावर वाईट परिणाम होईल, पर्यटक त्यांचे बुकिंग रद्द करतील, हॉटेल्स रिकामी होतील, बाहेरून येणारे लोक काश्मीरमध्ये यायला घाबरतील आणि अर्थव्यवस्था डळमळीत होईल. पाकिस्तानला हेच हवं आहे.

एका बाजूला आतंकी हल्ला होत असताना दुसरीकडे पाक आर्मीच्या छत्रछायेखाली घुसखोरी होते आहे हा केवळ योगायोग नव्हता, यावरून हा एक मोठा प्लॅन होता हे निःसंशयपणे सिद्ध होतं. भारतीय सुरक्षा यंत्रणांची तपासणी करण्यासाठी पाकिस्तानने हा हल्ला केला असावा. हा हल्ला पाकच्या व्यापक आणि समायोजक रणनीतीचा भाग आहे. भूभागाचा फायदा, प्रतिसादाची चाचणी, असुरक्षिततेचा शोध घेण्यासाठी स्थानिकांची/आयएसआयच्या स्लीपर सेल्सची मदत, नियंत्रण रेषेवर शस्त्रसंधी उल्लंघन आणि घुसखोरीचे प्रयत्न हे सर्व या चौकशी/तपासणीचा हिस्सा होते/आहेत. भारताच्या धोरणात्मक भूमिकेची चाचणी घेण्यासाठी या एकत्रित कृती, एक कॅलिब्रेटेड चौकशीच्या रूपात केल्या जातात आहेत असं म्हटल्यास ते वावगं होणार नाही. पहलगाम, जम्मू-श्रीनगर हाय वे लगत, अनंतनागच्या पूर्वेला ३० किलोमीटरवर वसलं आहे. तेथे सहा कुरण/ग्रेझिंग ग्राऊंड्स आहेत. त्यातील एक, बैसरन खोर, त्याच्या शांत सौंदर्यासाठी 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखलं जातं. बैसरन कुरण/मिडो/ग्रेझिंग ग्राऊंड हे, एक किलोमीटर वर्ग लांब रुंद असलेलं मैदान, तेथील सर्वांत मोठ टुरिस्ट अट्रॅक्शन आहे. सांप्रत या मैदानामध्ये राहण्यासाठी तंबू, रेस्टॉरेंटसब, पोनी राईड, गेम्स आणि इतर मनोरंजनाची साधनं उपलब्ध आहेत. या मैदानावर, बॉबीसारख्या जुन्यापासून ते रॉकी और रानी की प्रेम कहाणी या नवीनतम सिनेमापर्यंत शूटिंग्ज झाली असल्यामुळे हे प्रसिद्ध ठिकाण बनलं आहे.

पहलगाम येथील बैसरन खोऱ्यात घडलेल्या या घटनेत जिहादी आतंक्यांनी पर्यटकांच्या एका गटावर हिंदू असल्याची पुष्टी केल्यानंतर त्यांच्यावर बेछूट गोळीबार केला. टीव्ही फुटेजमध्ये, अर्धनग्न अवस्थेत मृत्यू पडलेला एक इसम दिसतो. बहुधा त्याची सुंता झाली का याची खात्री करण्यासाठी आतंक्यांनी त्याला पॅन्ट काढायला लावली असेल. पहलगाम आतंकी हल्ल्यातून वाचलेल्या महिलेनुसार; आतंक्यांनी तिच्या पतीला मारलं पण 'जा आणि मोदींना हे सांग' असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदींना देण्यासाठी तिला जिवंत सोडलं. शेवटी तिच्या डोळ्यांसमोर त्याचा जागीच मृत्यू झाला. स्थानिक नागरिक जखमींना मदत करण्यासाठी धावले. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अगदी जवळून गोळ्या झाडल्या. हल्ल्याच्या ठिकाणाहून मिळालेल्या दृश्यांमध्ये इकडे तिकडे पडलेले मृतदेह आणि रुदन करणाऱ्या महिला दिसून आल्यात. एका व्हिडीओत निसर्गरम्य कुरणात चालणारा इसम गोळीबाराचे आवाज ऐकून पळताना दिसतो. हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी लगेचच परिसराला वेढा घातला आणि दहशतवादविरोधी मोहीम सुरू करण्यात आली. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केल्यानंतर निर्माण झालेला गोंधळ, भीती आणि भयावह किंकाळ्यांचा आवाज वातावरणात ऐकू येत होते. हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना शोधण्यासाठी लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिस पहलगामच्या बैसरन भागात एकत्र काम करत आहेत. पहलगाममधे पर्यटकांची तोबा गर्दी अपेक्षित असताना पोलिसांनी; रोड ओपनिंग, कॉँव्हाय प्रोटेक्शन, सर्वस्तरीय पेट्रोलिंग, क्विक रिॲक्शन टीम्स या बाबतीत काय केलं हे राज्य सरकारने स्पष्ट केलं पाहिजे. पर्यटकांना अशा ठिकाणांवर पहलगाममधील गाईड्स घेऊन जातात. पोनी राईड तेच करवतात. ठिकाणांवर गेल्यावर, स्थानिक खाण्यापिण्याचं बघतात. अशाच लोकांनी प्रत्येक ग्रुपमधील लोकांचे डिटेल्स आतंक्यांना कळवले असणार. या लोकांपैकी कोणीच मारलं गेलं नाही. टुरिस्ट सीझन सुरू झाला होता, अमरनाथ यात्रेचं बुकिंग दहाच दिवसांनी सुरू होणार होतं. पण या ठिकाणांवर, पर्यटकांना वाचवण्यासाठी किंवा आतंक्यांच्या गोळ्या झेलण्या/खाण्यासाठी एकही पोलिस किंवा जवळपास पोलिस पोस्ट नव्हती. पर्यटकांचा धर्म आणि कंपोझिशन आतंक्यांना माहीत होतं. त्यांनी विचारून फक्त खात्री केली असणार. सेना व पोलिसांनी स्थानिक लोकांची कसून चौकशी करणं अपेक्षित आहे. कारण पहिलेपासून, म्हणजे पर्यटकांची माहिती व संख्येपासून ते आतंकी जंगलात पळून जाईस्तोवर नक्कीच त्यांना स्थानिकांची मदत मिळाली आहे. म्हणून तर एक नौसेनाधिकारी आणि आठ इंटलिजन्स ब्युरोचे ऑफिसर्स मारले गेलेत. हा स्पष्ट, खुला इस्लामी जिहाद आहे.

आता सद्भावना, मनोमिलन/मन जिंकणं, मानवाधिकार, न्यायालयीन हस्तक्षेप बाजूला सारून आतंक्यांना ठेचण्याचं कार्य सुरू करणं आवश्यक आहे. हे जिहाद व जिहाद्यांविरोधी सतत चालणारं युद्ध आहे. २०१९ मध्ये भारताने कलम ३७० रद्द केल्यापासून पाकिस्तान चवताळला आहे. भारताला दोष देण्यासाठी त्याने; राजनैतिक, लष्करी आणि वक्तृत्वपूर्ण मुत्सद्दी प्रयत्न केलेत. आंतरराष्ट्रीय संस्था व ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक देशांनी ते नजरंदाज केलेत. पुढे काश्मीरमध्ये विक्रमी पर्यटन होऊ लागलं आणि विश्वासार्ह लोकशाही निवडणुका झाल्यात. हे पाकिस्तानच्या जिव्हारी लागलं आहे. आजमितीला पाकिस्तानी लष्कर, टीटीपी, तालिबान, बलुच लिबरेशन आर्मी अशा अनेक आघाड्यांवर लढत आहे. तो खोल राजकीय आणि आर्थिक गर्तेत जातो आहे. तार्किकदृष्ट्या, भारतविरोधात दुसरी आघाडी उघडण्यासाठी ही सर्वांत वाईट वेळ असली तरीही, पाकिस्तान नेमकं हेच करतो आहे. बिघडत चाललेल्या अंतर्गत बाबींवरून देशाचं लक्ष हटवण्यासाठी त्याच्यासाठी भारत हा शाश्वत पर्याय आहे. सज्जड भारतीय प्रत्युत्तराचा धोका पत्करून पहलगाम प्राणघातक आतंकी हल्ला यासाठीच केला गेला आहे/असावा. आतंक्यांनी श्रीनगरचा लाल चौक, हब्बा कदाल मार्केट, काश्मीर मार्केट, गांदरबल मार्केट, कुपवारा मार्केटमधे हल्ला केला नाही. ज्या ज्या वेळी भारतावर जिहादी आतंकी हल्ला होतो तेव्हा मुस्लिमधार्जिण्या संघटना/विचारवंत यात इस्लामी विचारसरणीचा दोष नाही ही तरफदारी करण्यासाठी पुढे येतात. पण या वेळचा हल्ला, नॉन बिलिव्हर्स/काफीर/खासकरून हिंदूबद्दलचा आकस/द्वेषामुळेच झाला, यामागे राजकीय नाही तर केवळ इस्लामिक जिहादी अजेंडा होता हे स्पष्ट झालं आहे. आतंक्यांना हिंदूंनाच मारायचं होतं. ते मुसलमानांना कधीच मारणार नाहीत. पाकिस्तानचा हिंदुद्वेष जनरल असीम मुनीरच्या वक्तव्यातून उजागर होतो. त्यामुळे हे युद्ध, केवळ लष्करी व आर्थिक स्तरावरच नाही तर वैचारिक स्तरावरही लढावं लागेल. अनेक टीव्ही चॅनेल्सवर उल्लेखित माझ्या मतानुसार, या हल्ल्यामागे पाच कारण असावीत;

अ) सुधारित ३७० कलम लागू झाल्यानंतर सुरक्षा दलांनी खोऱ्यात जिहाद्यांचं कंबरड मोडलं. त्यामुळे जिहादी, पठाणकोट जम्मू क्षेत्रात कार्यरत झाले. खोरं शांतच होतं. त्यामुळे ते ॲक्टिव्हेट करण्यासाठी हा हल्ला झाला, ब) मागील आठवड्यात पाक सेनाध्यक्ष जनरल असीम मुनीरने, 'काश्मीर इज अवर जुगुलर आर्टेरी. वुई विल प्रोटेक्ट इट ॲण्ड वन डे टेक बॅक ऑक्युपाईड काश्मीर', अशी गरळ ओकली होती. त्याचं गांभीर्य दर्शवण्यासाठी आयएसआयने हा हल्ला केला असावा, क) अमेरिकन उपाध्यक्ष जेडी वान्स व्यापार करार करण्यासाठी भारतात आले आहेत. ज्या वेळी कोणी महत्त्वाची व्यक्ती, महत्त्वाच्या कामासाठी भारतात येते तेव्हा जिहादी आतंकी हल्ले होतातच. तेच या वेळीही झालं आहे, ड) पंतप्रधान सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर गेलेत. सौदी अरेबिया पाकिस्तानला लागेल तेव्हा, लागेल तेवढी तेवढी आर्थिक मदत देतो. इंटरनॅशनल मॉनेटरी फ़ंड व चीनने आर्थिक मदत थांबवल्यास सौदी अरबच त्याचा तारणहार असतो. त्यामुळे, 'आम्हीही इस्लामसाठी कार्यरत आहोत' हे त्यांना दर्शवण्यासाठी हा आयएसआय प्रेरित हल्ला केला गेला, इ) तहव्वूर राणाची चौकशी सुरू आहे. कदाचित त्याला योग्य ती वॉर्निंग देण्यासाठीही हा हल्ला झाला असेल. पण या वेळी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे, हाती आलेल्या बातमीनुसार, या वेळी धर्माच्या आधारावर नरसंहार झाला.

या आधी असं सन २००० मध्ये झालं होतं ज्यावेळी छत्तीसिंगपूरमध्ये ४० शिखांचा संहार झाला होता. याआधी आतंकी सुरक्षादलांवर ग्रेनेड्स, रॉकेट, आत्मघाती व बॉम्बहल्ले करत असत. पण असा 'सॅग्रिगेटेड अटॅक' कधीच झाला नाही. हा, टार्गेटेड हल्ला नव्हता. टार्गेटेड हल्ल्यात निवडक प्रमुखांना मारलं जातं जेणेकरून संघटना कमकुवत/नष्ट होईल. बिन लादेनची अल कायदा, जनरल उस्मानीच इराण रिव्हॉल्युशनरी गार्ड किंवा याह्या सिनवरची हमास ही, टार्गेटेड किलिंगची खरी उदाहरणं आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन् त्यांच्या अनुक्रमे सौदी अरेबिया आणि अमेरिका/पेरूच्या दौऱ्यावरून लवकर परत आले आहेत. २३ एप्रिलला कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीची मीटिंग झाली व २४ला सीनियर कॅबिनेट मिनिस्टर्सनी, विरोधी पक्षनेत्यांना सर्व घडामोडी आणि संभाव्य प्रतिसादाशी अवगत करवलं. २४ एप्रिलला बिहारमधील मधुबनीत बोलताना केलेल्या हिंदी भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'टेररिस्ट हॅव स्ट्रक इन पहलगाम. वुई विल पर्स्यु देम टू द एन्ड ऑफ द अर्थ. इंडियाज स्पिरिट विल नेव्हर बी ब्रोकन बाय टेरोरिझम' हा दोन वाक्यांचा सज्जड संदेश जगाला दिला. सूत्रांनुसार पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारत सरकार लष्करी व मुत्सद्दी क्षेत्रात काही खंबीर पावले उचलण्याच्या तयारीत आहे.

१) राजनीतिक संबंध तोडणं, हाय कमिशन/हाय कमिश्नर/इंटलिजन्स ऑफिसर्सची हकालपट्टी व दूतावासाची जागा परत घेणं, २) पाकिस्तानचा डिप्लोमॅटिक कमी करणं/आपला स्टाफ परत बोलावणं, ३) इंडस वॉटर ट्रीटी खारीज करणं; ४) आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि सिक्युरिटी कौन्सिलमध्ये पहलगाम हल्ल्याच्या बाबतीत पाकिस्तानची पोलखोल करणं, ५) पाश्चिमात्य राजदूतांना पहलगामची यात्रा घडवणं आणि पीडित/पीडितांच्या कुटुंबीयांची भेट करवणं, ६) पाक नागरिकांना कुठल्याही प्रकारचा व्हिसा देणं बंद करणं ७) करतारपूर कॉरिडॉर बंद करणं, ८) थेट व मध्यस्थ मार्गांची आयात-निर्यात व्यापारबंदी, ९) हुसैनीवाला व आरएसपुरासीमा व अटारी/वाघा बॉर्डरवरील फ्लॅग आणि बिटींग द रिट्रीट सेरेमनी बंद करणं १०) भारतीय हवाई हद्द पाकिस्तानसाठी बंद करणं. यामुळे जगभरात पाकिस्तानची कोंडी होऊ शकेल/होईल.

लष्करी पर्यायाची चर्चा मी जाहीर रीत्या करू इच्छित/करत नाही कारण लष्कराचं ध्येय पाक लष्कर व लष्कर-ए-तोयबाचा विध्वंस करणं आहे. एकदा का कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीने 'गो अहेड' दिला की सेना/लष्कर केव्हा, कुठे आणि काय करायचं हे निश्चित करेल. हवेत बाण मारले जाणार नाही. टार्गेट निश्चित झालं की महाशक्ती, ओआयसी, इराण व अरब देश काय म्हणतील, प्रवासी भारतीयांवर त्याचा काय परिणाम होईल, याचा विचार करून कारवाई केली जाईल. एक निवृत्त सैनिक या नात्याने मी असं म्हणू शकतो की या हल्ल्याला प्रत्युत्तर तर दिल जाईलच. लष्कराकडे सर्व पर्याय आहेत. लष्कराची प्रत्युत्तर पातळी सरकारवर अवलंबून असेल. आता, वेट ॲण्ड वॉचची गरज आहे. सरकार आणि लष्कर योग्य तो निर्णय घेईलच. अशा बाबतीत 'नी जर्क रिॲक्शन' देता येत नाही/देणं योग्य नसतं. 'वॉर ऑन टेरर'साठी अंतिम उत्तर शोधण्याची वेळ आली असली तरी बदला हा थंड डोक्याने घ्यायचा असतो हे विसरता कामा नये.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

'डब्ल्यूडब्ल्यूएफ'च्या लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्टनुसार, १९७० पासून पृथ्वीवरील ६९ टक्के जैवविविधता नष्ट झाली आहे. महासागरांमध्ये २०५० पर्यंत समुद्रात माशांपेक्षा जास्त प्लॅस्टिक तरंगत असेल, असा अंदाज त्यात व्यक्त करण्यात आला आहे. हा विकास नसून आपण सुरू केलेला आपलाच विनाश आहे. हे केवळ सरकारचे अपयश नसून सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवरील आपल्या सवयी आणि लालसेचे परिणाम आहेत.




आता पृथ्वीची उष्णता ही कल्पना नसून आकडेवारीत नोंदवलेले एक भयानक वास्तव बनले आहे. जागतिक हवामान संघटने (डब्ल्यूएमओ)च्या 'स्टेट ऑफ द ग्लोबल क्लायमेट, २०२३' अहवालानुसार २०२३ हे आतापर्यंतचे सर्वांत उष्ण वर्ष ठरले. हा केवळ वैज्ञानिक भाषेत नोंदवलेला इशारा नाही, तर जगण्याच्या अनुभवाचे वास्तव बनले आहे. युरोपमधील जंगलातील आग, आफ्रिकेतील दुष्काळ, अमेरिकेतील हिमवादळे आणि चक्रीवादळे आणि आशियातील भयंकर उष्णतेच्या लाटा ही पृथ्वीच्या मर्यादेपलीकडे असलेल्या दुःखाची लक्षणे आहेत. दिल्लीतील तापमान ५० अंश सेल्सिअसच्या जवळ जाणे, उत्तराखंडमधील बर्फ वितळल्यामुळे भूस्खलन होणे आणि बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळांची तीव्रता हे तर इशारे आहेत.

पृथ्वी आता आपल्याला संकेत देत नसून आवाज करत आहे, किंचाळत आहे. गेल्या शंभर वर्षांमध्ये विकासाच्या व्याख्येत आपण निसर्गाला केवळ उपयोगाची वस्तू मानत आलो आहोत. आपण नद्यांमधून पाणी, जंगलातून लाकूड, पर्वतातून खनिजे आणि हवेतून ऑक्सिजन घेतो आणि केवळ प्लॅस्टिक, रसायने आणि कार्बन मिळवतो. 'युनायटेड नेशन्स एन्व्हायन्मेंटल एजन्सी' च्या मते, मानवजाती आता पृथ्वीवरून पुनरुत्पादित करण्यापेक्षा १.७ पट जास्त संसाधने काढत आहे. याला 'इकॉलॉजिकल ओव्हरशूट' म्हणतात. आज माणसाकडून दरवर्षी सुमारे दहा दशलक्ष हेक्टर जंगल साफ केले जाते. आपण दरवर्षी माणशी सरासरी ५०-६० किलो प्लॅस्टिक वापरतो, त्यापैकी बहुतेक एकदा वापरल्यानंतर फेकून दिले जाते. आमच्या फॅशनच्या सवयी, प्रत्येक हंगामात नवीन कपडे आणि ट्रेंडची स्पर्धा पर्यावरण संसाधनांचा सर्वांत मोठा ग्राहक बनला आहे. एकट्या फॅशन उद्योगाचा जागतिक जल प्रदूषणात २० टक्के आणि कार्बन उत्सर्जनात दहा टक्के वाटा आहे. मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रिक कार, त्यात वापरलेले धातू प्रदूषणाला कारणीभूत ठरतात. आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील खाणींमधून कोबाल्ट आणि लिथियम काढले जातात. तिथे बालकामगार आणि पर्यावरणीय शोषण अनेकदा घडते. म्हणजे आपली चमक दुसऱ्याच्या आयुष्यातील अंधारातून विकत घेतली जात आहे. हा उपभोग नाही, तर शोषण असून पृथ्वी त्याची किंमत मोजत आहे. भारतातील परिस्थिती तर आणखी चिंताजनक आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि 'स्टेट ऑफ एन्व्हायन्मेंट रिपोर्ट'नुसार भारतातील ६०३ पैकी २७९ नद्या अतिप्रदूषित आहेत.

जागतिक आरोग्य संघटना आणि 'आयक्यूएअर'च्या २०२३ च्या अहवालानुसार जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १४ शहरे भारतात आहेत, त्यापैकी दिल्ली, गाझियाबाद, लखनौ, पाटणा, कानपूर प्रमुख आहेत. आज जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांपेक्षा दिल्लीची हवा वीसपट जास्त प्रदूषित आहे. देवभूमी म्हणून ओळखला जाणारा हिमालयीन प्रदेश अवैज्ञानिक बांधकाम, अतिक्रमण आणि अनियंत्रित पर्यटनामुळे नष्ट होत आहे. जोशीमठ कोसळणे, केदारनाथचे वारंवार होणारे नुकसान आणि उत्तराखंड-हिमाचलमधील भूस्खलन या सर्व दुर्घटना आपल्या चुकीच्या विकास धोरणांची जिवंत साक्ष आहेत. सरकारने हे रोखण्यासाठी प्रयत्न केले आहेत, हे नाकारता येणार नाही. २०२१ मध्ये 'कोप' परिषदेत भारताने २०७० पर्यंत निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे लक्ष्य ठेवले. 'नमामि गंगे' ते 'जल जीवन मिशन' आणि 'राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन'पर्यंत अनेक योजना सुरू करण्यात आल्या. हा देश आता जगातील टॉप ५ सौरऊर्जा उत्पादक देशांच्या यादीत आहे; पण प्रश्न असा आहे की या योजना परिणाम देत आहेत की केवळ सादरीकरण? गंगा खरंच स्वच्छ होत आहे का? प्लॅस्टिकबंदी प्रत्यक्षात आली आहे का? आपले शहरी आणि ग्रामीण नियोजनकार पर्यावरण संतुलनाला प्राधान्य देतात का? तसे नसल्यास, धोरणांचे मूल्यमापन प्रामाणिकपणे केले पाहिजे. विकासाच्या मॉडेलमध्ये पर्यावरणाकडे 'अडथळा' म्हणून पाहिले जात असेपर्यंत कायमस्वरूपी तोडगा काढणे शक्य नाही. सरकारांनी 'ग्रीन जीडीपी' स्वीकारण्याची वेळ आली आहे, जिथे पर्यावरणीय आरोग्यासह वाढीची गणना केली जाते. आपण जीवनाकडे पुढे जायचे की विनाशाकडे, हे आपण ठरवायची वेळ आली आहे. यापुढील काळात केवळ एक विषय म्हणून पर्यावरणाचा विचार न करता एक संस्कृती म्हणून शिक्षणपद्धतीत समावेश केला पाहिजे.

प्रत्येक शहराच्या आराखड्यात हरित पट्टा, जलस्रोतांचे संरक्षण आणि बांधकामापूर्वी पर्यावरणीय मूल्यमापन अनिवार्य केले पाहिजे. ग्रामीण भारतात पारंपरिक जलसंधारण पद्धती आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले पाहिजे. पर्यटन आणि शहरीकरणाच्या नावाखाली पर्वतांवर होणारे बलात्कार थांबले पाहिजेत आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वैयक्तिक स्तरावर उपभोगाच्या सवयींमध्ये बदल केले पाहिजेत. कमी खरेदी करा, वारंवार वापरा आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारा, हे आर्जव मान्य केले पाहिजे. पृथ्वी ही केवळ 'वापराची वस्तू' नाही, ती आपल्या जीवनाचा आधार आहे. आपण अजूनही ऐकले नाही तर पुढच्या पिढ्या आपल्याला दोष देतील. पृथ्वीवर अशी काही ठिकाणे आहेत, जिथे वर्षानुवर्षे आग न थांबता धगधगत आहे. काही ठिकाणी नैसर्गिक कारणांमुळे जळते तर काही ठिकाणी मानवी क्रियाकलापांमुळे आग लागते आणि ती पुन्हा कधीच विझत नाही. ही ठिकाणे शास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय आहेतच; पण पर्यटकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्रही आहेत.

ऑस्ट्रेलियामध्ये 'बर्निंग माऊंटन' ही एक भूमिगत कोळसा खाण आहे. ती गेल्या ६,००० वर्षांपासून जळत आहे. शास्त्रज्ञांच्या मते, ही जगातील सर्वांत जुन्या जळणाऱ्या कोळसा खाणींपैकी एक आहे. ही आग हळूहळू डोंगराच्या खाली पसरत आहे आणि ती थांबवणे अशक्य आहे. 'बर्निंग माऊंटन' ही आग कोळशाच्या स्वयं-इग्निशनमुळे लागली होती. या ठिकाणी अजूनही धूर निघत आहे. त्यामुळे जमिनीचे तापमान वाढते. सेंट्रलिया हे पेनसिल्व्हेनियानजीकचे अमेरिकेतील एक बेबंद शहर आहे, ज्याच्या खाली १९६२ पासून कोळशाची खाण जळत आहे. एका भूस्खलनात साफसफाईच्या वेळी चुकून आग लागली आणि नंतर भूमिगत कोळसा खाणींमध्ये पसरली. ही आग एवढी भीषण होती की, संपूर्ण मैदान तापले आणि अनेक ठिकाणी रस्ते तुटले. या धोकादायक परिस्थितीमुळे सरकारने शहर रिकामे केले आणि आता ते जवळपास भुताचे शहर बनले आहे. अझरबैजानमध्ये अतेशगाह फायर टेंपल हे झोरोस्ट्रियन आणि हिंदू भक्तांनी सतराव्याअठराव्या शतकात बांधलेले ऐतिहासिक अग्निमंदिर आहे. हे मंदिर नैसर्गिक वायूच्या स्रोतांच्या वर होते. इथला नैसर्गिक वायू आता संपला असला, तरी या ठिकाणाला ऐतिहासिक महत्त्व आहे. हे 'लॅण्ड ऑफ फायर'चे प्रतीक मानले जाते. तुर्कमेनिस्तानच्या काराकुम वाळवंटात असलेले प्रचंड जळणारे विवर 'गेट्स ऑफ हेल' किंवा 'गेट ऑफ हेल' म्हणून प्रसिद्ध आहे. ते १९७१ मध्ये तयार झाले.

सोव्हिएत शास्त्रज्ञ नैसर्गिक वायूचा शोध घेत असताना येथे ड्रिलिंग साईट तयार केली होती. अचानक जमीन कोसळली आणि त्यातून मिथेन वायू बाहेर येऊ लागला. हा वायू काही दिवसांत विझून जाईल, या विचाराने शास्त्रज्ञांनी पर्यावरण वाचवण्यासाठी या वायूला आग लावली; पण हा अग्नी आजही धगधगत असून त्याचा तेजस्वी लाल रंग नरकाच्या दरवाजासारखी भीतिदायक प्रतिमा तयार करत आहे. अझरबैजानला 'अग्नीची भूमी' असेही म्हटले जाते. कारण नैसर्गिक वायूमुळे येथे अनेक ठिकाणी आगी पेटत राहतात. यातील सर्वांत प्रसिद्ध म्हणजे यानार दाग, म्हणजेच 'जळणारा पर्वत.' इथल्या मातीमध्ये मिथेन वायू मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे खडकांच्या खालून अग्नी उत्स्फूर्तपणे बाहेर पडत असतो. या रहस्यमय आगीचा उल्लेख मार्को पोलोने तेराव्या शतकात आपल्या प्रवासादरम्यान केला होता.

तुर्कस्तानच्या लिसिया प्रदेशात एक प्रसिद्ध ठिकाण आहे. येथे खडकांमधून नैसर्गिक वायू बाहेर पडतो आणि आग सतत धगधगत राहते. हे ठिकाण प्राचीन काळापासून एक रहस्यमय ठिकाण म्हणून ओळखले जाते. ग्रीक पौराणिक कथेनुसार येथे चिमेरा नावाचा राक्षस राहत होता. त्याच्या तोंडातून आग लागली होती. आजही येथील आग रात्रीच्या वेळी अतिशय आकर्षक दिसते. यातील काही ठिकाणे प्रेक्षणीय असली, तरी त्यांच्यामुळे पर्यावरणीय हानी आणि पृथ्वीचे तापमानवाढीतील त्यांचे योगदान विसरता येणार नाही. ते कमी करण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)